THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_192282
UNIVERSAL
LIBRARY

मनोहर ग्रंथमाला, प्रकाशन ११ वें

# संसार-सोपान

लेखिका

सौ. गिरिजाबाई केळकर

१९२९

प्रकाशक

मनोहर महादेव केळकर,
मनोहर ग्रंथमाला, १९६/८५ टिळक रोड,
पुणें २.

CHECKED 1956

चित्रकार– वसंत महादेव केळकर,
आर्ट कॉर्नर, ९ बेकहाउस लेन,
फोर्ट, मुंबई.

Checked 1965

Checked 1969

मुद्रक

श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण पेठ,
कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें २.

# आमचें प्रकाशन

तिरंगी नवमतवाद्— ले. न. चिं. केळकर      किं. १० आणे

विस्तवाशीं खेळ—सामाजिक नाटक, ले. वा. म. जोशी, किं. १ रु.

फ्रेंच राज्यक्रांति— ले. न. चिं. केळकर      किं. २ रु.

हास्यविनोद्मीमांसा— ले. न. चिं. केळकर      किं. ४ रु.
कापडी ५ रु.

सहारा— स्वतंत्र सामाजिक कादंबरी, तीनरंगी मुखपृष्ठ,
ले. श्रीधर गोपाळ देशपांडे      किं. १ रु.

बलिदान— उत्कृष्ट बुद्धकालीन कादंबरी, सुंदर मुखपृष्ठ,
ले. न. चिं. केळकर      किं. २ रु.

राका— कवितासंग्रह, दोनरंगी मुखपृष्ठ,
सौ. संजीवनी मराठे      किं. १ रु.

प्रतारणा— ले. प्रो. वि. पां. दांडेकर यांची ही
पहिली कादंबरी आहे; लेखक प्रसिद्धच आहेत. किं. १॥। रु.

समग्र केळकर-वाङ्मय— बारा हजार पानें
एकंदर १२ खंडांची किं. ५० रु.

हप्त्यांच्या सवलतीच्या पद्धतीकरितां आणि सविस्तर माहिती-पत्रकाकरितां पुढील पत्त्यावर लिहा. य. गो. जोशी प्रकाशनें व मनोहर ग्रंथमाला प्रकाशनें यांची माहितीपत्रकें आमचेकडे मिळतील.

मनोहर ग्रंथमाला,
१९६।८५ टिळक रोड, पुणें २.

# सौ. गिरिजाबाई केळकर यांचीं इतर पुस्तकें

## कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| १ | समाजचित्रें भाग १ ला | किं. २– ०–० |
| २ | समाजचित्रें भाग २ रा | किं. १– ४–० |
| ३ | केवळ विश्रांतीसाठीं | किं. १– ०–० |

## लेखसंग्रह

| | | |
|---|---|---|
| ४ | गृहिणी-भूषण भाग १ ला | किं. ०– ८–० |
| | ( पांचवी आवृत्ति संपत आली ) | |
| ५ | गृहिणी-भूषण भाग २ रा | किं. ०– ८–० |
| ६ | स्त्रियांचा स्वर्ग | किं. १– ८–० |
| ७ | अध्यक्षीय भाषणें | किं. ०– ५–० |

## नाटकें

| | | |
|---|---|---|
| ८ | पुरुषांचें बंड | किं. ०–१०–० |
| ९ | आयेषा | किं. ०–१२–० |
| १० | राजकुंवर | किं. १– ०–० |
| ११ | हीच मुलीची आई (सामाजिक नाटिका) | किं. ०– ४–० |

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें :

सौ. गिरिजाबाई केळकर,
न्यू प्रताप मिल्स, धुळें.

परचुरे पुराणिक आणि मं.
माधवबाग, मुंबई नं. ४.

मनोहर ग्रंथमाला,
१९६।८५ टिळक रोड, पुणें २.

# संसार-सोपान

## प्रास्ताविक प्रकरण

गृहिणी गृहाची शोभा । गृहिणी सुखाचा गाभा ।
गृहिणी आनंदाचा ठेवा । ऐशी गृहिणी लाभे तो भाग्यवंत देवा ॥

आजपर्यंत पाकशास्त्र या विषयावर बरींच पुस्तकें निर्माण झालीं आहेत. असें असूनहीं मीं हें पुस्तक लिहावयास कां घ्यावें ? असा प्रश्न सकृद्दर्शनीं मनांत येईल. पण हा विषय इतका व्यापक व गंभीर स्वरूपाचा आहे कीं, त्याचा विचार करावा तितका थोडाच होणार आहे. त्या दृष्टीनें पाहिल्यास झालेलीं पुस्तकें टिपणीवजाच म्हणतां येतील. वास्तविक असा खरा विचार केला तर इतर साऱ्या विषयांत जीवन-संरक्षक जें 'अन्न' त्याबद्दलचा विचार हा आत्यंतिक महत्त्वाचा प्रश्न आहे. कुठल्याही तऱ्हेचें कार्य करायला, व्यक्तिगत उन्नति करायला आधीं अन्न पाहिजे. म्हणून आपल्या शास्त्रकारांनीं सुद्धां म्हटलें आहे कीं, 'शरीरमाद्यं खलु धर्म साधनम्.' तेव्हां अशा या आत्यंतिक महत्त्वाच्या विषयावर व्यापक, विचारपरिप्लुत असा एकादा ग्रंथ लिहितां आला तर लिहावा, या इच्छेनें हा ग्रंथ लिहावयास आरंभ केला आहे. कुठल्याही देशांत गेलें तरी ही महत्त्वाची बाब ठरते. शरीरसंवर्धन व पोषण अन्नावर अवलंबून असतें. तें अन्न कसें असावें, कसें करावें, ऋतुमानाप्रमाणें त्यांत बदल कोणते पाहिजेत, तें अन्न खावयाला इतर परिस्थिति कशी हवी, याचेंही ज्ञान प्रत्येकाला असलें पाहिजे. विशेषतः गृहिणींना तर याची

जास्तच आवश्यकता आहे. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धति होती आणि शिक्षणाची तऱ्हा पण निराळी होती; त्यामुळें ग्रंथमदतीशिवाय मुली स्वाभाविक रीत्याच स्वकर्तव्यतत्पर बनत असत. पण आतां कालमानाप्रमाणें आमची राहणी बदलली. 'कलौ तु अन्नमय प्राणः' त्यामुळें पूर्वपरंपरा मोडत चालली. अर्थात् आतां जरी मुलींना स्वयंपाक येत असला तरी तो मामुली पद्धतीचाच येतो. दिवसानुदिवस बदलत्या परिस्थितींत असें हें होणारच. हल्लीं मुलींचें बाळपण मुलांसारखेंच पुरुषी शिक्षण घेण्यांत जातें. त्या शिक्षणाचा बोजा दिवसानुदिवस इतका वाढला आहे कीं, अनेक विषयांच्या खिचडींत मुलें अगदीं गुदमरून जातात. त्यांतून जो थोडाच वेळ मिळेल तो नव्या राहणीमुळें नव्या तऱ्हेच्या व्यवसायांत जातो अर्थात् गृहकृत्यांकडे फारसें लक्ष दिलें जात नाहीं. त्यामुळें मोठेपणीं जेव्हां स्वतःचें घर म्हणून मुली मांडतात तेव्हां या ज्ञानाच्या अभावीं त्यांची फजिती होते, त्या किव्‌रतात व कंटाळतात नि मग डबे व कुकर यांच्या महत्त्वाला सुरुवात होते, याला नव्या विचाराच्या पुरुषांकडूनही दुजोरा दिला जातो. त्या आणि ते असे दोघेही मिळून म्हणतात कीं, सदा एकच एक गोष्टींत चूल-मूल, केर-पोतेरें यांतच का बायकांचा जन्म जावा? त्यासाठीं अन्नाची कांहीं तरी सुटसुटीत व्यवस्था करून बायका रिकाम्या होतील अशी कांहीं तरी व्यवस्था केली पाहिजे. असें म्हणणाऱ्याला असा प्रश्न विचारावासा वाटतो कीं, पुरुषांना तरी नोकरी, वकिली, डॉक्टरी हा एकच एक उद्योग दिवसभर नाहीं का करावा लागत? मग सगळे पुरुष एकच एक उद्योग करतात, त्यांच्याकरितां लवकर काम करून मोकळा होणारा उद्योग शोधून काढायची खटपट कोणी कां करीत नाहीं? मुळीं हा प्रश्नच चुकीचा. जो मनुष्य ज्या व्यवसायांत पडतो तोच त्याचा

मुख्य विषय, तो नीटनेटका पार पाडणें हें त्याचें ध्येय. त्यांतून वेळ काढून थोडासा विसांवा प्रत्येकजण घेतोच; आणि तो जरूर घ्यावाही. पण गृहिणीपद पत्करल्यानंतर तिचें जें मुख्य कर्तव्य–स्वयंपाक नि त्याच्या आनुषंगिक गोष्टी– तें कसें टाळतां येईल – याचा विचार आपण करणें, तिला करावयास लावणें हें स्त्री-दाक्षिण्य नसून ती स्त्री-कर्तव्याची हानि होय. यांत पडणाऱ्या पुरुषांनीं खरोखरच अतिशय विचार करावयास हवा आहे. एकादा डॉक्टर जर म्हणेल कीं, सारा दिवस एकेक, एकेक रोगी तपाशीत बसण्यापेक्षां एकदम सारे रोगी उभे करीन आणि कंपाउंडरांना औषधें देण्यास सांगेन तर तो डॉक्टर जसा कोणीही पसंत करणार नाहीं, क्वचित् प्रसंगीं ऑपरेशनची वगैरे महत्त्वाची केस आहे म्हणून, कंपाउंडराकडून औषध घ्या म्हटलें तर रोग्यांना पटेल, त्याचप्रमाणें एकादी बाई कांहीं महत्त्वाचें कार्य करीत असेल नी त्याकरतां डबा अथवा कुकर करा म्हटलें तर तें एक वेळ शोभेल. पण टेनिस खेळायला मिळावें, बॅडमिंटन खेळायला मिळावें किंवा वाचीत बसायला मिळावें म्हणून जर एकाद्या बाईला आपलें कर्तव्य सोडून वेळ वांचविण्याचा उपदेश कोणी केला तर ती त्याची चूकच ठरेल. बाटलींतलें दूध का होईना, आईनें मुलाला मांडीवर घेऊन पाजलें म्हणजे तें पिण्यांत मुलाला जो आनंद वाटतो तो आनंद आयाजवळ पिण्यांत वाटत नाहीं. आईनें जेवायला घालावें, निजवावें, थोपटावें असें मुलांना कां वाटतें? त्यांत त्यांना आईच्या प्रेमाचें माधुर्य सापडतें. तें मोलाच्या माणसांत क्वचितच आढळतें. नोकरांवर आपण रागावलों असलों तर तीं मुलांशीं हुडुस-धुडुस वागतात. आई साऱ्या जगावर रागावली तरी ती मुलाला हुडुस-धुडुस करणार नाहीं. म्हणून महत्त्वाचें काम असेल

तेव्हां किंवा जरूरीच्या वेळीं प्रत्येकानें आपल्या कर्तव्यांत बदल करावयाचा असतो, म्हणून नव्या पिढीच्या डोक्यांत स्वयंपाकाचीं सुलभ साधनें निर्माण करून, वेळ बचत करण्याचें खूळ पुरुषांनीं तरी भरविण्याचा प्रयत्न करूं नये. ज्याप्रमाणें वित्त मिळविण्यासाठीं आपल्या व्यवसायांत आपलें चित्त गुंतवावें लागतें, त्याप्रमाणें आम्हां स्त्रियानांसुद्धां मिळविलेल्या वित्ताचा सदुपयोग करून तुमचें स्वास्थ्य वाढविण्यासाठीं आपला वेळ कर्तव्याकडे गुंतविलाच पाहिजे. त्यांतून मिळालेल्या फुरसतीचा उपयोग आम्हीं आपल्या आवडत्या विषयां-कडे हवा तसा लावावा. स्वतांचीं कामें संभाळून मनुष्यानें दुसऱ्या गोष्टी केल्यावर त्याला कोणीच आडकाठी करणार नाहीं. पण कांहीं तरी गोड नांव देऊन प्रत्येकाला कर्तव्यच्युत करणें, नि प्रत्येकानें होणें, हें गुन्ह्याच्याच सदरीं पडेल. जीवनाला जितकी पैशाची आवश्यकता आहे, तितकीच किंबहुना अधिकच अन्नाचीं आहे. पैसा तरी अन्नासाठींच मिळवायचा ना! तें अन्न पथ्यकर, रुचकर, सुखकर कसें होईल हें बायकांनींच शिकायला पाहिजे, तें केलें पाहिजे, त्यांत मन घातलें पाहिजे. नाजूक गोड, प्रेमळ, मनो-वृत्तीच्या स्त्रियांच्या हातून शांतवृत्तीनें आनंदी मनानें नाजूक हातांनीं जसे सुंदर जिन्नस तयार होतील तसें सुंदर अन्न पैसा मिळविण्याकरितां पगारी नेमलेल्या हॉटेलवाल्यांच्या नोकरांकडून होईल का? म्हणूनच अन्नाची व्यवस्था नेहमीं स्त्रियांनींच पाहावी, स्त्रियांनींच तें करावें. अशा वेळीं परंपरेनें येणारें शिक्षण हल्लींच्या गृहस्थितींत मिळत नाहीं म्हणूनच असल्या प्रकारच्या पुस्तकांची आवश्यकता आहे. याचा उपयोग तरुण मुलींना कदाचित् मैत्रीण म्हणून होईल. या पुस्तकांत शाकाहारी अन्नाचाच विचार केला आहे. कारण आपलें मुख्य अन्न हेंच आहे. सर्वांनींच शाकाहारी असावें, असें मत हल्लीं पाश्चिमात्य

देशांत देखील बनत चाललें आहे. असो. आतां हें पुस्तक मीं लिहावयास घेण्याचें कारण काय, तर आजपर्यंत निरानिराळ्या वेळीं निरनिराळ्या ठिकाणीं मला जीं दृश्यें दिसलीं तीं पाहून मला असें वाटलें कीं, जरी आमच्याकडे दोनचार पाकशास्त्रें बाहेर पडलीं आहेत, तरी पण तेवढ्यानें आमची गरज भागावयाची नाहीं; तर त्यापेक्षां कांहीं तरी विस्तृत प्रमाणावरील माहिती माझ्या लहान भगिनींना मिळण्याची सोय झाली पाहिजे. त्या पाकशास्त्रांनीं फार तर मुलींना एकादा रस्सा, वड्या अथवा जेली करतां येईल. पण तें एक वेळ नाहीं आलें तरी चालेल; परंतु त्यापेक्षां महत्त्वाची माहिती गृहिणीला हवी. आजकाल असें दिसून येतें कीं, मुलींना अन्नाच्या बाबतींतील शिक्षण इतकें कमी झालें आहे कीं तें कां खावें, कसें खावें, केव्हां खावें, हें माहीत नसल्यामुळें पैशाचा जसा व्यय व्हावयास पाहिजे तसा होत नाहीं. आणि अर्थात् धडधाकट आई, सुंदर, गुटगुटीत बालक व तेजस्वी पतिराज असें फारसें पाहावयालाच मिळत नाहीं. हें असें कां होतें याचा विचार करतां असें लक्षांत येतें कीं, अन्न आणि आम्ही दुरावत चाललों आहों. सिनेमा आम्ही स्वतः जाऊन पाहतों; पण अन्न दुसऱ्यानें पाहिलेलें खातों. दिवाणखाना आम्ही लावतों, पण स्वयंपाकगृह दुसऱ्याच्या हातीं देतों. क्वचित् टापटीप केली तर ती डब्यांच्या ओळी लावण्याची करतों. ती करूं नये असें मात्र नव्हे. जेवढी काळजी आम्ही चहाच्या सेटची घेतों, तेवढी चहाच्या कृतीची घेत नाहीं. खरोखर लिहिलें तर पुष्कळांना आवडणार नाहीं, चहा जरी बहुतेकांच्या घरीं प्याला जातो, तरी चहा कसा तयार करावा हें निम्म्या घरीं तरी कळत नाहीं. पूर्वीं एकत्र कुटुंबांत फार मोठा बोजा उचलावयाचा असे, पण तो पुष्कळ बायकांत विभागला जाई. अर्थात्

घरांतील पुष्कळ कामें न सांगतां, न शिकवितां, आपल्या आपण येत होतीं. पण आतां नव्या जोडप्यांना एकदमच स्वतंत्रता मिळते. अर्थात् हा अनुभवच त्यांच्यापाशीं नसतो. त्यामुळें त्यांना सगळ्याच गोष्टी नीटपणें शिकणें जरूर आहे.

नवी अशी एक प्रथा पडूं पाहते आहे कीं, श्रीमंतीचें लक्षण म्हणजे स्वयंपाक न करणें. पण ही अतिशय मोठी चूक आहे. फार मोठा कौटुंबिक पसारा असेल आणि प्रकृतिदृष्ट्या झेपत नसेल तरच स्वयंपाक दुसऱ्यावर सोपवावा. तो दुसऱ्याच्या हातीं सोपविणें ही चूक आहे. हल्लीं चांगले, कामसू, निर्व्यसनी, पवित्र व स्वच्छ ब्राह्मण मिळणें जवळ जवळ अशक्य झालें आहे. बाई झाली तरी तिच्या मागें बरींचशीं खेंगटीं असतातच! अशा परिस्थितींत त्यांच्याकडून सुंदर सात्त्विक व गोड अन्न कसें मिळावें! मुली ल्हान असतात, त्यांना स्वच्छंदीपणा हवा असतो. थोडींशीं मासिकांतील व कादंबरींतलि काल्पनिक चित्रें नजरेपुढें असतात. त्यामुळें स्वतंत्रता व मोकळेपणा हवा असतो, अशा वेळीं एकाद्या हुशार माणसानें त्यांची थोडीशी मर्जी संभाळली म्हणजे माझा ब्राह्मण फारच चांगला आहे अशी त्यांची समजूत होते, याचें कारण दिवसानुदिवस मुलींत वाढत चाललेला घरगुती कामाचा कंटाळा! आम्ही म्हणतों घरांतलि काम नीटनेटकें व व्यवस्थित केलें तर एका बाईला पुरून उरेल इतका व्यायाम होतो. मग शक्य त्यांनीं जरूर वाटल्यास क्लब, देऊळ अथवा फिरणें करून यावें. म्हणजे प्रकृतीला व्यायाम मिळून मन आनंदी व नवजीवित होतें. पण नव्या पिढीला हें पटत नाहीं. त्या म्हणतात, घरांतला कसला व्यायाम! ज्या व्यायामानें मनाला आनंद नि समाधान लाभेल तोच खरा व्यायाम. म्हणणें खरें आहे, पण याचा अर्थ असा नाहीं का होत, कीं

घरांतल्या कामांत त्यांना आनंद वाटत नाहीं. अर्थात् तें काम नीटनेटकें केल्याबद्दल त्यांना समाधानही वाटत नाहीं. त्या म्हणतात शिकायचें सवरायचें नि शेवटीं काय, तर स्वयपाक करून जेवायचें हीच 'इति श्री'. आपलें कर्तव्य बजावल्यानंतर उरला वेळ आपल्या आवडीनें एकादा चांगला व्यवसाय शोधून त्यांत घालविला तर कोणीच नको म्हणणार नाहीं. पुरुष तरी काय करतात याचा विचार या मुली करीत नाहींत. स्वतांचें असें एक ध्येय ठरविल्यानंतर नोकरी किंवा धंदा यांत ते दिवसाचे दिवस घालवितात व उरल्या वेळांत सार्वजनिक कामाच्या गप्पा मारतात. पण त्यांना त्यांच्या रोजच्या त्याच त्याच कामांत आनंद वाटतो ना! मग मुलींनींच अशी आपली समजूत करून असमाधानी वृत्ति कां बनवून घ्यावी ? घरांतला स्वयंपाक हेंच तर गृहिणीचें मुख्य कर्तव्य आहे. पांचशें रुपये मिळविणाऱ्या डॉक्टराला रोग्याची जखम धुतांना जर कमीपणा वाटत नाहीं, तर मी स्वयंपाक करतें असें म्हणण्यांत डॉक्टरीणबाईंना कमीपणा कां वाटावा? स्वयंपाकघराची व्यवस्था सुंदर ठेवणें, सुबक व स्वच्छ भांड्यांतून वावरणें, त्यांत चांगलें पदार्थ करून ठेवणें, रोजच्याच भाजीपाल्यांत, रोजच्याच अन्नांत आपल्या बुद्धीनें नावीन्य उत्पन्न करून त्याचा परामर्श घेणें, तें सुंदर झालें असें दुसऱ्याकडून म्हणवून घेणें, जेवणारांना आपल्या कर्तबगारीनें, झालेला आनंद पाहणें हें कमी महत्त्वाचें आहे काय? अशा तऱ्हेचे विचार नव्या मुलींच्या डोक्यांत आले म्हणजे त्या दिवाणखाना सोडून उरलेल्या घराकडे आपुलकीनें बघतील आणि असें बघितल्यावर पुष्कळशा घरगुती गोष्टींत आपल्याला माहिती नाहीं असें त्यांना आढळून येईल. पुष्कळजणींचें बाळपण सोवळ्याओवळ्याची टिंगल करण्यांत गेलेलें असतें. त्यांना प्रथम घराकडे

बघायला शिकावें लागेल. ती दृष्टि आली म्हणजे पूर्वी आपण केवढी चूक करीत होतों हें त्यांना कळून येईल.

अशा वेळीं अडलेली माहिती देण्याकरतां मैत्रीण म्हणून ह्यांतील मावशीचा उपयोग व्हावा, आईसारखा तिनें मार्ग दाखवावा, सासू-सारख्या चुका नजरेस आणाव्या, नणंदेप्रमाणें खांचखळगे टाळावे बहिणी-मावशीप्रमाणें पाठीवर हात फिरवून प्रपंचांतील खडकाळ रस्त्यांतून प्रपंचांतल्याच सुखमय, शीतल वातावरणांत आणून पति, सासू, नणंद, दीर या सार्‍यांना आवडतें व्हायचें काम गृहिणीनें करावें, व तें तिच्याकडून यशस्वी रीतीनें पार पडावें याच हेतूनें हा 'संसार-सोपान' समाजापुढें मी ठेवीत आहे. माझ्या लहान भगिनींनीं, नव दांपत्यांनीं ह्याचें स्वागत करून आपला संसार सुखमय करावा हींच माझी इच्छा आहे. ती पूर्ण होणें परमेश्वर-स्वाधीन आहे.

# प्रकरण १ लें

सरलाबाई पतिराजासमवेत जेव्हां सुंदरपुरास जावयास निघाली, तेव्हां तिच्या आईला फारच वाईट वाटलें. त्यांनीं आपल्या मैत्रिणीला ही मंडळी तेथें येणार म्हणून लिहून ठेविलें होतें. या बाईचे यजमान तेथें एक सुखी गृहस्थ म्हणून राहत असत. त्यांना हीं दोघें यायचें कळल्यानंतर त्यांनीं त्यांना स्टेशनवरून घरीं नेलें. दुपारचीं जेवणें झाल्यानंतर समोरचीच एक जागा बापू व सरलाताई यांना दाखविली. ती जागा बरी तर होतीच, पण नव्या मावशीच्या शेजारला असल्यामुळें उभयतांनाही विशेष आवडली. त्यांनीं दुसरेच दिवशीं आपलें बिऱ्हाड तेथें थाटलें. बरोबर थोड्या-फार प्रमाणांत सगळें सामान बांधून दिलेलें होतेंच. लहानशा बिऱ्हाडालायक अशी छोटीशी मोलकरीणही मावशींनीं बघून दिली होती. बापूराव-सरलाताई यांचा संसार त्या बिऱ्हाडीं थाटला गेला.

आपल्या बालमैत्रिणीच्या मुलीचा योग आपल्या शेजारींच आला, म्हणून राधाबाईनाही खूप आनंद झाला. राधाबाईचे यजमान भाऊसाहेब हे माणसांचे फार लोभी होते. त्यांनाही या दोन मुलांचें कौतुक पाहून भारी समाधान वाटलें. त्यांतच सरलाताईचा गोड व लाघवी स्वभाव नि बापूरावांची गोड व आनंदी वृत्ति यामुळें तीं दोघें त्यांना फारच आवडलीं. सरलेनें राधाबाईशीं मावशीचें नातें तावडतोबच जोडलें होतें. संसार मांडून झाल्यावर मावशी स्वतंत्रपणें एकदां सारें पाहून आल्या. तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें, कीं ही मुलगी अलीकडच्या पद्धतीनें शिकली असून तिची मनोरचना कालमानाला अनुसरूनच आहे. सरलचा वेळ नव्या घरच्या ठाकठिकींत—

विशेषतः दिवाणखाना सजवायच्या बाबतींत नि त्या विषयावर सुंदर विचार करण्यांत आनंदांत जाऊं लागला. त्यांनीं बाजारांतून कापड आणून दाराला एक पडदा केला आणि चिकाच्या पडद्याची ऑर्डर दिली. हा नवा पडदा पाहायसाठीं म्हणून ती मावशींना चहा प्यायला घेऊन आली. मावशींना तिचा तो उत्साह पाहून आनंद वाटला, पण त्याबरोबरच त्यांच्या हेंही लक्षांत आलें कीं, जितकें लक्ष दिवाणखान्याकडे आहे तितकें स्वयंपाकघराकडे नाहीं, पण चालू काळाचें तें माहात्म्य आहे, म्हणून त्या कांहीं बोलल्या नाहींत. सरलनें बोलावयास आरंभ केला.

**सरल**—मावशी, दाराला पडदा झाला. आतां खिडक्यांना हवेत. आतांच अधिक खर्च करतां येणार नाहीं, कारण घरनंसुद्धां जास्त पैसे मागवणं बरं दिसणार नाहीं. पण आमचा पगार झाला म्हणजे पुढील महिन्यांत मी कापड आणिन.

**मावशी**—ही तुझी विचारसरणी मला पटली. आपल्या हातीं पैसा असेल त्या मानानं आपण आपल्या सुखसोयी पाहाव्या. सगळ्याच गोष्टी जरूरीच्या नि आवश्यक असतात; पण पैसा कांहीं मनांत आल्याबरोबर हातीं येत नाहीं. म्हणून आपल्या गरजा देखील आपल्या मिळकतींतच बसतील इतक्याच असाव्यात. उदाहरणार्थ—खिडक्यांचे पडदे. ही गोष्ट एवढी आवश्यक नाहीं. असले तर हवेतच, त्यामुळें शोभा येईल. तेव्हां जरूरच वाटली तर चांगल्याशा रंगीत जुन्या पातळाच्या तुकड्यांचे तूर्तातूर्त शिवले तरी चालतील, किंवा ते नसले तर पांढऱ्या जुन्या धोतरांचे शिवावे. पण आपला बेत बसून दोन पैसे हातीं राहिल्याशिवाय चैनीच्या वस्तु घेऊं नयेत. पण हें सांगणं तुला आवडेल ना? का रागावशील?

**सरल**——नाहीं मावशी, मी मुळींच रागावणार नाहीं; आणि जरी रागावलें ना, तरी शिकवीत जा. आई नाहीं का शिकवीत! ती कुठं आमच्या रागालेभाची पर्वा करते! आम्ही एकादे वेळीं तिच्यावर फार रागावलों, म्हणजे ती म्हणते, कीं आजपासून मी तुम्हांला कांहीं शिकवणार नाहीं. पण पुन्हा वेळ आली, कीं शिकवतेच. तसंच हें. मला आईनं बजावलं आहे कीं, मावशीला तूं माझ्या ठिकाणीं समज. आई म्हणते कीं मावशी इतकी हुशार आहे, कीं आमच्यापेक्षां देखील तुम्हांला चागलं वळण लावील.

**मावशी**—तसं कांहीं नाहीं. तुझी आई का कमी हुशार आहे! हें म्हणणं म्हणजे तुझ्या आईचा मोठेपणा आहे, पण तुझी आई भारीच गरीब स्वभावाची आहे. आतां तुला जें मीं सांगितलं तें तिनं सांगितलं नसतं, कारण तिला सारखं असं वाटत असतं, कीं बोललं तर रागवाल, मग उगाच कशाला रुसवूं! बरं असो; आतां तूं रागवायची नाहींस म्हणालीस, म्हणून मी तुला योग्य वाटेल तेव्हां शिकवीत जाईन अं!

# प्रकरण २ रें

बाई माझी दिली शहरींच्या गृहस्थाला ।
चांदीचें घंगाळ सडा घालीते अंगणाला ।

एके दिवशीं सकाळीं उठून चहापाणी आटोपून, सरल मावशी-कडे गेली, तेव्हां मावशी दोन्ही ओचे बांधून दारीं सडा घालीत होत्या तें पाहून, ती अगदीं आश्चर्यचकित झाली. ती म्हणाली मावशी हें काय करतां ? मावशी तोंडानें भूपाळी म्हणत होत्या, त्याच वेळीं–

सडा-संमार्जन करुनी गोपिका अलंकारें नटती।

हा चरण आला होता. तो चरण पुरा करून त्या म्हणाल्या "तूं चल आंत. मी पाय धुऊन आलेंच." सरल आंत गेली नि त्या पाय धुऊन आंत शिरल्या नि म्हणाल्या, "काय– काय, म्हणते स्वारी ?"

**सरल**– पण, मावशी मला आधीं सांगा. तुम्ही सडा कां घालीत बसलांत ?

**मावशी**—अग, आज़ माझी रोजची बाई यायची नाहीं. नि दुसरी केव्हां येते कोण जाणे !

**सरल**—पण मावशी, एक दिवस नसता झाला सडा म्हणून काय बिघडत होतं !

**मावशी**—अग, बिघडत होतं तर ! फारच मोठं बिघडत होतं. अग, एक दिवस तुझा हॉल झाडला नाहीं तर चालेल, पण दारीं सडा पाहिजेच.

**सरल**—कांहीं तरीच बाई तुम्ही मावशी सांगतां ! आमच्या सासरीं तर आमच्या सासूबाईंनीं सडा अजीबात बंद केला. कारण

मोलकरणी लवकर येत नाहींत नि उशिरा घातलेला वाईट दिसतो, म्हणून त्यांनीं दारापुढं वाळूच घालवली आहे.

**मावशी**—अग, त्यांनीं कधीं सड्याच्या फायद्यांचा विचारच केला नसेल. कुणब्याच्या बायकादेखील काय म्हणतातः—

**सडा-सारवण भाऊजईची निगूत।**
**बंधुरायाची माझ्या चंद्राची चऊत ॥**

**सरल**—कुणब्याच्या बायांना तेंच ध्येय, म्हणून त्या तसं म्हणतात.

**मावशी**—तसं नव्हे, ही बघ ब्राह्मणाची ओवी—

**सडा-सारवण रांगोळीचीं शोभा।**
**देखाया भाई उभा ओट्यावरी ॥**

**सरल**—जुन्या बायांना दुसरे व्यवसाय नव्हते तेव्हां ठीक होतं.

**मावशी**—अग, जुन्या बायांना सभा,व्याख्यानं नव्हतीं, म्हणून सगळ्याच का निरुद्योगी उद्योग करीत होत्या असं तुझं म्हणणं? अग, सड्यामधें हेतु आहे. ज्या सॅनिटेशनच्या नांवानं तुम्ही इतकीं ओरडतां, त्या सॅनिटेशनच्या तत्त्वावर रचलेली आमची हिंदु राहणी आहे. जो वर्ग संस्कृतींत वर जात चालला, त्या वर्गांत ती राहणी धार्मिक आचार-पद्धतीच्या नांवानं जास्त पूर्णावस्थेस गेलेली आहे. मध्यंतरीच्या सुषुप्तीच्या काळांत, औदासीन्याच्या काळांत जरी त्याला थोडंसं विकृत स्वरूप आलं असलं तरी एकंदरींत विचार करतां आपण या बाबतींत अतिशय वरपर्यंत गेलेलों आहोंत. उंची वस्त्रावर केर उडाला, तर वस्त्र टाकणें हा शहाणपणा ठरत नाहीं. बाहेर जाऊन केर झटकून टाकायचा व वस्त्र वापरायचं!

**सरल**—मावशी, पण सडा घालणें यांत कोणती संस्कृति आहे ?

**मावशी**—अग, दारापुढील भाग स्वच्छ करणें ही चाल प्रत्येक देशांत नि प्रत्येक जातींत बहुधा आहे. मी असं ऐकतें कीं, विलायतेकडे सुद्धां बायका सकाळीं घराच्या पायऱ्या साबूनं धुतात. पारशी लोकांतही पाणी शिंपून रांगोळी घालायची चाल आहे. मग आपणां हिंदूमधें असणारी ही परंपरेची चाल आपण किरकोळ अडचणीचं निमित्त करून कां मोडायची ?

**सरल**—ही चाल चांगली असली तर झाडलोट करून आपण पाणी शिंपावं; पण त्यांत शेणाची घाण कशाला ?

**मावशी**—सरल, हा तुमचा बदलता दृष्टिकोन आहे. तुम्हांला फिनेल, डांबर, हें घाण वाटत नाहीं, आणि शेण घाण वाटतं. पण शेणाचा सडा घालायची प्रथा पाळण्यांत रानटीपणा नसून शहाणपणाच आहे. गाईच्या शेणांत जंतुनाशक धर्म आहे. म्हणून सकाळीं उजाडतांच आपल्या घरापुढं असलेली आदल्या दिवसाची सारी घाण बाजूला सारून, तेथील जंतु घरांत येऊं नयेत म्हणून, गाईच्या ताज्या शेणाचा सडा घालायची चाल आपल्या पूर्वजांनीं पाडून ठेविलेली आहे, आणि तो नुसता सडा डोळ्यांना आनंददायक होणार नाहीं म्हणून त्यावर सुंदरशी रांगोळी घालायची प्रथा आहे. ती घालण्यांत मनाला आनंद, हस्तकौशल्याची वाढ व बुद्धीलाही वैशिष्टय मिळतं. रोज नवी रांगोळी घालावी, शिकावी, जुळवावी, अशी हौस व स्पर्धा मुलींत वाढते आणि न कळत थोडंसं चित्रकलेचं ज्ञान मुलींना होतं. वसंत ऋतूंत स्वच्छसं अंगण, त्यावर तऱ्हतऱ्हेच्या रांगोळ्या, अशा ठिकाणीं सकाळच्या वेळीं अगर संध्याकाळच्या वेळचं, बसायला पुरुषांना व बायकांना किती आनंद

वाटतो ! हें पाहिलं म्हणजे चैत्रांगणाची प्रथा कां पडली असेल हें ध्यानांत येतं. पूर्वी घरोघरीं गाई असत, तिची सेवा करणं हें पुण्य समजलं जाई, त्यामुळं घरची मालकीण तिच्याकडे बघे. सकाळीं उठून तिचं दर्शन घेणं, चारा घालणं ही पुष्कळ पोक्त बायकांची चाल असे. ऐपतदारांकडे नोकराकरवीं नि गरिबांकडे स्वतः ताज्या शेणाचा सडा घातला जाई. त्यामुळं जंतु मरून कामानिमित्त येणाऱ्या निरनिराळ्या लोकांचे पाय प्रथम या सड्यावर पडून आंत प्रवेशिले जातात हाही एक फायदा आहे. मोलकरीण नसली तरी मालकिणीनं सडा घालावा, मात्र शिळ्या, घाणेरड्या, किडे पडलेल्या शेणाचा सडा घालूं नये, त्यापेक्षां नुसतंच पाणी शिंपावं.

**सरल**—मावशी, तुम्हीं या बाबतींत मला सुंदर नि पुष्कळ अशी किती तरी माहिती दिली.-खरंच सड्याची चाल बंद झाल्या-मुळं, रांगोळ्या काढायचं आम्ही अजीबातच विसरलों. वेडंवाकडं ड्रॉइंग येतं पण व्यवहारांतली रांगोळी कांहीं येत नाहीं.

**मावशी**—हें तुमचं आतांचं शिक्षण ! असं म्हटलं म्हणजे मात्र तुम्हांला राग येतो.

**सरल**—असं होतं खरं. पण मावशी, गाई तरी घरोघर कुठं असतात हो ताजं शेण मिळायला ?

**मावशी**—अग, गाईचं महत्त्व पटलं नि इच्छा असली तर एक गाय ठेवतां येण्याजोगीं पुष्कळ कुटुंबं मध्यम स्थितींत आहेत. मात्र धर्म खुंटाला बांधायचं गोरक्षण कोणी करूं नये. खेडेगांवांतनं दूध घालणाऱ्या गवळ्याला थोडं कांहीं दिलं, तर खरं थोडं शेण मिळतं. शेजारीपाजारीसुद्धां पूर्वी एकमेकांना शेण देत असत, पण दिवसानुदिवस पुष्कळांचीं मनं क्षुद्र होत चाललीं आहेत.

उष्ट्यापुरतं शेण मागायला म्हणून जायचं नि तें घरीं आणून पेटवणापुरत्या २।४ गोवऱ्या घालायच्या. मोलकरणी पाठविल्या तरी त्या तेंच करतात. एका मालकिणीच्या नांवानं शेण उपटायचं नि तीन घरीं पुरवून भलेपण घ्यायचं. त्यामुळं लोकांनाही परोपकार करायचा बंद करावासा वाटतो. खरोखरी जर बेताचंच शेण जरूरी-पुरतं नेणारे नेतील नि घराच्या सारवणासाठीं विकतचं आणतील, तर थोडं शेण द्यायला कोणीहि सुज्ञ गृहिणी नाहीं म्हणणार नाहीं. पण तें जर नसेल तर खुशाल पाणी शिंपावं. पण आतां लाट उलटली आहे. तेव्हां कदाचित् गोरक्षणाकरतां म्हणून पुष्कळ घरीं गाई दिसायला लागतील.

**सरल**—मावशी, तुमचं म्हणणं ऐकलं म्हणजे कांहीं नवी माहिती मिळते असं वाटतं; तेव्हां सध्यां मला जरी गाय ठेवतां येणं शक्य नसलं, तरी सकाळीं लवकर उठून दारापुढं सडा घालायची किंवा घालवायची सुधारणा मी जरूर करणार. मात्र त्यावर घालायसाठीं सुरेख सुरेख रांगोळ्या तुम्हीं शिकविल्या पाहिजेत.

**मावशी**—हो, जरूर. बाकी आतां पहिले दिवस उरले नाहींत. आमच्या लहानपणीं रांगोळी नि गाणीं शिकायला एकमेकींना किती आर्जवून घ्यावं लागे! आतां प्रत्येक गोष्टीचीं बुकं झालीं आहेत. याचा अर्थ तुला शिकवायला मी नाकबूल आहे असा मात्र नव्हे हो! मीं आपली एक गोष्ट सांगितली.

**सरल**—कबूल. जरी तुम्ही तशा अर्थानं सांगितलं असलं तरी मीं तें तशा अर्थानं घेतलं पाहिजे ना? मी आपली मावशीकडे येणार नि रोज नवी रांगोळी शिकणार.

हे शब्द भाऊसाहेबांनीं आंत येतांना ऐकले.

**भाऊसाहेब**—सरलताई, ही तुझी युक्ति तुझ्या मावशींना जरूर पटेल. रांगोळी शिकायच्या निमित्तानं रोज सकाळीं इथं येऊन एक नवी रांगोळी काढीत जा; म्हणजे मावशींना रांगोळी काढायचं काम कमी होईल; आणि तुमचे काय ते ठिपके-बिपके काढीपर्यंत मला चहा तरी मिळेल! हें बघ, या हिच्या सडा-रांगोळींत आज मला अजून चहा मिळाला नाहीं! हिला या असल्या संसाराच्या कामांत अजून बारा वर्षांच्या मुलीसारखा उत्साह नि आनंद वाटतो.

**सरल**—भाऊसाहेब, मग तर फार चांगलं! मीं कुठंसं एका इंग्रज ग्रंथकाराचं वाक्य वाचलं आहे, त्यांत त्यानं अशा उत्साही माणसाचं मोठं कौतुक केलं आहे.

**भाऊ०**—पण त्यानं आधीं नवऱ्यांना चहा द्यावा; तरुणांपेक्षां वयस्क माणसांना लवकर चहा लागतो हें नाहीं वाटतं लिहिलं!

इतक्यांत मावशींनीं चहाचा ट्रे आणला नि म्हणाल्या, "सरल, बस चहा घ्यायला. घरीं बापूंचा चहा झालाय का? का त्यांना बोलावूं?"

**सरल**—झाला आहे. आज आम्ही लवकर उठलों होतों, तेव्हां चहा आटपून उभ्या उभ्या इकडे आलें. अजून भांडीं पडलींच आहेत.

**भाऊ०**—बघ! ती एवढीशी असून कशी पतिव्रता आहे! नवऱ्याचा चहा-पाणी आटपून आली, नाहीं तर तुम्ही! त्या सड्याचं महत्त्व सांगण्यांत आमचा चहा चुकवलांत. आणि कां, तर म्हणे सड्याचं व्याख्यान! एकाद्या प्रोफेसरानंसुद्धां अर्थशास्त्रावर किंवा इतिहासावर इतक्या तन्मयतेनं लेक्चर दिलं नसतं, इतकं लेक्चर हिचं तुला चाललं होतं. इतक्यांत ब्राह्मणानं येऊन चहाचं मांडलं

देखील, नि मी जाऊन चहादाणींत चहाची पूड घालून त्याच्याकडनं पाणीसुद्धां ओतवलं, तरी हिचं व्याख्यान मोठ्या तन्मयतेनं सुरूच होतं. जसं कांहीं एकादा प्रोफेसर लेक्चरच देतो आहे.

**सरल**—खरोखरीच. भाऊसाहेब, आमच्या गृहकृत्यांतल्या मावशी प्रोफेसरच शोभतील. ( भाऊसाहेब मोठ्यांदा हसले. )

**मावशी**–सरल, तूं गप्पांत गुंतलीस म्हणजे तुझीं कामं राहतील. तूं आपली चटदिशीं आटप कशी ?

**भाऊसाहेब**—बघ, बघ ती तुला घालवते आहे.

**सरल**—खरंच. मला जायलाच पाहिजे कीं ! हो, मावशी मी तुम्हांला विचारायला आलें होतें कीं, संध्याकाळीं चार वाजतां माझ्याकडं यायला फावेल का ? मग मी काय काम आहे तें सांगेन. उशीर झाला, मी जातें.

---

# प्रकरण ३ रें

गोदुग्ध गेले, चहा मान्य झाला ।
जगीं शक्तिपाता करूं हा निघाला ।

सरल आधण ठेवून बसते तोंच मावशी आल्या नि म्हणाल्या, "काय बाई तुझ्या टाइमाला पोंचलें कीं नाहीं, आम्ही आपली अडाणी माणसं ! मग तूं हसायचीस !

**सरल**—कां हो मावशी, असं करतां ? तुम्ही का अडाणी ! झालंच मग. अगदीं वेळेवर आलांत हं. हा पहा मीं चहा केलाय पण आमच्याकडे पेले दोनच आहेत.

**मावशी**—अग, तिसरं पाणी प्यायचं भांड आण. मला आवडतं.

मग सरलनें दोन पेल्यांत नि तिसऱ्या फुलपात्रांत चहा गाळला, इतक्यांत बापू आंत आले. इतक्यांत मावशींनीं आपलें फुलपात्र उचललें.

**बापू**—मावशींना फुलपात्र कशाला ? तें मला दे. दोघी पेले घ्या.

**मावशी**—तें नाहीं तुम्हांला जमायचं. तुम्ही कधीं अजून फुलपात्रांतनं चहा प्याले नसाल ! मीं लहानपणीं प्यालें आहे. शिवाय त्यांत माझा फायदाही आहे, पेल्यापेक्षां यांत चहा अधिक मावतो. बरं, सरलाताई, मला कां बोलावलंस ? सांग.

**सरल**—हं. याचसाठीं. चहाचा सेट विकत आणायचा आहे. इथं जवळच मोठं दुकान आहे. तेव्हां मीं म्हटलं, चहाचा सेट आपल्या आपण पसंत करून आणावा !

**मावशी**—तुझी कल्पना बरी आहे, बायकांना लागणारीं भांडीं बायकांनीं आणलीं तर कांहीं वावगं नाहीं. पण चहाचीं भांडीं

दोघांपैकीं कुणीही पसंत करून आणलीं तरी चालतात. कारण तीं दोघांनाही सारखींच लागतात.

**बापू**—कसं अगदीं बरोबर बोललांत मावशी ! पण मीं आपले माझे अधिकार सोडले.

**मावशी**—( हसून ) ठीक केलंत. पण सरलताई, चहाचा सेट आणायची तुझी कल्पना मला पसंत नाहीं. पेले म्हटले तर कबूल. अडीअडचणीला असावेत.

**बापू**—सेट कां नको ?

**मावशी**—अहो, सेट हा नेहमीं महाग पडतो. फुटकळ पेले स्वस्त असतात. चांगल्या टिकाऊ सेटला अधिक किंमत पडते. अजून तुमचा संसार नवा आहे, त्याची स्थिरस्थावर व्हायची आहे तरी एव्हांपासूनच आपण घरंदाज माणसांचा आव आणून राहूं नये. मोठ्या प्रमाणावर राहायला लागायला वेळ लागत नाहीं, पण मग तें आवरलं जात नाहीं. जगांत व्यवहार दोन प्रकारचे असतात- एक जरूरीचा नि एक अनावश्यक. उदाहरणार्थ—तुमच्याकडे कोणी नातलग आलाच तर त्याला चहा देणं हा अवश्य व्यवहार. मी पुष्कळ नव्या जोडप्यांचे संसार बघतें. त्यांतले दुर्दैवानें अयशस्वी झालेलेही कांहीं बघतें. त्याचं कारण व्यवहार चुकणं हें आहे. सुखी कुटुंबांतील जी पतिपत्नी असतात, त्यांनीं आपल्या घरांतून थाट आदर-सत्कार पाहिलेला असतो, त्याचा परिणाम तीं आपल्या घरीं करायचा प्रयत्न करतात नि शेवटीं नुकसानींत येतात. माझी एक भाची इथं कांहीं दिवसांपूर्वीं होती. दोघंही घरचीं सुखी. आल्या-बरोबर नव्या उपकरणांसह संसार सजवला. गांवांतल्या समवयस्क मित्र-मैत्रिणींचा चहा, पोहे नि गप्पांचा अड्डा सुरू झाला, मग तो आवरला जाईना. ही म्हणाली म्हणून आपल्या नवीन नवीन

मैत्रिणींना उतरायला या म्हणून आग्रह करायचा. पुढें तो पसारा वाढायला लागला. कामाची सवय नसल्यानं तिला ते श्रम झेपेनात. आल्यागेल्याचं स्वागत यथास्थित व्हावं ही उत्सुकता, त्यामुळं शेवटीं ती थकून वरचेवर आजारी पडायला लागली. फार मोठे पगार देऊन नोकर ठेवण्याजोगी त्यांची परिस्थिति नव्हती. त्यामुळं संसारांत नेहमीं ओढघस्त व्हायला लागली व येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांचा, स्नेह्यासोबत्यांचा पडलेला परिपाठ तर मोडला जाईना. अखेर आर्थिक दृष्ट्या दुःखी होऊन, मानसिक दृष्ट्या कष्टी होऊन येथून जावं लागलं.

**सरल**—मग काय मावशी ! कधींच का कोणी पाहुणा बोलावूं नये. असं का तुमचं म्हणणं ?

**मावशी**—जवळजवळ होच. तुमच्यासारख्या नव्या कुटुंबानं होतां होईलतों पाहुणा बोलावूंच नये नि अति आग्रहाला बळीही पडूं नये. चुकून पाहुणा आलाच तर अनादर न करतां, जेवायला घालून सोडावं.

**बापू**—पण आपण नवा संसार मांडला म्हणजे आपल्या मित्र-मैत्रिणींनीं आपला नवा संसार येऊन पाहावा, अशी हौस या वयांतच असते.

**मावशी**—कबूल ! पण ज्या मित्र-मैत्रिणींना तुमचा संसार पाहण्याचं खरोखरीचं कौतुक वाटत असेल, तीं आपण होऊन येतात. नि परिस्थिति ओळखून जसं नि जितकं राहायला हवं तितकं राहून तुमचं कौतुक करून जातात. पण कांहीं वेळां उत्साहाच्या भरांत नव-दांपत्य भराभर मित्रपरिवार वाढवीत असतं नि ह्या फुकट्या स्नेह्यांच्या उठाठेवींत व आपल्या मोठेपणाच्या कल्पनेंत शारीरिक नि आर्थिक हानि करून घेतात. बीं लावलं

म्हणजे त्याचा जसा हळूहळू वृक्ष होतो, तसा संसार हा हळूहळू पसरला पाहिजे.

**सरल**—मग काय करावं असं तुमचं म्हणणं ?

**मावशी**—अग करायचंय् काय ! माणूसघाण्यासारखं राहावं असं का मी म्हणत आहे अशी तुझी समजूत आहे ? पण उदाहरणार्थ पहा— आतां तूं माझ्याकडे येतेस, माझ्याकडे किती तरी बायकांची नि तुझी गाठ पडते, त्या प्रत्येकीला जर तूं म्हटलंस, आमचेकडे याहो, तर त्या येतील; नि तितक्यांना तूं चहा द्यायचा ठरवलंस तरी चालेल. तूं एकादा जिन्नस घरांत केलास, प्रत्येक ओंळखीपाळखीच्यांना हातावर द्यायचा ठरवलास तरी संपेल. पण तें आज करणं योग्य होणार नाहीं. कारण एकदां आपण यांत पडलों, म्हणजे आपणाला मुळींच वेळ मिळत नाहीं. मनुष्याला कांहीं कर्तृत्व करायचं असेल तर हीच वेळ आहे. शिवणं, विणणं, वाचन, चित्रकला, वादन, लेखन यांपैकीं कोणत्याही आवडीच्या कलेंत प्रगति करून घ्यायला हेच सुखाचे नि सोईचे दिवस आहेत. त्याचा फायदा तुम्हीं करून घेतला पाहिजे. कंटाळा आला तर माझ्यासारख्या मावशीकडे जावं, घटकाभर बसावं, चहा घ्यावा, खावं, हिंडायला जावं नि पुन्हा आनंदानं उद्योगाला लागावं. म्हणजे कांहीं तरी कार्य होईल.

**सरल**—म्हणजे, तुम्हांला कधींच चहा देऊं नये का ?

**मावशी**--द्यावा तर, आम्ही होऊन जेव्हां कौतुकानं तुमच्याकडे येऊं तेव्हां द्यावा, म्हणजे पैशाच्या दृष्टीनं तुमचा संसार थोडा रंग-रूपाला येईल. विश्रांतीच्या दृष्टीनं शरीर नि मन सुधारतं, ज्ञानाच्या दृष्टीनं संपन्न होतां येतं, निरीक्षणानं व्यवहारज्ञान वाढतं नि मग जगाच्या बाजारांत जरा तयारीनं उडी घालतां येते नि ती सुखावह

होते. आज नोकर–चाकर, भांडींकुंडीं, क्वचित् प्रसंगीं जागा यांची घडी बसलेली नसते. अशा वेळीं ओळखी पाळखीच्या माणसांना आग्रह करून या म्हणायचं नि त्यांपैकीं कांहींनीं जणों तुमच्यावर उपकार करायकरतां यायचं यांत काय वैशिष्ट्य आहे ? उदाहरणार्थ–परवां ती तुझी एक मुलगी येऊन गेली. तिची राहणी कशी दिसली ? " तुझ्या आग्रहाकरतां आले बाई, तुझ्या आग्रहाकरतां आले बाई."

**सरल**—त्या दिवशींच तें मला दिखील वाटलं मावशी बरं का ? पण मग काय आपल्या मैत्रिणींना माझ्या घरीं या असं म्हणायचं नाहींच का ?

**मावशी**—नाहीं; सध्यां नाहींच म्हणायचं. ज्या मैत्रिणींना यावसं वाटेल, त्या गांवांत आल्या म्हणजे आपणहून चौकशी करतील, त्या आपणहून आल्या म्हणजे मग चहापाणी, खाणंपिणं हें स्वागत कर. पण आपल्या पदरचा खर्च करून, साऱ्यांना गोळा करून उठाठेव करून महत्त्वाच्या वेळाचा दुरुपयोग काय म्हणून करतेस ? आयुष्यांत अशी महत्त्वाची वेळ फार थोडी मिळते. याच वयांत कार्य कर, कर्तबगारी दाखव, ज्ञान मिळव आणि मग पुढं ये. अपुऱ्या साधनांनीं पुढं येऊं नका. पुढं आल्यानंतर मागं हटूं नका.

**बापू**—मावशी अगदीं हेंच, हेंच आमची आई सांगत असे. पण ती बिचारी अशिक्षित असल्यामुळं तिला तें असं सुंदर तऱ्हेनं पटवतां येत नसे.

पण ती नेहमीं म्हणत असे कीं, गप्पा हें व्यसन आहे. माणसानं खंडीभर मित्र गोळा करण्यापेक्षां कांहीं तरी उद्योग करावा नि तो करतांकरतां योगायोगानं जे मित्र जडतील नि मैत्री टिकवतील तेच खरे मित्र. आम्ही लहानपणीं कोणी मुलगा गोड बोलला कीं,

त्याला मित्र म्हणून समजून गळ्यांत हात घालायचा. आईला आत्यंतिक चीड येई. कॉलेजांत सुद्धां रोज नवे मित्र जडायचे नि मग सिनेमा, ड्रिंक, हॉटेलिंग हें स्वाभाविकच चालायचं. पुढं मैत्रीच्या वाढत्या परिवारांत सिनेमा, ड्रिंक यांची देवाण-घेवाण करण्यांत नि भेटी-परतभेटी करण्यांत आमचा किती तरी वेळ फुकट जायचा. त्याबद्दल, मित्रपरिवाराबद्दल आईनं एकही शब्द उच्चारलेला आम्हांला परवडत नसे. आम्ही आईला अशिक्षित अतएव आडमुठी आहे, नि म्हणूनच तिचे असे हे कोते नि चिक्कू विचार असे समजत असूं.

**मावशी**—शिक्षणानें मनुष्याच्या ज्ञानाला पैलू पडतील, पण वय, अनुभव, निरीक्षण व ममत्व यांनीं कुठलीही आई कमी दर्जाची नसते. म्हणून नेहमीं विद्यार्थिदशेंत एकच प्रवृत्ति पाहिजे. आधीं आज्ञापालन नंतर कर्तव्य ( First obey then duty ); पण आतां या नव्या जमान्यांत विशेषतः या वर्षांत तरुणांचा बुद्धिभेद करून त्यांचा उपयोग दुधारी शस्त्रासारखा करून, प्रत्येक कुटुंबांतील सुखशांतीचा नाश केला जातो आहे. प्रत्येक काळांत प्रगति असते, पण वडिलांना संतोषवून होणारी प्रगति, त्यांना सुखवायासाठीं आपल्या अनेक मतांवर, आचारविचारांवर ताबा ठेवून सवडीनं प्रगति करायची प्रवृत्ति नि कुणाच्याच विचारांचा विचार न करतां मनपसंत वागण्याची प्रवृति हीं दोन टोकं नव्या-जुन्या-प्रगतीचीं आहेत. असो उशीर झाला. चल सरलताई, या बडबडण्याचं बक्षीस म्हणून तुला मी चहाचा तुझ्या आवडीचा सगळा सेट घेऊन देतें.

**सरल**—नको, मावशी, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणं आज आपण नुसतेच पेले आणूं या.

# प्रकरण ४ थें

सकाळीं उठोनि चहासी भजावें ।
कॉफीसी वंदावें, जीवेंभावें ॥

आज सकाळीं उजाडतांच भाऊसाहेब मावशीसह सरलच्या बिऱ्हाडीं येऊन दाखल झाले. सरल चहाच गाळीत होती.

**भाऊसाहेब**—अग, हिनं काल तुझ्या चहाच्या नव्या सेटचं मारे बहारीचं वर्णन केलं. तेव्हां म्हटलं आज त्यांतलाच चहा पिऊन पाहावा.

**सरल**—जरूर, म्हणूनच का येतांना चहा-कॉफीचं 'वंदन' म्हणत येत होतात !

**मावशी**—अग, तीं तर सकाळची 'भूपाळी' हो त्यांची ! सकाळीं उठल्यावर देवाला काय आळवायचं ! चहालाच आळवावं. असं म्हणून ते स्वकृत 'भूपाळी' म्हणतात.

**भाऊसाहेब**—अं, जाऊं दे, तें आपलं आमचं ! काय, तुझा चहा झाला का ? का व्हायचा आहे ? व्हायचा असला तर पांच पेले कर. अन् झाला असला तर मला नि बापूला दे आणि मग तुम्ही आपल्या मागनं करून घ्या. नाहीं तरी बायकांनीं पुरुषांबरोबर घ्यायचाच नसतो.

**बापू**—भाऊसाहेब तुमची सूचना मला पटली बुवा ! आपण दोघंही हा तयार चहा घेऊं या.

असें म्हणून बापूनें गाळलेले दोन्ही पेले उचलले नि एक भाऊसाहेबांच्या हातीं देऊन एक आपण घेतला. चहा पिऊन झाल्यावर भाऊसाहेब म्हणाले, " तुझा चहा तुझ्या मावशीपेक्षां देखील सुंदर

झाला आहे आणि तो विशेषेंकरून सुंदर पेल्यांत असल्यामुळं फारच टेस्टदार वाटतो."

बापू आपला हसत होता.

**भाऊसाहेब**—काय हो बापूराव, तुम्ही हसतां का?

**बापू**—नाहीं, नाहीं. मला वाटलं, मोठ्या माणसांना देखील लहानाला हरभऱ्याच्या झाडावर चढवायची विद्या चांगलीच ठाऊक असते!

**भाऊसाहेब**—म्हणजे तुम्हांला हें असलं कांहीं येत नाहीं वाटतं! अरेरे! मग फुकट तुम्ही एवढं शिकलांत. एक वेळ डिग्री नसती मिळवलीत तरी चाललं असतं; पण बायकांना खूष करायचं हें कसब आधीं यावं लागतं. मी पहा बरं! हिला इतकं खूष करीत असतों कीं बोलायची सोय नाहीं. अहो बापूराव, तुम्हांला मी एक गुरुकिल्ली सांगून ठेवतों, जर तुम्हांला बायकांकडून उत्तम तरतूद करून घ्यायची असेल तर वेळीं-अवेळीं गोड बोलणं, घाईत असलं तरी एकादा विनोदी शब्द उच्चारणं, वरचेवर स्तुति करणं, तिच्या कामाला चांगलं म्हणणं वगैरे वगैरे नेहमीं करीत गेलं पाहिजे. फारशा किमतीच्या नसणाऱ्या वस्तु ती मागण्यापूर्वींच आणून देणं. हे सगळे बायकोचे पतिदेव होण्याचे साधेसुधे, सोपे नि सुलभ असे रामबाण उपाय आहेत. म्हणजे मग आपल्याला देव्हाऱ्यांत बसून पूजा करून घ्यायला कांहींच हरकत नाहीं. हें काम करतांना आपला वेळही मोडत नाहीं.

**सरल**—म्हणजे! भाऊसाहेब, तुम्ही मावशीशीं वागतां तें सारं खोटं, असं धरूनच चालायचं का?

**भाऊसाहेब**—आमचं सारं बोलणं, तूं ऐकतच का होतीस?

माझ्या लक्षांतच नाहीं हें ! मी खाजगी म्हणून बापूरावांशीं बोलत होतो. तूं नाहीं ना ग ऐकलंस !

मावशी हसल्या.

**बापूराव**—भाऊसाहेब, तुम्हांला आम्हा लहानांत देखील कसं मिसळतां येतं हो ?

**मावशी**—तें कांहीं विचारूं नका, वेळ जायला कुणी नसलं तर पोरं सुद्धां चालतात.

**भाऊसाहेब**—अरे, म्हणून तर ही आतां माझा मुळींच मान ठेवीत नाहीं. बरं, चला बापूराव, आपण इथं बसलों तर या बायकांचा चहा प्यायचा राहील ना ? नि मग निष्कारण तुम्हांला नि मला शिव्या ! कारण असं बघा या गप्पा ऐकायच्या नादांत त्या सरलनं अजून चहासुद्धां केला नाहीं.

असें म्हणून ते दोघे उठून बाहेर गेले. मावशी नि सरल चहा पीत बसल्या. तोंच मोलकरणीनें भांडीं घासून आणून चुलीपुढें पालथीं घातलीं, तशीं मावशी म्हणाल्या, " हें ग काय ? हीं भांडीं पालथीं का घालते ! "

**सरल**—आमच्याकडे तसं कडक सोवळ्याचं आतां कोण आहे ? आम्हां दोघांना कांहीं तसं सोवळं-ओवळं नाहीं आहे बाकी मी कांहीं अगदींच कुणब्याच्या हातचीं घेत नाहीं अं ! नाहीं तर तुम्ही म्हणाल, मला कसा चहा पाजतेस ग !

**मावशी**—अग, सोवळ्या-ओवळ्याकरतांच का भांडीं विसळून घ्यायचीं असतात !

**सरल**—नाहीं तर दुसरं काय ? मावशी रागावूं नका हं. पण जुन्या बायकांचं घासलेलं घासायचं नि धुतलेलं धुवायचं, हें

सोवळं-ओवळं आतां नको का सुटायला? नाहीं तर सारा दिवस त्यांतच जातो. दुसरं कांहीं काम करूं म्हटलं तर होतच नाहीं.

**मावशी**—हें सगळं काम सोडलं, तरी तुम्ही सगळ्याजणी असं कोणतं महत्त्वाचं काम करून दिवे लावणार आहांत? आजपर्यंत इतक्या शिकल्या-सवरल्या मुली निघाल्या, त्यांनीं काय केलंय् दाखव मला! कांहींजणींनीं एकादा क्लब काढला असेल; किंवा असलंच कांहीं तरी केलं असेल. खऱ्या कार्यकर्त्या बायका हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्यासुद्धां नाहींत.

**सरल**—मावशी, बायकांना कां नांवं ठेवतां हो! पुरुष तर बायकांपेक्षां किती तरी पट अधिक शिकलेले आहेत. त्यांनीं काय केलं आहे?

**मावशी**—कां बरं नाहीं? ते आपलं कर्तव्य कधींच विसरले नाहींत. तुमचं कर्तव्य तुम्हांला विसरायला लावायचं पाप मात्र त्यांनीं केलं. पण स्वतःची ड्यूटी मात्र ते बरोबर बजावताहेत हो! पुरुषांच्या मागं लागलेली कुटुंब पोषणाची ड्यूटी, त्यांनीं एक दिवसही चुकवलेली नाहीं. ती बजावून मग उरल्या वेळांत त्यांनीं दुसरं काम करावं अगर करूं नये. त्याबद्दल त्यांना कोणीही बोलूं शकणार नाहीं. तशीच तुम्हांला गृहिणीपदाची ड्यूटी आहेच. ती तुम्ही व्यवस्थित बजावून मग दुसरं काम करा अगर नका करूं, त्याबद्दल आम्ही तुम्हांला कांहीं एक दोष देणार नाहीं. पण दुसऱ्या कामाला वेळ मिळत नाहीं, म्हणून प्रपंचाच्या कामाची हेळसांड करायची नि दुसरं तर कांहींच करायचं नाहीं तें नाहींच.

**सरल**—मावशी, आम्ही काय हेळसांड करतों?

**मावशी**—हें बघ, तूं रागणार नसलीस तर तुला सांगतें.

**सरल**--नाहीं मावशी, मला तुमचा मुळींच राग येत नाहीं. उलट आई म्हणत होती, त्याचं मला सारखं प्रत्यंतर येत आहे.

**मावशी**--तर मग असं बघ, तुम्हीं आमच्या सोवळ्या-ओवळ्याची भारीच टिंगल करतां! पण .फार कशाला तुला मी इथंच दाखवतें ( असें म्हणून एका मोठ्याशा पातेल्यांत त्यांनीं तपेलीभर पाणी घेतलें नि तीं भांडीं चोळून चोळून विसळून काढल्यावर तें पाणी सरलला दाखवलें. ) तें पाहून--

**सरल**--ईऽऽग बाई, किती घाण पाणी!

**मावशी**--आतां बघ, तुमच्या सोवळ्याच्या टिंगलीनं नि आळशीपणानं तुम्ही इतकी घाण जेवणारांच्या पोटांत घालतां.

**सरल**--खरंच, मावशी, आपलेकडले नोकरच खराब. या नोकरांना दिखील, शाळा नि सर्टिफिकीटंच पाहिजेत.

**मावशी**--तें इतर देशांत काय आहे मला ठाऊक नाहीं. मी कांहीं परदेशीं जाऊन आलेली नाहीं. पण आमच्या देशांत आज ही परिस्थिति आहे खरी. हा सारा विचार करूनच आमच्या पूर्वजांनीं सोवळ्याच्या रूढि पाडल्या आहेत. बारा घरीं भांडीं घासणारी मोलकरीण प्रत्येक घरीं जर दोन-तीन पाण्यांनीं भांडीं विसळून, मोरी धुऊन नंतर जायचं ठरवील, तर मग कशाला पाहिजे! आमची गंगू स्वतंत्र एका घरची मोलकरीण आहे ना! पण तिची सुद्धां हीच रड.

**सरल**--मावशी, आपल्याकडल्या मजुरांना पगार कमी पडतो, म्हणून का असं होतं!

**मावशी**--नाहीं. हें दाखवायचं कारण आहे. खरं असं आहे कीं, अस्वच्छता नि आळस हा त्यांच्या हाडीं-मांशींच खिळलेला आहे. आमच्या गंगूला दहा वर्षें झालीं, तिच्या आधींची बाई बारा

वर्ष होती. पण आपलं लक्ष नसलं म्हणजे भांडीं एका पाण्यांत बुचकळायचीं, मोरी धुवायची नाहीं. ही तिची सवय कांहीं गेली नाहीं. तेव्हां हा अवगुण पगाराचा नाहीं. कारण मी त्यांना भरपूर पगार देतें, औषधपाणी, दुखणं-बहाणं किती काढतें हें तुला ठाऊकच आहे ! पण एका बादलींत चहाचे सगळे पेले गड-बडगुंडा करणं ही त्यांची सवय कांहीं जात नाहीं, म्हणून आपण भांडीं विसळायचीं असतात; त्यामुळं पोटांत राख जात नाहीं. राखेबरोबर घाणेरडे जंतुही जात नाहींत. म्हणून निदान तुम्ही सेप्टिक सेप्टिक म्हणणाऱ्या मुलींनीं तरी या गोष्टी अवश्य कराव्यात. भांडीं विसळणं, घरांतल्या मोऱ्या धुणं, चुली-शेगडचा सारवणं, माजघरचीं पोतेरं अगर फरशी असल्यास ती धुणं या गोष्टी आत्यंतिक महत्त्वाच्या आहेत. जरी नोकर-चाकर असले तरी मालकिणीनं हीं कामं झालीं कीं नाहींत, हें स्वतःच बघायला पाहिजे. मोऱ्या-गटारांतून फिनेल टाकवणं हेंही तितकंच महत्त्वाचं काम आहे. खऱ्या गृहिणीला वेळ पडतांच हीं कामं स्वतां करायची सुद्धां लाज वाटतां कामा नये.

**सरल**—मावशी, भांडचांचं एक समजलं. पण पोतेऱ्याचं काय हो एवढं महत्त्व आहे ?

**मावशी**—अग दिवसभर आपण ज्या जागीं खातों-पितों, निरनिराळ्या तऱ्हेचे पदार्थ करतों, ते थोड्याफार अंशांत त्या जागेवर पडलेले असतात. ते पोतेऱ्यानं जातात. कारण ताज्या शेणांत असणारा धर्म मीं तुला सांगितलाच आहे. नाहीं तर असं बघ, जिथं नुसती फरशी असते, तिथं जेवणानंतर नुसता पाण्याचा बोळा फिरवला जातो, तिथं किती माशा घोंगावतात, त्या जागेला कसा एक प्रकारचा कांहीं तरी कुबट वास ( घाण ) येत असतो ! त्यासाठीं

शेगडींत गोवरीचं खांड घालून, ती शेगडी आलटून पालटून ठेवावी म्हणजे तो वास नाहींसा होतो. यासाठींच पोतेऱ्याची चाल आहे. म्हणजे सकाळीं एकदां सर्व घर स्वच्छ होतं.

सारांश काय, कीं एक वेळ दिवाणखाना नीट ठेवला नाहीं तरी चालेल. तो पुरुषांचा प्रांत आहे. पण जेवणघर नि स्वयंपाकघर हें आपलं राज्य आहे. इथं शक्य असेल तितकी (फुरसत होईल तसतशी) कष्टाची स्वच्छता करणं हें आपलं कर्तव्य आहे. सकाळच्या वेळीं धुऊन-सारवून स्वच्छ केलेलं घर, अंगण नि त्यावरील सुंदर रंगवल्लिका पाहून मनाला आनंद वाटतो नि गृहिणीबद्दल मनांत आदरयुक्त कौतुक निर्माण होतं. अशाच घरांत वावरणारे पुरुष हाव वाढून महत्त्वाकांक्षी बनतात. जुन्या बायका म्हणतात कीं, अशाच घरांतनं लक्ष्मी वास करते. पारशी वगैरे जातींत रांगोळी ठशांनीं घालतात. पण आमच्या मुलींना हातानं सुंदर रांगोळ्या घालायाचं पिढीजात मिळालेलं शिक्षण मात्र त्या घालवून बसतात. एका कवीनं देखील कुठंसं अशा तऱ्हेचं एका नगरीचं वर्णन करतांना म्हटलं आहे कीं,

**प्रातःकाळीं नगरवनिता कुंकुमाच्या सड्यांनीं।**
**रांगोळ्यांनीं अधिकच जया देति शोभा झटोनि।**

# प्रकरण ५ वें

**ऐसें कैसें हें सोवळें । शिवतां होतसें ओवळें ।**

**किंवा**

**नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ।**

आज सकाळीं लवकर उठून बापू नि सरल जवळच कांहीं बघायला गेलीं होतीं. तीं आठाला परत आलीं नि थेट मावशीकडे आलीं. अलीकडे त्यांना वरचेवर मावशीकडे आल्यावांचून चैनच पडत नसे. आंत शिरतांच बापूरावांनीं सुरुवात केली—

" मावशी मी चहाला आलों आहे ! "

**मावशी**—हरकत नाहीं, मी करून पाठवतें अं !

**बापू**—असा पाठवून नको. तुम्हीसुद्धां घ्यायला आलांत तरच गंमत, नाहीं तर काय आम्ही आपले घरींच घेऊं.

**भाऊसाहेब**—अहो, या वेळीं ती सोवळ्यांत असणार, ती का आपल्यासारखी बाडगी आहे ! तिच्या समवेत घ्यायचा असला, तर आपल्याला तिच्या स्वराज्यांत गेलं पाहिजे. मला वाटतं हें तुम्हांला सुद्धां कबूल होईल.

**बापू**—अरेच्या ! मावशी इतकं सोवळं करतात का ?

असें म्हणत सारी मंडळी आंत गेली. तोंच ब्राह्मणानें पेले-बशांचें एक तबक तेथें आणून ठेवलें नि एका बाजूला पाट घालून मावशी बसल्या, मंडळी चटई पसरून दुसऱ्या बाजूस बसली.

**बापू**—काय हो, मावशी, तुम्ही अजून इतकं सोवळं पाळतां का ? वास्तविक सोवळ्यांत काय अर्थ उरला आहे हो !

**मावशी**—अहो संतांनीं दिखील सोवळ्याची निंदा केली आहे

पण त्याचा अर्थ त्यांनीं सोवळं करूं नये असं मात्र म्हटलं नाहीं. जसं आपण एकाद्याला म्हणतों कीं, इकडे देवधर्म करतो नि तिकडे अमक्या तमक्याचे तळतळाट घेतो. तरी त्याचा अर्थ त्यानं देवधर्म करूं नये असा नसतो, तर लोकांचे तळतळाट घेऊं नयेत, असाच असतो. तसंच हें सोवळ्याचं आहे. सोवळं म्हणजे स्वच्छता, पवित्रता. नुसती स्वछता हवी म्हणून ती कोणीही पाळीत नाहीं. आणि याचसाठीं त्याला प्रत्येक जातींत कांहीं तरी बंधन घातलेलं आहे. मात्र आपली नवी मंडळी तिकडे लक्ष देऊन बघतच नाहींत. उलट सगळ्यांचीच टिंगल मात्र करीत असतात. उदाहरणार्थ—त्यांचा डिनरचा पोषाक. ही चाल ते किती कसोशीनें पाळतात. त्यांच्यांत आमचे मिसळणारे लोकही किती कसोशीनें पाळतात. त्यांत तरी काय हेतु आहे! डिनरचा स्वतंत्र लोकरी पोषाख करायचा, तो डिनरपुरताच वापरायचा. याचं कारण तरी स्वच्छताच नाहीं का? लोकरी कापडावर जंतु केव्हांही कमी बसतात, तें विद्युत्भरित असतें, नि निराळ्या उद्योग-धंद्यांतून, निराळ्या ठिकाणांतून फिरून आलेले कपडे अर्थात्च संसर्गजन्य असतात. ते बदलून हे कपडे घालायचे हा शहाणपणाचा विचार त्या पोषाकांत केलेला आहे. तोच विचार आमच्या पण पूर्वजांनीं केलेला आहे. मोठ्या महत्त्वाच्या प्रसंगीं पीतांबर, पैठण्या नेसून बसण्याची प्रथा आमच्या इकडे होती, पण तुम्हीं लोकांनीं सोवळ्याला नांवें ठेवींत ठेवीत आमच्या चांगल्या चालींना फाटा दिलात. सोवळ्याचं बंधन नसलं म्हणजे आपण वाटेल तेथून हिंडून फिरून येऊन एकदम अन्नापर्यंत जातों. आपले हातपाय, कपडे सारेच पुष्कळदां घाण असतात. सोवळं म्हटलं कीं तिथं बंधन नि स्वच्छता ही आलीच.

**बापू**—मावशी, पण ते मुकटे नि त्या धाबळ्या—रामा ! कितीहो स्वच्छ असतात?

**मावशी**—बरं बोललांत. कारण या मुकटे-धाबळ्यांवर कुठं तरी लिहिलेलं वाचलं होतं, कीं ऐकलं होतं असं मला आठवतं, पण ही किनई बुद्धिभ्रंश करायची विद्या आहे. पुरती माहिती घेतल्याशिवाय उगाच कांहीं तरी तर्कटं चुरचुरीत भार्षेत लिहिलीं, म्हणजे तीं खरीं असतात, असं कां तुम्हांला वाटतं ! मुळांत मुकटे धुतले जात नाहींत ही जी तुमची तक्रार आहे तीच मुळीं खोटी आहे. जीं मोठीं सोवळीं देवपूजेपुरतीं किंवा जेवणापुरतीं दहा-पंधरा मिनिटंच नेसतात, तेवढींच वरचेवर धुतलीं जात नाहींत, पण तीं सुद्धां कांहीं मुदतीनं धुवावींच लागतात. श्राद्धपक्ष, द्वादशी, चतुर्थी, ग्रहण, हव्य-कव्य, घरांतिल पुरुषांचीं वापरलेलीं सोवळीं या प्रसंगीं तर धुवावींच लागतात. नि बायकांचे मुकटे जे कामकाजांत हमेष वापरले जातात, ते जेवल्याबरोबर धुवावे लागतात. कारण जेवलेला मुकटा पुन्हा देवाच्या नैवेद्याच्या स्वयंपाकाला चालत नाहीं. फक्त प्रासंगिक नेसावं लागणारं सोवळंच तेवढं रोज धुतलं जात नाहीं. पण तें बंधन नसलं म्हणजे मनुष्य कसं अव्यवस्थित वागतं याचं उदाहरण आपण अलीकडे नेहमीं पाहतोंच. हल्लीं मुलं वेळीं-अवेळीं हजामत करून डोकीं धुतात, ही का स्वच्छता म्हणायची ! केव्हां तरी परसाकडे जायचं म्हणून जेवल्यावर परसाकडे जावं तसंच हें आहे. बंधन पाळायचं नाहीं, असं ठरल्याबरोबर मनुष्य कसं अव्यवस्थित होतं पहा—एका घरीं तर मीं पाहिलं कीं, दुपारच्या वेळीं बैठकीच्या खोलींत सारी घाण पडलेली होती.

**बापू**—मावशी, असा अव्यवस्थित असेल एकादा, म्हणजे सोवळं न पाळणारे सारेच अव्यवस्थित असतात असं का तुमचं म्हणणं ?

**मावशी**—होय ना, तसंच सोवळ्याचं आहे. अर्थ न समजतां जे सोवळ्याची कवाईत करतात, त्यांच्याचकडे पाहून तुम्ही त्यांची टिंगल करूं नका. सोवळं म्हणजे पवित्रता. जी जी पवित्र वस्तु ती सोवळी. देवाची पूजा पवित्रतेनंच करायला पाहिजे अन्न पवित्र मनानं व आचरणानंच शिजवलं पाहिजे आणि म्हणूनच तिथं सोवळ्याची योजना केली आहे. मूर्खासारखं जो सोवळं करील त्याची आमच्या संतांनीं सुद्धां टिंगल केली आहे. सोवळं म्हणजे कवाईत करूं नका तर हेतु पहा. पूर्वजांनीं जे आचार घालून दिले ते आचार जर भावनात्मक अंतःकरणानं पाळले तर त्यांतले दोष आणि गुण अद्यापिही आपल्याला दिसून येतील. कारण कांहीं गोष्टींचं असं असतं कीं, त्या रोज करीत गेल्यानं त्यांतली खुबी आपले आपण कळते. उदाहरणार्थ—एकादा ग्रंथ दहा-पांच वेळां वाचावा म्हणजे त्यांत जसा दरवेळीं नवा कांहीं तरी अर्थ आपल्याला कळतो, तसंच हें आहे. म्हणून सोवळ्याचा अर्थ आपण बघायला शिकलं पाहिजे. सोवळ्याकरतां भांडीं विसळून घेण्यांत जसं स्वच्छतेचं बीज आहे, तसंच सोवळ्यांत आहे. उठल्याबरोबर चुलीशीं लागायचं नि मग सवडीनं तोंडधुणं, परसाकडणं, वेणी अंग, धुणं करायचं ही चाल घातुक आहे. अन्न हें शरीरपोषक तर आहेच, पण तें बुद्धिवर्धकही आहे. बुद्धिजीवी वर्गात सोवळ्याओवळ्याचं बंड अधिक आहे. त्याचा अर्थच हा कीं, प्रथम आपण शुद्ध व्हायचं, शुद्ध झालों ही भावना टिकवण्यासाठीं सोवळ म्हणविणारं धूतवस्त्र आपण नेसायचं, स्नानानंतर कांहीं तरी ईश्वरविषयक गुणगुणायचं नि हातांनीं स्वयंपाकाला लागायचं याचा अर्थ हा कीं, मनांतील क्षुद्र विचार टाकून ईश्वर-

विषयक उदात्त विचार मनांत वागवून हातानं अन्न तयार करण्यांतच वैशिष्ट्य आहे.

सोवळं हा शब्द फारच व्यापक स्वरूपांत आपल्यांत योजला जातो. भांडीं सोवळ्यांत घ्यायचीं, अंग धुऊन सोवळं नेसायचं, पूजा सोवळ्यानं करायची असा आपल्या भाषेचा परिपाठ आहे. याचा अर्थ इतकाच कीं, जी जी पवित्र वस्तु ती ती सोवळी. देवपूजा पवित्रतेनं करायलाच पाहिजे. अन्न पवित्रतेनं शिजवायला हवं. म्हणून सोवळं सर्कशीसारखं न करतां, त्याचा अर्थ समजून केलं तर त्यांत गोंवलेलं गूढ तत्त्व आढळेल. वाटेल तिथं हिंडून, फिरून, वाटेल त्या माणसाला भेटून संसर्गजन्य वस्त्रानिशीं येऊन अन्न तयार करणं हा दोष आहे. शिवाय या प्रकारांत मनाची पवित्रताही टिकत नाहीं, म्हणूनच पूर्वजांनीं जे आचार घालून दिले ते भावनात्मक अंतःकरणानं नीटपणीं पाळावे नि आपली बुद्धि व विचार परिपक्व झाल्यावर मग त्यांतले फक्त दोषच काढावे, असं मला वाटतं.

**भाऊसाहेब**—काय, बापूराव झालं तुमचं सोवळं-आख्यान! अहो, तिचीं मतं ठरलेलीं!

**बापूराव**—नाहीं पण, भाऊसाहेब, मावशीच्या सांगण्यांत विचार करण्यासारखं आहे हं.

**सरल**—खरंच. सोवळं-ओवळं जरी आम्हांला आवडत नाहीं, तरी मी आज़ोळीं गेलें कीं, आजीचं तें देवघर, ती सोवळी पंगत, तें स्वयंपाकघर हें सारं पाहण्यांत आनंद वाटतो खरा हं!

---

## प्रकरण ६ वें

**आंगीं करी काम। त्यासी लाभे चारी धाम।**

एके दिवशीं मावशी सरलला बरोबर घेऊन एका मोठ्या घरीं बसायला म्हणून गेल्या होत्या. त्या घरांत शिरल्या पण त्यांना तिथं कोणी दिसेना म्हणून थोड्या आंत गेल्या. तों तिथं एका पडवींत एका बालडींत साऱ्या कपबशा घालून मारे एक नोकर विसळण्यांत चूर होता. त्याच टोंकाला स्वयंपाकघराची खोली असून बाहेरल्या अंगाला पाट्यावर एक बाई चटणी वाटीत होती. वांटतांना खोबऱ्याचे तुकडे ती तोंडांत टाकीत होती. तें दृश्य दोघींनींही पाहिलें. मावशीनीं त्या नोकराला बाईसाहेब कुठें आहेत म्हणून विचारलें. त्यानें माडीवर आहेत, सांगून येतों, म्हटलें. तो वर गेला. तोंवर यांनीं इकडे तिकडे दृष्टि टाकली. इतक्यांत बाईसाहेब खालीं आल्या नि यांना घेऊन जवळच्याच खोलींत बसायला गेल्या. तिथें यांना बसवून, आपण 'आलें हं' असें करून ज्या घरांत गेल्या त्या चांगल्या पांच-दहा मिनिटें पत्ताच नाहीं. या आपल्या त्या खोलींत गुपचूप बसल्या राहिल्या. मावशींना हा असला जगांतला अनुभव नेहमींचा असल्यामुळें त्यांना त्याचें कांहीं वाटलें नाहीं, पण ताज्या रक्ताची सरल मात्र चिडली.

**सरल**—हें काय बाई मावशी? इथं किती वेळ माशा मारीत बसायचं!

मावशींनीं तिला खुणेनें दाबलें. मग बाईसाहेब आल्यानंतर त्यांनीं ज्या कामाकरितां त्या आल्या होत्या, तें काम सांगितलें. सरलची ओळख करून दिली. इतक्यांत एक कळकटसें धोतर

नेसलेला, केसांवर पसाभर तेल थापलेला, थोडक्यांत सांगायचें म्हणजे—ज्याला पाहिलें असतां किळस वाटेल असा एक ब्राह्मण, चांदीचा चहाचा ट्रे घेऊन आला. तिथला चहापानाचा विधि आटोपून मावशी सरळ निघाल्या त्या थेट सरलच्या बिऱ्हाडीं आल्या. घरीं आल्याबरोबर सरल तर अगदीं चिडलेलीच होती.

**सरल**—मावशी, पुरे बाई तुमच्या त्या बायका !

**मावशी**—अग, पण त्या बायकांपेक्षां मला तुम्हां शिकलेल्या मुलींचाच अधिक राग येतो कीं, तुमचं एवढंसं बिनसलं तर तुम्हीं चिडावं कां ?

**सरल**—मावशी, म्हणजे काय हो ! त्या बाईंना कुठल्याच तऱ्हेचा शिष्टाचार कसा नाहीं ? आपल्याला खोलींत बसवून ती किती वेळ हो गेली !

**मावशी**—अग, या बायकांशीं संबंध ठेवायचा म्हणजे असल्या कांहीं गोष्टी आपल्याला सोसाव्याच लागतात; त्याशिवाय भागत नाहीं. त्यांच्यांतले हे दोष तुलाच कळतात, अन् आम्हांला कळत नाहींत, असं का तुझं म्हणणं आहे ! पण नव्या श्रीमंतांनीं ते स्वभावधर्म आपल्यांत न येऊं देण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

**सरल**—इश्श, कसली ही श्रीमंती ! अन् काय ती व्यवस्था ! बाईसाहेब माडीवर असल्या अन् त्यांना कष्ट पडले नाहींत म्हणजे झालं सगळं ?

**मावशी**—अग, ही पद्धत नव्या-जुन्या सगळ्या आळशी श्रीमंतिणींकडे पाहायला मिळते. आपण स्वतः गृहकृत्यांत कांहीं बघायचं नाहीं, हीच ज्यांची श्रीमंतीची व्याख्या, तिथं असंच चालायचं. ते नोकर एका बालडींतच सगळ्यांचे चहाचे पेले खळबळणार, त्याचं हॉटेली चहा पिणारांना कांहीं वाटणार पण नाहीं. तसंच

स्वयंपाकाच्या बायांनीं चटणी वाटतांना खोबऱ्याचा तुकडा खाण्यांत तुला कांहीं वैशिष्ट्य वाटायला नको. भुइमुगाचे दाणे वगैरे पदार्थ चोरून खातांना चटणींत पडले नाहींत, म्हणजे पुरवलं. फार कशाला हल्लींच्या स्वयंपाकाच्या बायका किंवा ब्राह्मण पुष्कळसे बनलेले नोकर असतात. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धतीमुळं फारच थोड्या बायका घर सोडून बाहेर पडत. नि ज्या थोड्याशाच बाहेर पडत त्या एकादं चांगलंस घर बघून तिथं आपलंच घर म्हणून टिकून राहत असत. अर्थात् त्या जें त्यांच्या समजुतीप्रमाणं सोवळं-ओवळं नेम-धर्म वगैरे करीत तें मनापासून असे. घरालाहि घर समजूनच वागत. आतां स्वतंत्रतेचा काळ असल्यामुळं पुष्कळशा बायका हा पेशा पत्करतात, पण त्याला आतां नोकरीचं स्वरूप आलं आहे. या नोकरपेशांत आतां प्रामाणिकपणा, नीतिमत्ता, सात्त्विकता यांचा ऱ्हास होत चालल्यामुळं त्यांच्याकडून चांगलीं कामं करून घ्यायची अपेक्षा करणं चुकीचं ठरतं. पूर्वीच्या काळीं कारकून, ब्राह्मण, बाई, मोलकरीण, गडी हीं माणसं एकदां लागलीं म्हणजे वतनदारासारखीं होत असत, नि वृद्धपणीं नव्या पिढीवर तीं आपल्या वडीलकीचा हक्क गाजवीत आणि तो संभाळलाही पण जाई. आतां ते दिवस गेले. परिस्थिति पालटल्यामुळं हीं माणसं पोटभरू, आळशी बनल्यामुळं पगाराकरतांच काम करतात, नि मालकाची देखरेख नसली कीं आळशीपणानं बिगार वेठतात. तिथं तेंच दृश्य आज आपण पाहिलं. स्वयंपाकघरांतला तो भाजीचा पडलेला ढीग दारांतून दिसला नाहीं का? श्रीमंतांच्या घरांत दुखणीं नेहमीं कां असतात, याचं बीज यांतच सांठवलेलं असतं. आतां जे दिवशीं घर हेंच गृहिणीचं जीवन असं बायकांना कळेल, ते दिवशींच आमचीं घरं सुधारतील. पण ती आशा तूर्त तरी

करायला नको आहे. कारण पहिल्या काळांत या श्रीमंतांच्या बायकां-कडेच अंदाधुंदी पाहायला मिळे; पण आतां या नव्या मनूंत सर्रास सगळीकडेच पाहायला मिळणार. कारण या मागल्या काळांत गरिबांच्या बायकांना पैशाच्या अभावीं हीं कामं करावींच लागत, नि वेळ जायला श्रीमंतांच्या बायकांसारखा कांहीं रिकामटेकडा उद्योग नसे. पण आतां या नव्या जमान्यांत झाडून साऱ्या बायकांना उद्योग असतो. किंवा उद्योग करायचा, करायचा, म्हणून बडबडतां येतं नि त्यासाठीं घरांतलीं कामं दिवसानुदिवस कशीं कमी होतील यांकडेच त्यांचं लक्ष लागलेलं असतं. त्यामुळं मागणी तसा पुरवठा या न्यायानं नव्या पिढीच्या सोईसाठीं पापड, पापड्या, मसाले, ताक, दही वगैरे नित्योपयोगी वस्तु आयत्या मिळायच्या सोयी वाढताहेत. पण तें स्वच्छ असतं का? तुला वाटतं का कीं, तूं जसं मसाल्याचं सामान निवडशील, तसं मजूर निवडतील म्हणून! मुंबईत फूट-पाथवर वाळत घातलेले पापड तूं पाहिले आहेस का? अग, अशा अनेक गोष्टी आयतें घेण्यांत दाखवतां येतील. पूर्वीं आपल्याला या रोजच्या व्यवहारांतलं कांहींच आयतं घ्यावं लागत नसे. त्यामुळें थोड्या प्राप्तींत देखील बायका सुखाचा संसार करीत असत. घरां-तलीं रोजचीं कामं केल्यामुळं शरिराला व्यायाम, मनाला आनंद, आणि उत्तम गृहव्यवस्था ही त्रयी साध्य होत असे. पण या बदलत्या कालमानांत— विचार बदलले, बदलत्या विचारांचा परिणाम आचारावर झाला नि आचारांचा परिणाम राहणीवर होऊन राहणी बदलली. अर्थात् खरीं कर्तव्यं सुटून कुठं तरी आपण वाहत चाललों आहोंत झालं. असो. 'कालाय तस्मै नमः' पण तूं काय शिकलीस कीं, असलीं चित्रं पाहून चिडायचं नाहीं, रागवायचं नाहीं, कीं भुलायचंही नाहीं. आपल्याला शक्य असेल तर आपण आधीं आपली सुधारणा करून लोकांपुढं आपलं उदाहरण ठेवावं. बरं मी येऊं?

# प्रकरण ७ वें

**अन्न तारी, अन्न मारी, अन्नासारखा नाहीं वैरी ।**

दुपारीं मावशी जरा आडव्या होऊन उठतात, तोंच सरलाताई धुसफुसलेली अशी तेथें आली. तिला पाहतांच मावशीनं ओळखलं कीं, हिचं कांहीं तरी बिघडलेलं आहे.

**मावशी**—आतां उन्हाचीशी आलीस ? बैस.

**सरल**—बैस काय ! निजणारच आहे मुळीं. माझं अगदीं कपाळ दुखायला लागलं.

**मावशी**—कशानं ग इतकं कपाळ दुखतंय् ?

**सरल**—अहो, त्या सरंजाम्यांकडे जेवायला गेलें होतें ना ? आत्तां आलें अकराचं बोलावणं नि तिहीला जेवलों. भुकेनं लागळं बाई माझं कपाळ दुखायला, नि मग तें गारगोट्या अन्न मला कांहीं जाईना. सारंच बिघडलं, कुठनं झक मारली नि जेवायला गेलें अस्सं मला झालं ! कशाला हो जेवायला बोलावतात या बायका. जर आपल्या हातनं वेळच्या वेळीं होत नाहीं, तर यांनीं या उठाठेवींत पडूं नये ! पण तें नाहीं. जेवायला बोलवायचं, नाहीं येत म्हटलं तर रागवायचं, आग्रह करायचा आणि मग हें अस्सं होतं.

**मावशी**—अग, बोलावणाराची इच्छा चार लोकांनीं आपल्याकडे यावं अशी असते. पण येणाऱ्या बायका कधींहि वेळेवर दुसरीकडे जात नाहींत. प्रत्येक अशी म्हणतें, जाऊं दे, एव्हांपासून जाऊन काय करायचं. सगळ्या आल्या नसतील अजून ! कांहींकडे खरोखरीच अडचण असते, कांहीं कारणांनीं पुरुषांना

नेमका उशीर होतो. पण अशा वेळीं मनाचा जो एक मोठेपणा लागतो, तो मात्र त्या दाखवीत नाहींत. वास्तविक असा उशीर होणाऱ्यांनीं असं सुचवलं पाहिजे कीं, मी मागनं येऊन जेवीन. त्याकरतां मागनं येणाऱ्या बाईनं रागावतां कामा नये, नि घरच्या बाईनं तिचं अगत्यानं स्वागत करून तिला वाढलं पाहिजे, म्हणजे यांत सर्वांचीच सोय होईल. पण ही चाल अद्याप पडत नाहीं खरी. रिकामटेकड्या श्रीमंतिणीसुद्धां नांवाला कांहीं तरी सबब काढून उशीर करतात. पण याकरतां आपण चिडून उपयोगी नाहीं. याला कित्येक वर्षे जोराचा धक्का दिला पाहिजे. तुला ठाऊक आहे का, मी आज किती तरी वर्षं बोलावल्या वेळीं जेवायला जाते ! दुसरं बोलावणं घेत नाहीं, पण मला तिथं तासांवारी तिष्ठत बसावं लागतं. पुष्कळ बायका तर मला वेडीच ठरवतात. तेव्हां तुला असं वाटतं का कीं, बायका वेळेवर यायच्या नाहींत हें मला माहीत नसतं ! पण मी अगदीं नियमित जाऊन त्या बायकांना हा एक धडा घालून देतें आहें. यासाठीं मला फार त्रास सोसावा लागतो. कांहीं वेळां ११॥ ला जावं, तर चाराला घरीं; केव्हां ११ ला जावं तर पांचाला घरीं. एकदां तर एका घरीं मला बोलावणं आलं असतां, पाहुणे आहेत, सवड नाहीं म्हणून सांगितलं होतं, तशा त्या बाई म्हणाल्या कीं पानं वाढलीं म्हणजे बोलावणं पाठवीन. मी खुळी बायको न जेवतां थांबलें, शेवटीं कलबलायला लागलं म्हणून १॥ वाजतां सरबत घेतलं. ३ वाजतां सर्वांबरोबरचा चहा झाला, तरी बोलावणं नाहीं. मला वाटलं गर्दींत त्या विसरल्या असतील, पण पाहतें तों ५ वाजतां बोलावणं आलं. मला वाटलं या पहिल्यानें विसरल्या नि मग मागल्या बायका जेवतांना त्यांना आठवण झाली असेल. गर्दी आहे, मनुष्य विसरतंच, म्हणून मी गेलें. हेतु हा कीं,

आपण विसरल्याबद्दल त्या बाईला वाईट वाटूं नये. पण हा सद्विचार माझ्याइतका अंगाशीं आला कीं, घरीं येऊन मला शिव्याच खाव्या लागल्या. कारण विहिणींच्या पंक्तीला जेवून मला परत घरीं यायला रात्रीं साडेआठ वाजले. मुलांनीं भूक भूक करून घर डोक्यावर घेतलं. बाईनं येऊन कांहीं तरी करून त्यांचीं जेवणं केलीं. अशी ही आमची पद्धत आहे! पण यांत सुधारणा होण्यासाठीं आपल्याला हा त्रास सोसावाच लागतो. कारण जेवायला बोलावण्याबाबत आपल्याला किती तरी सुधारणा करायच्या आहेत. हल्लीं जेवायला बोलावणं म्हणजे कर्जफेड होत चालली आहे. त्यांतला हेतु जो— आनंद, समाधान नि स्नेहवृद्धि— तो एकही साध्य होत नाहीं. एकाद्या घरांत एकाद्याला जेवायला बोलावलं तर तिथं जेवणाराचा कसा थाट असतो तो पहावा. लोकांचं कशाला. रोजचंच पहाना, पुष्कळ ठिकाणीं बायका सोवळं म्हणून अगदीं विटक्या, फाटक्या चिंध्या नेसतात. आम्हांला असणारे कपडे सगळी मंडळी कामाधामानिमित्त बाहेर गेल्यावर मग आम्ही वापरतों. मनुष्याला जशी चांगल्या स्वादिष्ट अन्नाची जरूरी आहे, तशीच तें खायची जागा, वाढप करणारीं माणसं भोंवतालचं वातावरण हेंही स्वच्छ, सुंदर नि आनंददायी असलं पाहिजे. आणि असं असेल तरच त्या अन्न खाण्यापासून मनाला समाधान लाभेल. नाहीं तर पोत्यांच्या ढिगापुढं जेवायचा पाट, कोपऱ्यांत केराचा ढीग, डाव्या बाजूला डोळ्यांवर झिंज्या आलेलं शेंबडं मूल, ओकारी येण्याजोगं वस्त्र नेसलेल्या वाढपीण बाई, पोतेऱ्याच्या नांवानं शेण चोपडलेली जमीन असा थाट असला नि पानांत शिरापुरी वाढली तरी तें अन्न कितीसं रुचकर लागेल! कांहीं घरांतून मुलं म्हणतात कीं, आई आम्हांला तूंच वाढ. याचा अर्थच असा

कीं, त्यांना तो बाया-ब्राह्मणांचा अवतार बघून जेवायचा कंटाळाच येतो. नव्या जमान्यांतली मंडळी महिना महिना न घासलेल्या पातेल्यांत बनविलेला हॉटेली चहा बाहेर पांढरें शुभ्र कपडे घालून बॉयनं आणला कीं पसंत करतात. म्हणून अशा थाटाच्या शिरापुरी-पेक्षां तेंच जर स्वच्छ, उजेडी सुंदर जागा, स्वच्छसे नेसू असलेली आनंदी चेहऱ्याची वाढणारीण असली नि तिनं हसतमुखानं तूप-भात, लोणचं-पापड, एवढं जरी वाढलं तरी तें किती गोड लागेल. तेव्हां वस्त्राप्रावर्णाचा नीटनेटकेपणा नि स्वच्छता हें बायकांनीं जरूर पाहिलं पाहिजे. उंची किमती वस्त्रं जरी सकाळीं कामाधामांत आपल्याला नेसतां आलीं नाहींत तरी सकाळच्या वेळीं घरांत आपली मंडळी असतात. म्हणून नीटनेटकी वेणीफणी, ऐपतीनुसार कपडालत्ता हें आपल्याला केलं पाहिजे. हें संभाळणं शक्य नसेल तर लोक नेसतात म्हणून फॅन्सी रंगीत कपडे आपण वापरणं योग्य ठरणार नाहीं. पांढरे कपडे वापरायचेच तर त्यांच्या स्वच्छतेची आपण काळजी घेतली पाहिजे. मग ते काटकसरीकरतां आपण धुवावे अथवा अधिक पैसे खर्च करून नोकर अगर परीट यांच्याकडे टाकावे. तो ज्याच्या त्याच्या ऐपतीचा प्रश्न आहे. पण सकाळच्या वेळीं नि स्वयंपाकांतसुद्धां भांड्याकुंड्यांप्रमाणंच कपड्यांची स्वच्छता नि नीटनेटकेपणा पाहिजे. असो. हें आपलें सध्यांचें वातावरण, हें असंच चालायचं. यांत सुधारणा करायला तुमच्यासारख्या मुलींनींच आतां कंबर कसली पाहिजे.

**सरल**—पण मावशी आमच्यापेक्षां तुम्हींच आधीं किती गोष्टी केल्या आहेत. खरोखर हें सारं समजून तुम्ही अशा वागतां, ही कल्पनाच आम्हांला येत नाहीं.

**मावशी**—अग, तुम्ही लहान. लहानपणीं चटूदिशीं आवडतील

तीं मतं घ्यायचीं, नि त्यापेक्षां निराळं दिसलं कीं, नांवं ठेवायचीं ही एक प्रवृत्ति असते. पुष्कळ मुलं तर घरांतलीं इतर माणसं अमक्या व्यक्तीला वाईट म्हणतात, म्हणूनच तींहि त्यांना वाईट म्हणतात. तर कांहीं ठिकाणचीं मुलं खुद्द आईबापांनाच वाईट म्हणतात. वास्तविक आतां शिक्षण वाढतं आहे. अशा वेळीं मुलांनीं अधिक विचारी व संयमी असायला पाहिजे. कारण आई-बाप असं कां वागतात, त्यांत त्यांचा हेतु काय असावा, त्यांचे विचार काय आहेत, हें आपल्याला या वयांत कळत नाहीं; म्हणून त्यांच्यावर टीका न करतां गप्प बसावं. वयाच्या वाढीनंतर आपले विचार जरा परिपक्व झाले म्हणजे मग त्यांत जें वाईट दिसेल तें फार तर आपण करूं नये. पण हें धोरण सध्यांच्या पिढीपुढं फारसं राहत नाहीं. स्वतंत्र विचाराच्या नांवाखालीं पुष्कळ बुद्धिमान् मुलांचे विचार इतक्या उसळ्या मारतात, कीं त्यांच्या लक्षांत म्हातारा घोडा तरण्या घोड्याबरोबर टांगा कसा ओढील हें येतच नाहीं. ज्यांचे विचार, आचार, कल्पना इतकीं वर्षं सारख्या दृढ झाल्या आहेत, त्या नव्या पिढीसाठीं एकदम कशा बदलतील? तेव्हां संतोषानं व समाधानानं सुधारण्याचा मार्ग म्हणजे त्यांच्या कल्पनेची, मतांची, हेटाळणी न करतां त्याला अनुसरून वागणं व क्वचित् प्रसंगीं जिथं फारच विरोध येईल, तिथं आपलीं मतं नम्रतेनं त्यांच्यापुढं मांडणं हेंच खरोखर सुविद्य मुलामुलींचं कर्तव्य होय.

इतक्यांत भाऊसाहेब दारांत येऊन उभे राहिले नि म्हणाले, "अरेच्या, आज मावशी-भाचीच्या गप्पा चालल्या आहेत होय! म्हणूनच घड्याळाकडे लक्ष नाहीं वाटतं! तो बिचारा शरद मागील दारा-कडे धुंडतो आहे. मला म्हणाला, "आई जर मागील दारीं नसेल, तर खास सरलताईकडे गेली. मी तिकडून बोलावून आणतों."

---

## प्रकरण ८ वें

**माझ्या मैत्रिणी आहेत दहा बारा**
**एक दिली सुभेदारा ताईबाई॥**

आज मावशी सरलकडे जों आल्या तों तिच्याकडे एक पाहुणी-बाई आलेली दिसली. सरलनं तिची मावशींशीं ओळख करून दिली. "ही माझी चुलतबहीण आहे. नवऱ्यासह माझ्या इथं एकदोन दिवस पांव्हणी आली आहे." मग मावशी तेथें बसल्या असतांना चहा वगैरे झाला तेव्हां अर्थात् इकडच्या तिकडच्या गोष्टी चालूच होत्या. तशी ती मुलगी सरलला म्हणाली,

"सरल, आतां कांहीं गोष्टींत तूं सुधारणा केली पाहिजे बाई! जरी आजच तुला एकदम मोठं घर किंवा कुक् वगैरे ठेवायची ऐपत नसली तरी आपलं हें हिंदु पद्धतीचं जेवणघर बस कर. तें गैरसोयीचं आणि भारी गलिच्छ असतं. सध्यां कांहीं तुझ्याकडे फारशीं माणसं यायचीं नाहींत; म्हणून या येवढ्या मधल्या खोलीला डायनिंग रूम कर. एक बेताचं टेबल नि सहा एक खुर्च्या एवढं यंदा घेतलंस कीं पुरे. पण तें जेवणघर किती सुंदर दिसतं. आतां आम्हांला नेहमीं युरोपियन लोकांत जेवाखायला जायचा प्रसंग येतोना! त्यांचीं तीं जेवणघरं, नि ती जेवणाची पद्धति किती सुशोभित असते. नाहीं तर आपली बघा. ती काळीकुट्ट चूल, ते घाणेरडे पाट, शेणाची जमीन, डागळलेलीं केळीचीं पानं-इश्श ग बाई! जेवावंसं दिखील वाटत नाहीं. मी बाई, होतां होईतों कुठ्ठं जेवायला जात नाहीं."

**मावशी**—पण मी तुम्हांला जेवायला बोलवणार आहे, तेव्हां माझ्याकडे याल कीं नाहीं!

**ती**— तसं नाहीं हो! पण या आपल्या हिंदु लोकांचं गचाळ काम पाह्यलं कीं, कसं वाटतं तें सांगितलं, आणि म्हणूनच मी सरलला सांगतें आहे कीं, आपण नव्या पिढीनं तरी चांगलीं घरं ठेवायला शिकलं पाहिजे.

**मावशी**—कबूल, तुमचे हे शेवटचे शब्द कबूल. कारण आतां तुम्हीं तरुण मुलींनींच सुधारणा करून दाखवायची आहे.

**ती**—खरंच कीं, नाहीं तर काय हो! हल्लींचीं आमचीं हिंदु घरं ती हिंदु राहणी नि ती गलिच्छ राहणी जेवणघरांतून नि स्वयंपाकघरांतून फिरकूंसुद्धां नये.

**मावशी**—जाऊं द्या कीं हा विषय. उशीर झाला, मला घरीं गेलं पाहिजे. मुलं शाळेंतून येतील. पण आतां असं, तुमचा इथं मुक्काम थोडाच आहे, आणि तुमची नि माझी ही नवी ओळख आहे. तेव्हां सरलची मावशी म्हणून ओळख दृढ होण्यासाठीं तुम्ही आतां उद्यां सहकुटुंब सहपरिवार माझेकडे जेवायला या. तुम्ही नव्या राहणीच्या भोक्त्या आहांत, तेव्हां नव्या राहणींतलि बायकांनीं पुरुषांना बोलावणीं करायची रीत तुम्हांला पसंत असेलच. तेव्हां माझं आमंत्रण तुम्हीं दोघीजणी आपल्या मंडळींनाही सांगा.

असें म्हणून मावशी उठल्या व जरी त्या म्हणाल्या होत्या कीं, ‘ माझं आमंत्रण स्वीकारा ’ तरीही त्या घरीं गेल्यावर रात्रीं गप्पा मारायला म्हणून १०।५ मिनिटें भाऊसाहेब येऊन त्या दोघां पुरुषांना जेवायचं आमंत्रण देऊन गेले.

# प्रकरण ९ वें

लवण मिरकुटाचीं रायतीं एक हारी।
सुरण लवण शाखा आणिती दिव्य नारी।
कुवलयदलनेत्रा वाढिती पूर्ण तोषें।
रुणझुणती पदाब्जें नूपुरें मंद घोषें॥

मावशीकडे बरोबर ११ वाजतां नेहमींच्या माजघरांत पाटपाण्याचा थाट दिसत होता. लहानसें, सुंदर, व्हाइटवॉश केलेलें तें माजघर, एका कोपऱ्यांत एक जाळीचे कपाट, नि एके बाजूस एक लहानच पण सुंदरसें शेल्फ होतें. मध्यें दोन्ही भिंतींशीं समोरासमोर पानें घातलीं होतीं. भिंतींना दोन फोटो होते. एक श्रीकृष्णप्रभूचा व दुसरा मारुतिरायाचा. खिडक्यांतून सुंदर तऱ्हेच्या मांडणीचे फुलांचे गुच्छ ठेविले होते. पाटपाण्याच्या तेथेंसुद्धां बसायला पाट, टेकायला पाट, पुढें पानांना पाट, त्यावर सुंदर हिरवींगार अशीं केळीचीं पानें, त्यांभोंवतीं सुरेखशा रांगोळ्या, नि एका बाजूला उदबत्त्यांचा घमघमाट, असें हें नयनमनोहर जेवणघर ( Dining Room ) तयार झालें होतें. ही मंडळी आंत येतांच त्या पाहुण्यांच्या तोंडून उद्गार निघाले—Oh! very nice dining room! मंडळी आंत आली नि भाऊसाहेबांनीं सुचविलेल्या अंगास पुरुष मंडळी बसली; व समोरच्या बायकांच्या ओळींत बसण्यासाठीं मावशी सुचविणार तोंच ती पाहुणी स्वयंपाकघराकडे वळली आणि मग सरलही पाठोपाठ आंतपर्यंत जाऊन म्हणाली, “ मावशी, कांहीं वाढायचं आहे का?”

मावशी म्हणाल्या, “ नको! आज तूं जेवायला बस. मी आणि शंकर वाढूं.”

इतक्यांत त्या पाहुणीनें ती स्वयंपाकघराची व्यवस्था पाहिली. स्वच्छ व सुंदर स्वयंपाकघर. स्वयंपाक केला कीं नाहीं हें कळायला दिखील साधन नाहीं इतकें आवरलेलें, वाढायचीं वेगळीं भांडीं, चटण्या-कोशिंबिरी करून त्यांवर झांकलेलीं तीं वेगळीं, स्वच्छ फडकीं. हें सारें पाहून साहजिकच ती पाहुणीबाई आश्चर्यचकित झाली. कारण स्त्री-स्वभावांतील आवड येथेंही दृग्गोचर झाली. कांच, पितळ, तांबें, चांदी, या साऱ्या प्रकारची वेगळाल्या तऱ्हेची निरनिराळ्या घाटांची, वाढायचीं सुंदर भांडीं इतस्ततः वेगळाल्या कामांत उपयोगाला आणून व्यवस्थित मांडलेलीं पाहून पाहुणीबाईचें मन लोभावलें. तो थाट पाहून 'बाहेरच्या जगापेक्षां स्वयंपाकघरच चांगलं' असें तिला वाटलें. इतक्यांत भाऊसाहेबांनीं वाढायची घाई केल्यानें ही मंडळी बाहेर येऊन जेवायला बसलीं.

साधे, सुंदर पदार्थ व्यवस्थित तऱ्हेनें वाढले गेले. जेवणाला आरंभ झाला. गरम गरम सुग्रास भोजन, वेगळाल्या रुचीचे निरनिराळे पदार्थ पानांत वाढले होते, तेव्हांच त्यांच्या रंगरूपावरून केव्हां खाऊं असें वाटावें. प्रत्यक्ष भोजनाला आरंभ केल्यावर ही मंडळी खूष झाली. आधींच तेथला थाट पाहून पाहुणे खूष झाले होते. तें साजूक तूप व वरणभातरूपी अमृत पोटांत गेल्यावर जास्तच आनंदित झाले व म्हणाले, "अहो बापूराव, आज मला असं वाटायला लागलं कीं, आपल्यांतही हिंदु जेवण, हिंदु पद्धतींत, इंग्रज लोकां-सारखं सुंदर करून जेवतां येतं. आजपर्यंत आमची अशी समजूत होती कीं, हिंदु जेवणाची पद्धत ही कांहीं तरीच आहे. इंग्लिश तऱ्हेचं जेवण हेंच खरं जेवण! त्या लोकांनींच तेवढं सौंदर्याकडे, शोभेकडे लक्ष दिलेलं आहे. पण आज हा गैरसमज थोड्याशा अंशानं दूर झाला."

**भाऊसाहेब**—थोड्याशा अंशानं म्हणजे ?

**बापू**—अंशाचं मोजमाप कसं करायचं ?

**सरल**—पण थोडा वेळ तरी तो भ्रम मावशींनीं दूर केला ना ?

**पाहुणे**—माझ्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, इतकी सुंदर व्यवस्था क्वचितच पाहायला सापडते! नाहीं तर काय तें डर्टी जेवण-घर, कसला तो वाढपी, काळोख कोण !

हें ऐकून त्यांची पत्नी म्हणाली, " अगदीं खरं. आम्हांला कुठलं जेवायचं बोलावणं आलं तर आम्ही सहसा जात नाहीं. नाहीं बाई, तें जमतच नाहीं."

**मावशी**—तुमचं म्हणणं कांहीं अंशीं बरोबर आहे. पण ही चूक कुणाची ? ज्यांना स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा, सौंदर्य-दृष्टि, आरोग्यमहत्त्व हें कळलेलं आहे अशा गृहिणींची, कीं अडाणी बायका–पुरुषांची ? ज्या पुरुषांना कोणीकडून जेवलं म्हणजे झालं एवढंच कळतं त्यांच्या बायकांत सुधारणा व्हावी कशी ? ज्या बायका हें आवडत नाहीं म्हणून नवा पेशा धारण करतात त्यांचीं घरं सुधारावीं कशीं ? वास्तविक पाहिलं तर हें सगळं आवडत असेल तर पुरुषांनीं आधीं लक्ष घातलं पाहिजे व बायकांनीं घरांत शिरलं पाहिजे. पण होतं काय, कीं हें न आवडणाऱ्या बायका सुशिक्षित असल्यामुळं त्यांना हीं कामं करायला नको असतात. बबर्जीखान्यांत किती का घाण असेना, पण टेबलावर पांढऱ्या पोषाकांत चहा आणून देणारा बॉय त्यांना लागतो नि पुरुषांनाही ही नवी सृष्टि चार पैसे खिशांत खुळखुळले म्हणजे बरी वाटते. वास्तविक पाहिलें तर ऐपतदारांनीं चार पैसे अधिक खर्च केले म्हणजे आपली राहणी बरीच चांगली करतां येईल नि ती नव्या राहणीपेक्षां स्वस्तही पडेल. आपण रागावूं नका, आमच्या लोकांच्या स्वाभिमानशून्यतेचा पारा इतका खालीं

गेला आहे कीं, स्टेशनवर हिंदु नि मुसलमान अशीं दोन हॉटेलं असलीं तर आम्ही लोक ( आमच्यांतले कांहीं अधिक शहाणे ) इस्लामी हॉटेलांत जातात. आमच्यांत गलिच्छपणा, गबाळेपणा नाहीं असं नाहीं; पण तो काढण्याचा प्रयत्न आमच्यांतल्या सुशिक्षित पिढीनं केला पाहिजे. आमच्या गृहिणींनीं हॉटेलांना, डब्यांना, आयत्या जिनसांना महत्त्व न देतां घरांत स्वतः कष्ट करून राबलं पाहिजे. सभा, क्लब, व्याख्यानांची समाजसेवा जरा कमी करून गृहसेवा पत्करली पाहिजे. मी हल्लीं पुष्कळ ठिकाणीं पाहतें कीं, ऐपतदारांच्या घरनं गृहिणी बाहेरच्या जगांत वावरतात व घरांत नोकर मालकिणी-ला थोडेंसें खूष केल्यानंतर कसें वागतात इकडे यांचें लक्ष नसतें. एक फडकं घेतलं कीं, तें चहाच्या पेल्यापासून त्या नोकराच्या हात-तोंड पुसण्यापर्यंत उपयोगीं पडतं. स्वयंपाकिणीनं एक फडकं घेतलं कीं, तें सारीं कामं करूं शकतें. कांहीं मोठ्या घरच्या ब्राह्मणांना कधींच फडकं धुवायची गरज लागत नाहीं. २।३ दिवस काम करून फेकून दिलं कीं झालं. आपण स्वतः काम करायचं ठरवलं, म्हणजे घाण काम करायचं म्हटलं तरी आपल्या हातून इतका गलिच्छपणा होणार नाहीं. म्हणून गृहिणींनीं, विशेषतः सुशिक्षित गृहिणींनीं, आधीं घर, मग दार; आधीं स्वयंपाकघर मग दिवाणखाना हें ध्यानीं घेतलं पाहिजे.

**पाहुणे**—तुमचं म्हणणं खरं आहे, विचारार्ह आहे.

**भाऊसाहेब**—हो, तूं आपलं त्या तुझ्या स्वयंपाकघराचं वर्णन, नि त्याच्या त्या स्वच्छतेचं वर्णन दुसऱ्याच्या माथीं मारीत जा. आतां या नव्या काळांत सार्वजनिक संस्थांतून काम करून नांव मिळवाय-च्या दिवसांत या तुझ्या स्वयंपाकघराच्या गोष्टी ऐकायला कोण रिकामटेकडा असणार ?

**मावशी**—— मी कुठं म्हणतें ऐकावं म्हणून? पण ज्याला देशाची किंवा समाजाची खरी कळकळ असेल, त्यानं ऐकलंच पाहिजे. कारण देश किंवा राष्ट्र म्हणजे पुष्कळसे समाजच ना? मग समाजच नसेल तर राष्ट्र कसं बनणार! राष्ट्र चांगलं असायला समाज चांगला हवा ना! समजा कसा बनतो? नागरिकांपासून ना? नागरिक कुठं तयार होतो? घरांतच ना? नागरिक जर शूर, सुदृढ, बलवान् उत्साही असा असेल तर समाजही तसा होईल. आणि हा नागरिक मुळांत जिथं तयार होतो, तें घर आधीं नको का बघायला!

**भाऊसाहेब**—इतर देशांत असं ऐकतों कीं, घरच नसतं. सारं आयतंच असतं. तसं आपल्या इकडेही डब्यांनीं भागेल.

**बापू**—माफ करा अं भाऊसाहेब, तें डबे-पुराण!

**पाहुणी**—आणि डबे विकत आणून रोज जेवायचं म्हटलं, तरी मध्यम स्थितींतल्या साऱ्याच लोकांना, तें परवडत नाहीं हं. एकट्यादुकट्याची गोष्ट निराळी.

**पाहुणे**—अहो, आपली राहणी एव्हांच का बदलणार आहे? आपल्याकडे भसादिशीं हवे तेवढे पाहुणे येतात, तितक्यांना हॉटेलांत नेऊन जेवायला घातलं तर त्रास, दगदग नि दिवाळं वाजणं हीं एकदमच होतील. तिकडे त्या राहणीला ते रीतिरिवाज बसूनच गेले आहेत.

**पाहुणी**—तें कांहीं नाहीं, चूल ही घरोघर लागते, पण जी स्वच्छता हवी ती मात्र मिळत नाहीं.

**सरल**——कशी मिळणार! मावशीइतक्या आपण खपतों कुठं? मावशींचीं तीं किती तरी फडकीं पाहिलींस का? तीं स्वतः धुवायचीं, स्वतः घांसायचीं. असं किती घरांतून करतात? सोवळं म्हणून नेसायचीं बायकांचीं लुगडीं किती गलिच्छ असतात. मावशीं-

चा आपणां तरुण मुलींवर मोठा कटाक्ष आहे. त्या म्हणतात हीं फॅन्सी पातळं नेसायची चाल तुम्ही मध्यम स्थितींतल्या मुली पाडतां, नि त्याचं अनुकरण गरीब, श्रीमंत या साऱ्यांतून होतं. पण ही पातळं धुण्याची जी व्यवस्था व्हायला हवी, ती मात्र कुठंही होत नाहीं. बहुतेक होत नाहीं. तीं वेड्या-विद्र्या रंगांचीं विटकीं फिटकीं पातळं बायका सकाळीं कामांत म्हणून व सोवळ्यांत म्हणून नेसतात. तशाच त्या चोळ्या. खण जाऊन या दिखाऊ चिटाच्या चोळ्या सर्वत्र बोकाळल्या. पण त्याच्याबरोबर त्याची स्वछता मात्र आली नाहीं. पुष्कळ ठिकाणीं हे कपडे इतके घाण पाहायला मिळतात कीं, त्यांचा मूळचा रंग देखील ओळखूं येत नाहीं. तशींच तीं पांढरीं पातळं !

हे सारे कपडे सर्रास मोलकरणीकडे धुवायला ज़ातात व त्यासाठीं म्हणून एवढासा साबूचा तुकडा दिला जातो. अर्थात् ते तितपतच स्वच्छ राहणार ! तेव्हां वास्तविक पाहिलं तर परटाकडे वरचेवर कपडे देणं ज्यांना परवडत नसेल त्यांनीं पांढऱ्या पातळासारख्या वस्तु सर्रास वापरूं नयेत. चोळ्या वगैरे वापरावयाच्या असल्यास त्या स्वतः साबू लावून धुऊन स्वच्छ ठेवल्या पाहिजेत. हें लक्षांत असावं, कीं वेळ सकाळची जरी असली तरी पुरुष घरांत असल्यानं, चार पुरुष घरांत येतात जातात, तेव्हां अगदींच वेडेवांकडे, फाटके, विटके, कळकट, मळके कपडे नेसण्याऐवजीं, जुने का होईना पण स्वच्छ नि चांगले कपडे वापरावे म्हणजे जेवणारांनासुद्धां आनंद वाटतो. चहाच्या वेळीं सर्वांनीं स्वच्छ कपडे करून चहाला यायचं हीं पाश्चात्यांची चाल आपण घेण्याजोगी आहे. अंथरुणांतून उठल्याबरोबर पायलीयेवढं डोकं घेऊन चहाला बसायची पद्धत काढून त्याबदली जरा नीटकेटके केस करून

मुलं, बायका नि पुरुष यांनीं चहाला यावं. कारण हल्लीं कांहीं ठिकाणीं नाइट-ड्रेस करायची पद्धत पडली आहे. ही इंग्रजांची पद्धत उचलणारे, चहाला येतांना दुसरे कपडे घालायची पद्धत मात्र उचलीत नाहींत. त्यांच्यांतल्या चांगल्या गोष्टी घ्याव्या, दोष नाहींसे करावे, पण मुद्दाम आम्ही आमच्या चांगल्या गोष्टी घालवूं नयेत असं मला वाटतं.

**पाहुणी**—कांहीं असो. आजचं जेवण चांगलं तर झालंच, पण त्यावर चर्चाही अति सुंदर झाली. त्यामुळं आजचं जेवण स्मरणीय झालं; कारण या चर्चेंत आम्हां उभयतांना घेण्याजोगं कांहीं तरी सापडेल, खरं ना सरलाताई !

**सरला**—अवश्य; ताईच्या टेबलावरच्या जेवणाच्या आवडीला थोडीशी दुसरी बाजूसुद्धां मिळेल. कारण पाटावरचं जेवण अव्यवस्थित नि दाईट असतं, असं आज तरी ती म्हणूं शकणार नाहीं. एवढं म्हणून ती गेली.

# प्रकरण १० वें

शिवण-टिपण ऐशीं योजिलीं नित्य कामें
कधींच बसुं नये हो बायकांनीं रिकामें ।

आज दोनचार दिवसांत सरला आली नव्हती म्हणून जेवणें आटोपल्यावर मावशी सरलकडे गेल्या तों ती अगदीं स्वयंपाकघराची व्यवस्था लावण्यांत गुंग झाली होती. मावशीला पाहतांच ती म्हणाली, " मावशी, आतां पहा, मी दिवाणखान्यापेक्षां दिखील अधिक व्यवस्था लावण्यांत गुंग आहे ना! आज मीं या नव्या चालीच्या चुली घातल्या आहेत. खरंच मावशी ओट्यावरच्या चुलीं चांगल्या कीं खालच्या बसलेल्या चुली चांगल्या ?"

**मावशी**—तूं दिवाणखान्याइतकी स्वयंपाकघरांत गुंतलीस हें बघून मला खरोखरीच भारी आनंद वाटतोय. मात्र दिवाणखाना नीटनेटका ठेवलेला मला आवडत नाहीं, असा मात्र समज तूं करून घेऊं नकोस. दिवाणखाना सुंदर दिसावा, पुढील दार सुंदर दिसावं अशी मला भारी हौस आहे. आतां माझं वय झाल्यामुळं जरी या गोष्टी करायला मला वेळ होत नाहीं, तरी तुमच्या वयांत या गोष्टी मीं केलेल्या आहेत. आमच्या काळांत जें विणणंभरणं होतं तें करून आम्ही दिवाणखाने शृंगारीत होतों. त्या वेळीं कलाकौशल्यांत श्रम अधिक नि खर्च कमी असे. आतांच्या कलाकुसरींत खर्चिकपणा जास्त नि श्रम कमी. असो. तूं मला चुलीचं विचारीत होतीस ना ? ओट्यावरची का चूल घालते आहेस तूं ?

**सरल**—नाहीं, आज कांहीं मी ओट्यावरची घालीत नाहीं. मी एक दुसरीच गंमत करून बघतें आहे.

**मावशी**— ठीक आहे, करून बघा. हें वय निरनिराळे प्रयोग करून पाहायचंच असतं. उत्साह असतो, हौस असते. आतां ओट्यावरचं म्हणशिल तर हौसेखातर करून बघ एकदां.

**सरल**—तसं नाहीं मावशी, पण तुम्हांला काय वाटतं ?

**मावशी**—मला असं वाटतं कीं, आमच्या स्वयंपाकाला नि राहणीला ती गैरसोयीची आहे. ही कल्पना इंग्रजांच्या स्वयंपाकघराच्या कल्पनेनं आली. पण त्यांच्या नि आपल्या स्वयंपाकाच्या पद्धतींत अंतर आहे. त्यांच्यांत घरीं फार थोडे पदार्थ करायचे असतात. मुख्य जी ब्रेड ती बाहेरून येते. आपल्यांत पोळ्या भाकऱ्यांचंच बंड अधिक असतं, त्या जर उभ्यानं करायचं म्हटलं किंवा जरी स्टुलावर बसून करायचं म्हटलं, तरी तें जमत नाहीं. बाकी आपला स्वयंपाक घरच्या बाईनं केला म्हणजे ओणव्यानंच असतो, कारण तिला स्वयंपाक करतां करतां पुष्कळच कामं करायचीं असतात—चटणी, कोशिंबीर, ताक, दही-दूध, पूजेची तयारी, पाटपाणी, हें सारं स्वयंपाक करतां करतांच होतं, आणि पोळी-भाकरीच्या वेळीं आपण हुश् करून खालीं बसतों. शिवाय आपल्याला कुठलंही पक्कान्न करायचं म्हटलं म्हणजे बराच वेळ चुलीशीं बसावं लागतं. तेव्हां तें खालीं बसून करणं मला वाटतं सोयीचं पडेल. तासावारी हें काम उभ्यानं करायचं म्हटलं तर मनुष्य थकून जाईल. पण हौस असेल तर करून बघावं. बाकी बऱ्याच मुलींनीं प्रथम ओट्यावर चुली घालून मग त्या खालीं आणलेल्या आहेत. फार तर जिच्याकडं मोठं स्वयंपाक घर असेल, पुष्कळ स्वयंपाक असेल, तिनं एका बाजूला उंचावर दोन शेगड्या घालून ठेवाव्या नि एक चूल खालीं घालून ठेवावी. म्हणजे हौस असल्यास सकाळचं चहापाणी, दूध वगैरे सारं उभ्यानं करतां येईल. नंतरचं मग खालीं करावं. बरं ठीक मग

काय? तूं तुझ्या स्वयंपाकघराची ठाकठीक केलीसना? हें दुभत्याच नवं कपाट घेतलंस वाटतं !

**सरल**—होय मावशी. कालच आणलं नि मग त्यांत भांडींकुंडीं ठेवून तुम्हांला दाखवायला बोलावणारच होतें. मावशी, आतां मी भांडीं विसळून घ्यायला लागलें. तीं चोळून विसळलीं म्हणजे त्यांत किती घाणपाणी निघतं हें मला पटायला लागलं. दहा माणसांत कोणीच जबाबदार नसल्यामुळं हाताला येईल तें भांडं घासायला टाकायची एक घाणेरडी सवय लागलेली असते. पण भांडीं विसळायची वेळ आपल्यावर आली आणि तीं विसळतां विसळतां कंबर मोडली म्हणजे मग घासणारणीचं कसं होत असेल याची कल्पना येते.

**सरल**—खरंच, अगदीं खरं आहे मावशी. अन् ही पाहिलीत का माझी तुळस ! या लहानशा अंगणांत मीच काल स्वतां बसून हें वेडंवाकडं वृंदावन केलं. त्यापुढं आज ही पहा रांगोळी काढली. तेव्हां मला आठवण झाली एका गाण्यांत ऐकलेल्या ओळीची....

**निगा चांगली राख वृंदावनाची।**
**जया पाहतां तृप्ति व्हावी मनाची।**

तसेंच तीं—**फुलें स्वस्तिकें रांगुळीचीं लिहावीं।**

**मावशी**—( हसून ) **अशीं कीं, जनें कौतुकें तीं पाहावीं।**

**सरल**—मावशी, तुमच्या तालमींत मी इतकी दिखील तयार होइन अं !

**मावशी**— हो, बाई हो. तुम्हीं मुलींनीं तयार होऊन आम्हांला हरवावं, हीच आमची इच्छा असते. 'शिष्यात् इच्छेत् पराजयम्' गुरुसे शिष्य सवाई, अशी एक म्हण आहे. बाकी तुझी गुरु कांहीं मी

नाहीं. तुझ्या आईनं मुळांत हें सारं दिलंच आहे, मी फक्त तें आग्रहानं बाहेर आणायला लावीत आहे.

**सरल**—मावशी आई कांहीं कांहीं गोष्टी शिकवीत असे, हें खरं ! पण मी जी थोडीशी शाहणी झालें, ती व्हायला कारण तुम्हीच बरं का ! असो; हें बघा. आतां मीं तीन वेगळीं फडकीं केलीं आहेत, ही इथं धान्याला जागा केली आहे. या दुभत्याच्या कपाटांत तूर्त एका बाजूला भाजीपाला नि एका बाजूला दुभतं राहील. मग आतां झाला कीं नाहीं थाट !

**मावशी**—कबूल, हा वरच्या देखाव्याचा थाट जमला खरा, पण त्याप्रमाणं स्वयपाकांत देखील तूं सुग्रण ठरली पाहिजेस. स्वयंपाक कां, कशासाठीं नि कसा करायचा ! हें सारं तुला आलं पाहिजे.

**सरल**—इश्श, स्वयंपाक जेवण्यासाठीं करायचा. मोठ्ठाच शोध.

**मावशी**—अग नाहीं, खरंच तो मोठाच आहे. जेवायचं कशासाठीं हें पुष्कळांना कळत नाहीं. कारण पुष्कळ माणसं अन्न हें अन्न म्हणून खातात नि पुष्कळ बायका स्वयंपाक म्हणून स्वयंपाक करतात. त्या हेतूबद्दल कधीं विचार म्हणून करीत नाहींत.

**सरल**—मग मावशी, तुमचं ह्याबद्दल काय म्हणणं आहे तें एकदां नीट सांगा ना ?

**मावशी**—तें तुझी ऐकायची इच्छाच असेल नि कंटाळा येणार नसेल तर जरूर सांगतें. आपल्या पूर्वजांना ही गोष्ट जरूर कळत होती. पण मधल्या काळांत आम्ही तें विसरलों होतों. आतां पुन्हा आमच्यांतल्या कांहीं व्यक्तींचे डोळे पुन्हा उघडूं लागले आहेत. मासिकांतनं आहार या विषयावर लेख येऊं लागले, बायकांना स्वयंपाक यावा हें पटायला लागलं नि त्यासाठीं मुलींच्या शाळांतून

घरगुती पाकशास्त्राचे वर्ग काढायची कल्पना निघून कांहीं ठिकाणीं तर त्याचे वर्गही निघाले आहेत.

**सरल**—मावशी, पूर्वींच्या लोकांना ही कल्पना होती, हें तुम्ही कशावरनं म्हणतां हो! वेळ पडेल, तेव्हां तुम्ही त्यांचं भारी कौतुक करतां.

**मावशी**—अग हो, याला तसा आधार आहे म्हणून!

**वदनिं कवळ घेतां, नाम घ्या श्रीहरीचें।**
**सहज हवन होतें, नाम घेतां फुकाचें।**
**जीवन करि जिवित्वा अन्न हें पूर्ण ब्रह्म।**
**उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञ-कर्म॥**

यावरूनच बघ कीं, पूर्वींचे लोक आन्नला किती मानीत होते. मी कांहीं उगाच आपलं तें मला येतं, हें मला येतं अशा गोष्टींतल्या बाईसारखं, आमच्या पूर्वजांना माहीत आहे, म्हणून माहीत असलेल्या नि नसलेल्या सगळ्याच गोष्टी त्यांच्या अंगीं चिकटवीत नाहीं. पण अन्नाचा उपयोग नि स्वयंपाकाचें महत्त्व याची पूर्वींच्या लोकांना पूर्ण माहिती होती. मीं तुला कित्येकदां सांगितलं आहे कीं आमचं 'आरोग्यशास्त्र' धार्मिक-बंधनांनीं जखडून टाकलेलं होतं. हेंच पहा ना. भीमाचं बल्लवाचार्यपण किंवा द्रौपदीची सूर्यथाली यावरून ही कल्पना नाहीं का होत, कीं सूर्य किरणांच्या उष्णतेपासून पाकसिद्धि करायचा शोध त्या वेळीं लागलेला होता. सूर्यकिरणांचा अन्नांत प्रवेश करायचं महत्त्व त्या वेळच्या माणसांना पूर्णपणें पटलेलं होतं.

**सरल**—मावशी, 'स्वयंपाक आणि धर्म' यांचा कसा काय संबंध येतो हो? नि आपल्या धर्माचा संबंध सगळ्याच गोष्टींशीं कसा काय पोंचतो?

**मावशी**—बाळ, ज्याला तुम्ही आज कर्तव्य किंवा ड्यूटी म्हणतां, त्याला पूर्वीचीं माणसं धर्म म्हणत. आईचा मुलाप्रति धर्म, राजाचा प्रजेप्रति धर्म, कुटुंबाच्या मुख्य माणसाचा कुटुंबियांप्रति धर्म—असे शब्द वापरले जात होते. ज्याला तुम्ही आज़ कर्तव्य म्हणून बजवायला बघतां त्यापेक्षां हा माझा धर्म आहे, असं म्हटल्यानं आमच्या लोकांच्या मनावर जास्त परिणाम होतो. उदाहरणार्थ—तूं एखादी गोष्ट चुकत असलीस तर ती तुला दाखवून कर्तव्य केलं असं समजून गप्प बसतां येईल, पण धर्म या शब्दांत एवढं येतं कीं, वडीलकीच्या नात्यानं कुठल्याही अधर्माच्या रस्त्यानं तुला जाऊं देणं म्हणजे मला पाप लागेल, म्हणून तुला संभाळणं हा माझा धर्म ठरतो. आतां हा धर्म शब्द बारीकसारीक गोष्टींत आपल्याला कांहीं तरीच वाटतो; पण त्याचा अर्थ शब्दशः घ्यायचा नसून आपलं प्रत्येक नीतितत्त्व व आचरण बाल्यापासून वृद्धावस्थेपर्यंत धर्म या नांवानं गोंवलेलं आहे. याचा अर्थ ज्याला आज आपण धर्म म्हणतों तो धर्म मात्र हा नव्हे ! आमचा आहार नि आमचा स्वयंपाक याबद्दलचा विचार पूर्वकाळच्या लोकांनीं केलेला आहे, नि मधल्या काळच्या बायकासुद्धां परंपरेनं चाललेली पद्धत म्हणून व्यवस्थित करीत होत्या. आतां या नव्या पिढींतच प्रत्येक गोष्ट अशी कां ? ती तशीच कां ? आणि हें सारं सांगतां आलं तरच खरं, असल्या तऱ्हेचं बंड निघाल्यामुळं 'इतो भ्रष्टः ततो भ्रष्टः' अशी स्थिति झाली आहे. गिलक्याच्या फोडी कशा उकडायच्या, वांगीं कशीं भाजायचीं किंवा भाताला वाफ कशी आणायची, या गोष्टी परंपरेनं आम्हांला इतक्या बिनचूक शिकवल्या गेल्या होत्या कीं, हल्लींचं हें पढीक शास्त्र चुकेल पण आमच्यांतल्या अडाणी मुली दिखील चुकत नाहींत. कारण परंपरेनं आलेली ही गोष्ट

प्रत्येक आई आपल्या मुलीकडून रागावून, गोड बोलून, थपडा देऊन इतकी घटवून घेई, कीं तें चुकणंच शक्य नाहीं. नवीं मतं नि या शाळा यामुळं मुलींत या ज्ञानाचा अभाव होत चालला आहे. तुमचं मोज-माप चुकेल; पण आमच्या बायका पळीचा दांडा फिरवून कुठल्याही नव्या भांड्यांत बिनचूक भात मोजमापाशिवाय करूं शकतात. हें शास्त्र त्यांनीं अनुभवानं मिळविलेलं असतं."

त्या दिवशीं जेवणाबद्दलचा संवाद होऊन मावशी गेल्यावर सरलच्या डोक्यांत सारखा तो विषय घोळत होता. या वयांतल्या अल्पधीरी स्वभावाप्रमाणें, तिला एक सारखें असें वाटे, कीं जेवावं कसं नि काय याबद्दल मावशी काय म्हणतात, तें केव्हां ऐकायला मिळेल. पण ताबडतोब मावशीकडे जाऊन विचारणें तिला कसेसेंच वाटलें. पण दोन दिवसांनीं एके दिवशीं भाऊसाहेबांनींच रात्रीं जेवायच्या वेळीं तिला बोलावणें पाठवलें नि ती आल्यावर–

**भाऊसाहेब**–काय सरल, आतांशा पुष्कळ दिवसांत तूं कांहीं आली नाहींस. तूं आपली तुझ्या मावशीला भेटतेस! तिचं तुझं नातं, आम्हांला कोण विचारतो? पण मीं बोलावणं पाठवलं कीं, मावशीच्या निमित्तानं येशील नि मग गाड्याबरोबर नळ्यालाही यात्रा घडेल.

**सरल**—असं हो काय म्हणतां भाऊसाहेब! मी जशी कांहीं तुमच्याकडे येतच नाहीं! मावशी नि तुम्ही दोन आहांत वाटतं! असं काय? सांगा ना भाऊसाहेब, कां बोलावलं तें.

**भाऊसाहेब**—अग, आज तिनं मला खांडपोळी केली आहे, ती खायला तुला बोलावलं आहे. हें कोंकणी पक्वान्न तुम्हां देशावरच्या माणसांना माहीत आहे का?

**सरल**—हो. आपण कोंकणस्थ ना? आई सारी कोंकणी पक्वान्नं करते बरं का! पण परवां मावशींनीं मला एक नवी गोष्ट

सांगितली आहे. त्यांत मला त्यांना विचारायचं आहे कीं, ' कां जेवावं ?' याचा अर्थ सांगा.

**भाऊसाहेब**—वा, वा एवढी ग्रॅज्युएट मुलगी तूं. नि तुला कां जेवावं हें समजत नाहीं ? अग वेडे, भूक लागते म्हणून जेवावं. असें म्हणून ते हसायला लागले नि सरलही हसायला लागली.

**सरल**—इश्श, भाऊसाहेब, हें असलं का मला कळत नाहीं ?

**भाऊसाहेब**—मग तुझ्या मावशीच्या सांगण्यांत कांहीं गुह्यार्थ होता वाटतं !

**सरल**—वा, केव्हांही !

**भाऊसाहेब**—अहो, अहो प्रोफेसरसाहेब, बाहेर येऊन हे विद्यार्थी काय विचारताहेत तें सांगा बरं.

मावशी येत येत म्हणाल्या— हं, ती मुलगी खुळी, नि आपणाला कुणाची नक्कल करायला नको ! काय सरलाताई, काय सांगायचं आहे ?

**सरल**—नाहीं मावशी, खरंच, तुम्ही त्या दिवशीं म्हणालांत कीं, कां जेवायचं, नि कसं जेवायचं. त्या दिवसापासून माझ्या मनाला सारखी तळमळ लागली आहे.

**मावशी**— अग त्यांत तळमळ लागण्याजोगं काय आहे ! जेवणाकरतां जगायचं नसून, जगण्याकरतां जेवायचं आहे हें आपल्याला प्रथम कळलं पाहिजे. पुष्कळांच्या ध्यानांत ही साधी गोष्ट येत नाहीं.

**सरल**—म्हणजे काय ?

**मावशी**— अग, आपण जें अन्न खातो, तें आपल्या प्रकृतीला कितपत मानवतं, याचा विचार केला पाहिजे. मनुष्याच्या शरीराला कसल्या प्रकारच्या अन्नाची जरूरी आहे, हें खाणारे नि करणारे या

दोघांनाही कळलं पाहिजे. कारण एकाच जातीचं अन्न सगळ्यांनाच मानवत नाहीं. तसंच दुर्लक्षानं केलेलंही पटत नाहीं. अगदीं तान्हीं मुलं सोडल्यास लहान मुलांना, ज्याला दांतांचं काम पडतं असं अन्न दिलं पाहिजे. त्या वयांत त्यांच्या दांतांला व्यायाम हवा असतो. भाकरी, पोळी, ऊंस, कडधान्यें हीं सारीं चावयाची शक्ति त्यांच्या दांतांना असते, म्हणून त्यांना कुडकुडीत पदार्थ आवडतात. त्यामुळेंच त्यांच्या दातांची शक्ति वाढते. पण वयातीत माणसाला इतके कुडकुडीत पदार्थ खपत नाहींत. उलट पाश्चिमात्य देशांत या गोष्टीचा मुळींच विचार केला जात नाहीं. त्यामुळें त्यांच्या तिकडच्या लोकांचे दांत तयार अन्नानें बिघडलेले दिसतात, असें तिकडे गेलेल्या जबाबदार गृहस्था-कडून मला कळलेलं आहे. आपल्या इकडे बाजारी खाण्याचा रिवाज पूर्वी अगदीं कमी असे. फार थोडी मेवा-मिठाई, जत्रा वगैरे सारख्या वेळीं, विशेष प्रसंगीं, विकत आणायचा रिवाज होता. पण बदलत्या काळाबरोबर हॉटेलिंग वाढलं नि लोकांच्या प्रकृति बिघडल्या. लांब कुठं फिरायला गेलं नि तहान लागली तर ती भागवायला घरीं येत असूं. म्हणजे तितका वेळ ती तहान दाबायची शक्ति होती. पण आतां रस्त्यांत हॉटेल दिसलं कीं, चढ, अन् घे ड्रिंक ! घरीं देखील नीटनेटकं तयार केलेलं चांगलं अन्न नियमित वेळीं आम्ही खात होतों, त्यामुळं भुका चांगल्या असून, प्रकृतीसुद्धां घडधाकट असे. माणसं बलवान् नि तेजस्वी दिसत. डॉक्टर-वैद्याची इतकी जरूरी नसे. पण आतां सारंच बंधनाच्या पलीकडे गेल्यामुळं त्याला कुठंच पूर्णविराम नाहीं. त्यामुळं अन्नाच्या बाबतींत आमचं भयंकर नुकसान होत आहे. आचारधर्मानं विचारांना मदत होते नि त्यामुळं संस्कृति टिकवायला, पर्यायानं शरीरसंपत्ति टिकवायला मदत होते. बंधनं सोडल्यानं वरच्या वर्गाचे म्हणविणारे लोक वाटेल

तिथं वाटेल तेव्हां वाटेल तें खायला प्यायला लागले. नि त्यांचं उदाहरण म्हणून इतर वर्गीयही तेंच करायला लागले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत उकळणारा हॉटेली चहा, उघडीं असलेली ती मेवा-मिठाई, एक नि दोन! अशा किती तरी गोष्टी दाखवतां येतात, कीं त्यामुळं दांत बिघडतात, आरोग्य बिघडतं, प्रकृतीवर परिणाम घडतो. पण या गोष्टी, मुलांना मिळणारं शिक्षण मुलींना मिळूं लागल्यामुळं दिवसानुदिवस वाढत आहेत. मधलीं कांहीं वर्षं अशीं गेलीं कीं, एकटे मुलगेच शिकले, त्यामुळं बायकांसाठीं तरी कांहीं बाबतींत पुरुषांना अर्धविराम होई. पण आतां मुली स्वतां तेंच करतात तर मुलांना कोठून अडथळा करणार! म्हणून मी म्हणतें कीं, अन्न हें जगण्यासाठीं आहे हें, अन्न शिजवणाऱ्या ज्या स्त्रिया, त्यांना आधीं कळलं पाहिजे. पहिल्या बायकांना हें बरोबर कळत असे. पुष्कळशा घरीं घरांतच स्वयंपाक असे. अर्थात् इतर काम करीत करीत तो करायचा असल्यामुळं मंद-मंद विस्तवावर तो करायची चाल असे. उदाहरणार्थ, वरण. एकदां शेगडीवर डाळ टाकली, म्हणजे अर्थात् कढ येऊन गेला कीं, विस्तवही कमी होतो, नि तें मंद विस्तवावर सावकाश शिजतं. आतां बाया-ब्राह्मणांचं पाहा. धडधड जाळ लावून डाळ टाकतात नि ती शिजायची घाई. अर्थात् महिन्यांतून पंचवीस दिवस डाळीला करपलेला वास येत असतो. हीच गत इतर अन्नाची. पुष्कळशा भाज्या आपण पाण्याशिवाय शिजवतों, पण त्याला सावकाशी आणि दम लागतो. या लोकांच्या हातनं किती सांगितलं तरी तें होणं नाहीं. धडधड जाळानं अथवा पाण्यानं भाजीपाल्यांतलीं हवीं असणारीं जीं द्रव्यें असतात, तीं जातात. म्हणून हें व्हिटॅमिनचं खूळ निघालेलं आहे. कुकरची उत्पत्तिही त्यामुळंच झाली. म्हणून मी जें म्हणतें, कीं अन्न का नि कसं खावं, हें बायकांना

आधीं कळलं पाहिजे. पूर्वीं सोवळ्या-ओवळ्यामुळं कांहीं वयानंतर मंडळी भाजलेलं अन्न खात. याचा अर्थ भाजलेलं अन्न पचनाला हलकं असतं. त्यानंतर एक वेळ जेवण, रात्रीं अल्पाहार, फलाहार करीत. या सगळ्यांत शरीरप्रकृतीकडे लक्ष देण्याचं मोठं महत्त्वाचं तत्त्वं साठवलेलं आहे. म्हणूनच स्वयंपाक करणाऱ्यांनीं घरांतल्या माणसांचं वयमान नि प्रकृति पाहून करायला शिकलं पाहिजे आणि खाणारांनींही वयमान, प्रकृति, धंदा हें पाहून खायला शिकलं पाहिजे. जसं लहान मुलांना दुधाची अधिक जरूरी असते; तसंच जरा मोठ्या नि तरुण माणसांना तूप, दूध, दहीं, ताक हें सारंच अधिक हवं. जसं जसं वय वाढत जातं तस तसं जडान्नावरचा हात थोडा कमीच केला पाहिजे. चुरचुरीत, फुरफुरीत जिन्नस जेवणांत किती प्रमाणांत खायचे तें अवश्य पाह्यलं पाहिजे. शिळ्या नि ताज्या अन्नाचा फरक ध्यानीं घेतला पाहिजे. कोणतं अन्न शिळं खाल्लं तर चालेल, तें कसं नि केव्हां खायचं हेंही पण कळलं पाहिजे. एवढाच माझ्या म्हणण्याचा अर्थ होता.

**सरल**—शिळ्या अन्नांत काय करायचं असतं मावशी?

**मावशी**—अग हो तर! भात फार शिळा खाऊं नये. फोडणीचा करून खायला आवडतो, तरी तसा तो क्वचितच करावा. होतां होईतों भात बेतानंच करून वेळेवारीच संपवावा. पोळी, भाकरी हीं दुसरे दिवशीं शिळी चालते. तळकट अन्न एकदोन दिवस राह्यलं तरी चालतं. म्हणूनच प्रवासांत पुऱ्या न्यायची चाल आहे. लाडू वगैरे भाजलेलं अन्न अधिक टिकतं.

**सरल**—हो, आतां मला कळलं, बरं का. सोवळ्यांत ठेवलेला दुपारचा भात रात्रीं सोवळ्या बायकांना कां चालत नाहीं नि दशमी सोवळ्यांत ठेवलेली दुसरे दिवशींही कां चालते यांतला फरक मला

आतां कळला. पण मावशी, या जुन्या बायकांना याचीं कारणं समजून सांगतां येत नाहींत. त्यामुळंच हें सारं बुडालं; नाहीं का?

**मावशी**—तुम्ही अधिक शहाणीं झालांत त्यामुळं बुडालं. जुन्या बायकांना जरी कारणं सांगतां येत नसलीं तरी जोंपर्यंत त्याची कारणपरंपरा आपल्याला लावतां येत नाहीं, तोंपर्यंत त्यांची आज्ञा म्हणून ऐकायचं ही पद्धत जर तुम्हीं ठेवली असती तर वयाच्या वाढीबरोबर ज्ञान वाढलं असतं नि मग तीं कारणं आपलीं आपण उलगडलीं असतीं. पण तुमच्या या नव्या पिढीचं असं आहे कीं, बाप दाखवा नाहीं तर श्राद्ध करा. प्रत्येक गोष्ट समजावून सांगतां आली तरच करायची; असं हें जें हल्लीं नवं तत्त्वज्ञान आमच्याकडे निघालं आहे, त्यानं आमचं फार मोठं नुकसान झालं आहे. आमची पहिली परंपरा अशी आहे कीं,—आधीं आज्ञा....मग चर्चा [ First obey, then Argue ] धार्मिक पाठांतराचीसुद्धां हीच मौज आहे. कांहीं वयांत वडील माणसं आपल्याला नुसतं पाठांतर करायला लावतात, त्या वेळीं त्याच्या अर्थाचा विचार तींही करीत नाहींत व आपल्यालाही शिकवीत नाहींत; पण संवयीनं, आपण मोठीं झालों म्हणजे तें गुणगुणूं लागतों. अर्थात् आपलं ज्ञान वाढलं म्हणजे एकताननतेनं गुणगुणत असतां त्यांत आपल्याला गमतीनं सुंदर अर्थ दिसूं लागतो. आपण जर लहानपणींच असं ठरवलं असतं कीं, अर्थ कळत नाहीं तर शिकायचंच नाहीं, तर आज आम्हांला ज्या बारीकसारीक पाठांतराचा जो बोध होतो तो झाला नसता; कारण नव्या विचारांच्या कसोटीला न उतरल्यामुळं बारीक-सारीक पाठांतराचा लोप होत आहे, अशा वेळीं हें पाठांतर सांपडलं असतं कुठं? उदाहरणार्थ 'शुभं करोति' हेंच घे. संध्याकाळ झाली कीं, इच्छा असो कीं नसो तें तोंडीं येतं; आणि मग त्यांत

आपल्याला किती गंमत वाटते. तसंच, अन्न शिजवायची, स्वयंपाकाची नि जेवणाची जी परंपरा आहे हिचा तुझ्यासारख्या सुशिक्षित मुलीनं जर विचार केला, तर त्यांत तुलासुद्धां इतकं अर्थगांभीर्य दिसेल, कीं तुझं तुला आश्चर्य वाटेल.

**भाऊ**—माझे हातसुद्धां वाळले पण तुमचा संवाद कांहीं संपत नाहीं.

**मावशी**—झाला बरं आमचा संवाद ?

**सरल**—पण भाऊसाहेब, तुम्ही कां अशी मावशींची नेहमीं टिंगल करतां ? त्या मला चांगली माहिती देतात.

**भाऊ**—देईना ! मी तरी तेंच म्हणतों. एकादा क्लास काढला तर १०।२० रुपये पगार तरी मिळेल; व त्यांत तेवढा ब्राह्मण तरी ठेवतां येईल ! म्हणजे मग 'मी स्वयंपाक करतें, मी स्वयंपाक करतें' अशी हिची बढाई तरी नको.

**सरल**—मावशी, भाऊसाहेब असंच कांहीं तरी बोलायचे. तुम्ही आपल्या मला कांहीं तरी खायला द्या म्हणजे मी घरीं जातें.

# प्रकरण ११ वें

**कपिला गाईचे पाणीदार डोळे ।**
**श्रीमंतींत लोळे माईबाई ॥**

गांवांत कांहीं उत्साही बायकांनीं एक स्त्रीसमाज स्थापन करायचें ठरविलें होतें, नि त्यांत येण्याचें आमंत्रण देण्याकरतां जहागिरदारीण-बाईंना बोलवावयाचें काम मावशींकडे आलें होतें म्हणून सरलला घेऊन त्या दुपारीं त्यांच्याकडे गेल्या. मधल्या माजघरांत एक भाज्यांचा ढीग पडला होता. त्याची काय काय व्यवस्था लावायची तें बाईसाहेब उभे राहून सुचवीत होत्या. त्यांनीं स्वयंपाकीणबाईंना सांगितलें कीं, " मेथीची भाजी चांगली शिजूं द्या; नाहीं तर ती मग चोथापाणी होते." स्वयंपाकीणबाई म्हणाली, " मी तर पुष्कळ शिज-वतें, पण या भाज्या सुकतात ना, त्यामुळं ती मिळून येत नाहीं."

**मावशी**—अहो बाई, भाज्या किनई आणल्याबरोबर झाकून ठेवाव्या म्हणजे वाळत नाहींत आणि मग लवकर शिजतात.

तशी ती बाई आपली चूक दिसूं नये व मालकीण तर खूष राहावी या दिमाखानं म्हणाली, " अहो, तें काय तुमच्या आमच्या इथल्यासारखी २।४ जुड्या भाजीच्या आहेत, तर झाकायच्या ? इथं मोठ्या घरचं सारच मोठं ! आल्यागेल्याला नाहीं म्हणायचं नाहीं हा तर आमच्या बाईसाहेबांचा बाणा ! तिथं कसल्या भाज्या झाकणार नि कसलं काय !

**मावशी**—खरं आहे तें. भाजी पुष्कळ असते खरीच. अहो, श्रीमंतांच्याकडे असायचीच ती पुष्कळ ! पण श्रीमंतांकडे झाकायला मोठीं भांडींही असतात नि तुम्हांसारख्या बायकांही असतात. आमच्या घरीं आम्हीच झाकतों. श्रीमंतांच्याकडे तुमच्यासारख्यांनीं झाकावं.

इतकें बोलून मावशी दुसरीकडेच गेल्या. मग त्यांना जें काय आमंत्रण वगैरे द्यायचें होतें तें देऊन त्या घराकडे परतल्या. तेव्हां मग सरल म्हणाली,

" मावशी, माझ्याकडे चला ना ? मी सरबत करतें." मग दोघीही तेथें गेल्या सहाजिकच त्या बाईचा विषय निघाला.

**सरल**—ती बाई असं कसं हो फटदिशीं म्हणाली ?

**मावशी**— यांत मला लागावं असा तिचा हेतु नव्हता, तर मालकिणीला खूष कशी करावी हा तिचा हेतु होता. बाकी पुष्कळ घरीं भाज्यापाले झाकायची आबाळ नेहमींच असते.

**सरल**— हो खरंच, असं पुष्कळदां दिसतं खरंच. कांहीं घरीं आपण दुपारचीं गेलों तर सकाळच्या बाजाराचा ढीग एका बाजूला पडलेलाच असतो; किंवा फार तर एका टोपल्यांत भरलेला असतो. एके ठिकाणीं तर आदले दिवसाची आलेली कुठली ओटी सुद्धां भाजीशेजारीच लोळत होती.

**मावशी**— अग, त्याचीं अनेक कारणं असतात. कांहीं घरीं लहान लहान मुलांबाळांत संध्याकाळीं बाहेरून आल्यापासून दुसरे दिवशीचीं दुपारचीं जेवणं उरकेपर्यंत त्या बाईला बिचारीला फुरसत होत नाहीं. बरं, नोकर म्हणशील तर इतके इमानी नि सांगकाम्ये असतात कीं, बोलून सोय नाहीं. १२ नि १२ चोवीस वर्षं झालीं तरी पहिल्या दिवसासारखेच ! आमचा राघूच पाहा ना ! त्यानं अंथरुणं घातलीं तर सकाळीं काढतांना जेवढ्या वस्तु अंथरुणांत असतील तेवढ्या तिथंच ठेवील, यांत कांहीं बदल होणार नाहीं. तरी पण सर्व ठिकाणीं अशीच परिस्थिति असते असं नाहीं. जसं, कोणी आपल्याकडे परके आले तरी देखील हातांतील काम टाकून बोलायचं नाहीं, हा जसा कांहीं बायकांचा कामाचा अतिरेकी स्वभाव, विशेषतः जुन्या

बायकांचा—तसेंच दुसरें टोक. ही आली, ती आली म्हणून रोजच्या येणाऱ्या बायकांत सुद्धां आपलीं जरूरीचीं कामं वेळच्या वेळीं करायचीं नाहींत असं होतं.

**सरल**——खरंच ! आपण परवां त्या बोडसांच्याकडे गेलों होतों तर त्या बाई नाहींत का आपल्याला चटई घालून देऊन आपण घरांत जाऊन उडदाच्या डाळीचा डबा पाखडायला घेऊन आल्या ?

**मावशी**——याचं कारण एकच. मी तुला परवां म्हटलं तसंच. म्हणशील, कीं वारंवार तेंच म्हणतां; पण कारण तेंच कीं अन्नाचं महत्त्वच आपल्याला आतांशा कळेनासं झालं आहे. टवटवीत भाजीपाला असला म्हणजे तो मंद अग्नीवर चांगला शिजतो; पुष्कळशा भाजीपाल्यांचा कच्चाच उपयोग करतां येतो; कच्च्यांत पुष्कळ गुणधर्म आहेत; शिजवायच्या असल्या तरी त्या चांगल्या शिजतात, व ठेवायच्या असल्या, तर पुष्कळ दिवस टिकतात. भाजीपाले व फळं संभाळण्यांत दिखाऊपणापेक्षां सोयीकडे अधिक लक्ष द्यावं लागतं. उदाहरणार्थ— फळं आणलीं, टोपलींत भरलीं व ती टोपली खुंटीला लावली. भरलेली पाटी सुरेख दिसते पण तीं वाळतात. कांहीं भाज्यांचं तसंच आहे. लिंबू, मिरची, आलं, कोथिंबीर हीं निरनिराळ्या तऱ्हेनं संभाळून ठेवलीं तर कांहीं चार, कांहीं सहा, कांहीं आठ दिवस टिकतात. मोठ्या शहरांत पैसे टाकले म्हणजे सारं मिळतं; पण लहान गांवांतून बाजारच्या दिवशीं आणलेल्या वस्तु आठ दिवस टिकवाव्या लागतात. तिथं ज्या बायकांना उद्योगीपणा करायला नको त्यांच्या घरीं पुरुषांच्या जेवणाखाणाचं नि पैशाचंही नुकसान ! आपल्या ऐपतीच्या मानानं भाजीपाले आणून असेल त्यांत बेताबाताच्या खर्चानं आपल्या घरच्या माणसांना कोंड्याचा मांडा करून घालणं

हेंच गृहिणीचं खरं कर्तव्य आहे. श्रीमंतांकडे जसं देखरेख ठेवून बाईनं आपल्या लायकीचं अन्न आल्यागेल्याला घातलं पाहिजे, तसंच मध्यम स्थितींतल्या आणि गरिबांच्या बायकांनीं आपल्या ऐपतीनुसार नीटनेटकं सुग्रास अन्न करून घालायला शिकलंच पाहिजे. नि तें करायचं म्हणजे घरांत येणारी प्रत्येक वस्तु कशी संभाळायची, कशी ठेवायची, तिचा उपयोग कसा करायचा हें तिला आलंच पाहिजे. नुसता स्वयंपाक येणं हेंच स्त्रियांचं काम नसून त्याची पूर्वतयारी करतां येणं हें अधिक महत्त्वाचं काम आहे. पूर्वीं लहान लहान मुलींना हें शिक्षण सहज आईच्या हाताखालीं मिळे. आई कामांत असली म्हणजे ती मुलीला म्हणे— आळू आहे ना! पानं देठ्या-वेगळ्या कर, एका देठीचे लांब दोर काढ, आतां देठीचे तुकडे कर, तें पानांत घाल, त्यांची वळकटी कर. थोडी कोथिंबीर असली तर त्यांतच ठेव. वरून तो दोर गुंडाळ नि एका ओल्या फडक्यांत गुंडाळून ठेव. मेथीची भाजी कशी झाकायची, कोथिंबीर असली तर खालचीं पानं तोडून घ्यायचीं, मुळं तोडायचीं नि जुड्या बांधून पाण्यांत उभी करायची. अशा तऱ्हेनं ती मुलीला सांगून, रागावून, काम करवून घेत असे. त्यामुळं स्वाभाविकच हीं कामं परंपरेनं येत होतीं. आतां १० च्या शाळा म्हणून उठल्यापासून तुम्हीं ठणकतां. त्यांत आईनं तुम्हांला हाक केव्हां मारायची!

**सरल**—मावशी तुम्ही सारं चांगलं सांगितलंत. पण शेवटीं माझ्या शाळेवर आणलंत अं! मी आतां लिंबाचं सरबत देऊन तुम्हांला गप्प करणार!

**मावशी**—हो खरंच! माझ्या लक्षांतच नाहीं. तुझ्या शाळे-बद्दल कांहीं बोलायचं नाहीं! नाहीं का? बरं तर, मीही आतां सरबत पिऊन घरीं जातें कशी!

---

# प्रकरण १२ वें

**भिंती सारविल्या । वर काढिलें ताम्हण ।**
**तुझ्या मुंजिचे सामान । राजा बाळ ॥**

आज सकाळीं लवकर उठून मावशी पापड्या घालीत होत्या. तोंच सरलाताईचा फेरा आला. ती म्हणाली, “ मावशी, मी ओल्या पापड्या खायला आलें आहे ! मला कसं कळलं, सांगा बरं ! ”

मावशी हसून म्हणाल्या, “ आवडत्या गोष्टी नेहमींच लवकर कळतात ! हं ही घे पापडी.”

**सरल**—मावशी, हा तुम्हांला किती त्रास पडतो. आज १५ दिवस झाले तुमचं सारखं एक एक सुरूच आहे. मग मुंबईस जसे बेडेकरांचे पापड वगैरे मिळतात, तसे आपल्या इथं जर पापड-पापड्या मिळतील तर किती मजा होईल. नाहीं का ! तुम्हांला किती त्रास पडतो ?

**मावशी**— अग या खेडेगांवांतून मिळत नाहीं हें खरं ! पण तूं मला सांग, बाजारी आयते पदार्थ चांगले असतात का ! क्वचित् तें जरा खमखमीत लागतात. पण तें स्वच्छतेच्या दृष्टीनं नेहमींच टाकाऊ असतात. कुठलाही जिन्नस धंद्याच्या दृष्टीनं मनुष्य करायला लागला म्हणजे त्यांत स्वच्छता नाहींशीच होते. तुझ्या विलायतेंत काय आहे तें मला ठाऊक नाहीं; पण आपल्या इकडे तर त्यांत आळशीपणा होतोच होतो. मसाल्याचं सामान आपण घरांत किती काळजीनं निवडीत असतो. उघड्यापाघड्याला आपण किती जपतों; तितकं का तें लोक करतात असं तुला वाटतं ! तेव्हां आपल्याला काम नको म्हणून, बाजारी आणून खाण्याची पद्धत स्वच्छतेच्या

दृष्टीनं, शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीनं केव्हांही वाईटच. कारण कोठ्याला सुद्धां पचनशक्ति पाहून घातलेलं अन्न हवं असतं. अशा वेळीं ते बाजारी मसाले, पापड, लोणचीं, मेतकूट, भाजण्या हीं आणून खायला घालणं हा अन्याय आहे. आतां त्यांतल्या त्यांत एकादी बाई खूप महत्त्वाचीं सार्वजनिक कामं करीत आहे नि त्यांत तिला फुरसत होत नाहीं, अशा बाईनं जर अशा बाजारी वस्तु आणल्या तर एक असो पण शेंकडा ९९ मुली ज्या कांहीं तीं करीत नाहींत—

इतक्यांत पाठीमागून भाऊसाहेब म्हणाले, "वा क्लब करतात कीं! का सरलाताई, तुझी ती मिसेस् उंचे नाहीं का समाजकार्य करीत? बिचारा तो नवरा पुष्कळ वेळां जेवायलासुद्धां त्या हॉटेलांत येतो. मी सुद्धां हिला म्हणतों, कीं एकाद्या क्लबची सेक्रेटरी किंवा अध्यक्ष हो; कारण आमच्या त्या शंकररावांसारखे बटाटेवडे हिला कधींच येत नाहींत. ते तरी मला मिळतील! ही घरांत स्वयंपाक करते त्यामुळं मला बाहेर जेवतां येत नाहीं. वास्तविक पाहिलं तर सकाळीं टेनिस खेळावं; संध्याकाळीं बॅडमिंटन खेळावं, समाजकार्याकरितां म्हणून दुपारीं कुठं तरी चहाला जमून कोण चांगलं, कोण वाईट, काय करायला हवं, काय नको, कोण पुढारी चुकतो; जपान, अमेरिका वगैरे वगैरे झाडून साऱ्या देशांत बायकांनीं काय केलं, आमची अवनति कां झाली, वगैरे वगैरे विषयांवर सडकून चर्चा करावी, अशा तऱ्हेचा कार्यक्रम चालवावा असं मी हिला नेहमीं सुचवतों.... पण जाऊं दे, हिला कांहीं तें जमायचं नाहीं!— सरल, मला ओल्या पापड्या खायला दे कशा!

**सरल**— भाऊसाहेब तुम्ही देखील ओल्या पापड्या खातां?

**भाऊ**—अग वा! म्हणजे काय? तूंच तेवढी लहान म्हणून खाव्या होय? ही तुला बोलवून देते, पण मी घरांत असून मला

मात्र नाहीं ! म्हणजे तुझी मावशी नवी गृहिणी तर ठरत नाहींच पण जुनी आर्य गृहिणीही नाहीं. कारण जुन्या गृहिणींना " भोज्येषु माता " म्हटलं आहे. म्हणजे खाण्याच्या वेळेस हिनं माझ्या आई-सारखी काळजी घेतली पाहिजे. पण ही जितकी भाचीची काळजी घेते तितकीसुद्धां माझी घेत नाहीं !

इतकें ते म्हणत आहेत तोंवर मावशींनीं २।३ ओल्या पापड्या काढून लहानशा ताटलींत घालून त्यांच्यापुढें ठेवल्या नि म्हणाल्या, " सरल, आपण जर हें सारं बाजारी खायचं ठरवलं तर आपल्या माणसांना हे असले पदार्थ कसे मिळतील ? हं, येवढं मात्र खरं कीं, ज्या वेळीं आपण कांहीं तरी महत्त्वाचं कार्य करीत असूं त्या वेळीं हीं कामं दुय्यम समजून आपण टाकायचीं. पण जोंपर्यंत इतकं किमती काम आपल्याला करतां येत नाहीं तोंपर्यंत तरी घरांतलीं हीं सारीं आवश्यक, अनावश्यक म्हणजे शोभेचीं कामं आपणच केलीं पाहिजेत. त्यांचा आळस करणं म्हणजे गुन्हा आहे."

**सरल**—मावशी, खरंच या आठवड्यांत तुम्ही कित्ती कामं केलींत ! पोह्यांचे पापड, उडदाचे पापड, कुरडया, चिकोड्या, तऱ्हतऱ्हेच्या मिरच्या, सांडगे वगैरे वगैरे. हें सगळं आठवडा का महिना झाला सुरू झाल्याला ! तुम्हांला कसा कंटाळा आला नाहीं ?

**मावशी**—बाळ, तूं मोठी झालीस, तुझ्या डोळ्यांवरची या शिक्षणाची धुंदी गेली म्हणजे तुला कळेल, कीं आपणसुद्धां असं कांहीं तरी केलं पाहिजे. कारण कविलोकसुद्धां म्हणतात कीं " नसावें कधींहि स्त्रियांनीं रिकामें ॥ " अन् प्रत्येक स्त्रीला लेखनकला येते का ? प्रत्येक स्त्रीला समाजकार्याची आवड व अनुकूल परिस्थिति आहे का ? कारण आपल्याला वाटतं तितकं समाजकार्य सोपं नाहीं आहे. नाटकं कादंबऱ्यांतून एखादी समाजकार्य करणारी

नायिका दाखवणं ध्येयाच्या दृष्टीनं ठीक असतं. पण व्यवहारांत खऱ्या समाजसेविका क्वचितच मिळतात. येवढंसं कांहीं करायला घातलं, कीं बायकांना आपण शतकृत्य करतों आहोंत असं वाटतं; त्यांना कोणी 'हूं' म्हटलेलं खपत नाहीं. पण खरं कार्य करायला उभं राहणारीला लोकांच्या टीका, शिव्या, हें पदरांत पाडून घेऊन कार्याबद्दलची निराशा पदोपदीं अनुभवावी लागते; व त्यामुळं असं काम करायला सहसा कोणी कबूल होत नाहीं. ज्याला आज 'समाजकार्य', 'समाज-कार्य' म्हणून म्हटलं जातं, तें पुष्कळ अंशीं करमणुकीचं साधन आहे. तें करतांना आपल्या कर्तव्याकडे कानाडोळा करायची मुळींच जरूरी नाहीं. बायकांनीं आर्थिक स्वातंत्र्याच्या नांवाखालीं बाहेरचीं कांहीं तरी कामं करण्यापेक्षां घरांत राहून जर घरगुती कामं केलीं तर आनंद, समाधान व आर्थिक बचत हीं त्यांना लाभतात.

**सरल**—खरंच मावशी, तुमचं सांगणं, विचार करण्यासारखं आहे. मी त्यावर आतां खूप विचार करीन.

---

# प्रकरण १३ वें

वरी, नाचणी, भात, पिकवितो कोंकणचा प्रांत ।
गहूं, बाजरी, कापुस, शाळू, देशावर होत ॥

आज क्लबच्या मीटिंग करतां जायचें ठरल्यामुळें, सरला मावशींना बोलवावयास आली होती, तों घरांत निरनिराळ्या धान्यांची गाठोडीं येऊन पडलीं होतीं. तीं पाहून सरला म्हणाली, "मावशी आज मोलकरणीनं किंवा गड्यानं धान्यं भरलेलीं दिसत नाहींत. मग मी करूं का तुम्हांला मदत ?"

**मावशी**—तीं इतक्यांत भरायचीं नाहींत. त्यांना भरून काय करायचं ! अजून त्यांना उन्हं द्यायचीं असतात. तीं जर भरपूर दिलीं नाहींत तर त्यांना भुंगा लागतो; म्हणून सगळ्या धान्यांना उन्हं द्यायचीं; डाळी करायच्या असतील त्यांच्या डाळी करायच्या व बाकी धान्यं कांहीं तरी लावून ठेवायचीं.

**सरल**—सगळ्याच धान्यांना काय लावायचं ?

**मावशी**—सगळ्यांना लावावं लागत नाहीं; पण कडधान्यांना लावायचं असतं. मूग, मटकी, वाल, चवळी हीं धान्यं गोवऱ्याची बारीक राख चाळून त्यांत कालवून ठेवतात. पण मुंबईसारख्या ठिकाणीं राख मिळणं मुष्कील असतं तिथं, किंवा कोंकणांत, वालांना तांबडी माती लावण्याचा प्रघात आहे; पण एरंडेल तेल लावून जरी धान्यं ठेवलं तरी तें टिकतं; पण तें फार महाग पडतं. तेव्हां ज्याच्याकडे घरांतच कोठी वगैरे आहे, त्यांनीं एरंडेल बेतानं लावून धान्य ठेवलं तर गैर नाहीं; पण ज्यांच्या इथं सर्व नोकरांच्या स्वाधीन आहे त्यांनीं मात्र निम्मीं धान्यं बाजूस काढून निम्यांना लावावं; म्हणजे

५।६ महिने पुढं टिकणाऱ्या धान्यांना लावावं. कारण नोकरांचा कारभार असा असतो, कीं हातीं येईल तें खर्चायचं; नव्या-जुन्याचा प्रश्न नाहीं. म्हणून आपण ही काटकसर बघितली पाहिजे. नवीं धान्यं आलीं म्हणजे जुनीं धान्यं डाळी करून सारावीं. जुनीं शिल्लकच नसलीं तर नव्यांच्या डाळी कराव्यात. घरीं डाळीडुळी केल्या म्हणजे चांगल्या स्वच्छ नीटनेटक्या खायला मिळतात; चाराचुरीचा उपयोग होतो, व कोंडा-भूस गुरांना मिळतो.

**सरल**—मावशी, शहरांत कुठं या सोयी असतात ?

**मावशी**—कुठं तरी वर्तमानपत्र वाचून अगर एखादं मासिक चाळून आलेली दिसतेस! अग, एक मुंबई म्हणजेच का सारं जग! मुंबईत नसेल सोय ! पण इतर गांवांतून, काम करायचं आहे त्याला साऱ्या सोयी आहेत. उलट, मी तर असं म्हणेन कीं, जिला सवड असेल त्या बाईनं स्वतःच हें करावं. घरांतील बारीकसारीक पिठं तिनंच दळावीं. कारण घरगुती दळलेलीं पिठं सर्वांत चांगलीं. गिरणीचं पीठ अगदीं निःसत्त्व असतं म्हणून चांगल्या प्रकृतीच्या मुलींनीं तांदळाच्या डाळीच्या कण्या, गव्हाचा रवा, हीं घरीं करायचा प्रयत्न करावा. पूर्वीं घरांतच दळण-कांडणाची पद्धति होती, पण यांत्रिक शक्तीचा इतका प्रसार झाला कीं, आपण नुसत्या ऐदीच झालों असं नाहीं; तर हें निःसत्त्व अन्न खाऊन पूर्ण निःसत्त्व बनलों. दोन दोन घागरींनीं पाणी भरणाऱ्या, कडेवर मूल घेऊन चार चार मैल चालणाऱ्या, पूर्वींच्या आमच्या आया, मावश्या, आज्या कुणीकडे व आतांच्या आम्ही स्वयंपाक देखील न करवणाऱ्या शोभेच्या पुतळ्या कुणीकडे ! हा आमच्यांतला कमीपणा पाहून, तो काढून टाकायची बुद्धि परमेश्वर कधीं देईल ती देवो ! जिला जिला देशभक्ति करावीशी वाटत असेल तिनं प्रथम घरगुती दळणकांडणाची सुरवात

केली पाहिजे. तांदूळ सडण्याच्या व दळण्याच्या गिरण्यांनीं अन्न निःसत्त्व झालीं; गरीब बायकांत बेकारी वाढली. मोठ्या कुटुंबांत दळणकांडणाच्या उद्योगावर दोन बाया पोसल्या जात असत. आतां त्या बिचाऱ्या बायकांपैकीं कांहींना काम मिळत नाहीं व कांहीं बिचाऱ्या गिरण्यांतून शिरतात.

**सरल**—मावशी, हें सारं तुम्हीं कुठं हो वाचलंत?

**मावशी**— वेडे, जगाचं पुस्तक व दृष्टीचं यंत्र एवढं मोठं आहे कीं, जन्मभर वाचून संपायचं नाहीं; व त्याच्या जोडीला थोडीशी विचारशक्ति चालवायची!

**सरल**— पण मावशी, आतां चोहूंकडे भाज्या किती तरी मिळतात. मग येवढी खटपट करून उसळी कशाला खायच्या?

**मावशी**— वेडे मुली, तुला इतकं शिक्षण घेऊन देखील हें कळलं नाहीं कां, कीं शरीराला साऱ्या प्रकारच्या धान्यांची जरूरी आहे? कडधान्यांत जीं निरनिराळीं द्रव्यें आहेत त्यांची शरीराला आवश्यकता आहे. शिवाय स्वयंपाकांत देखील निरनिराळ्या प्रकारच्या डाळी निरनिराळ्या भाज्यांत **व्यंजन** म्हणून आपण घालतों. पडवळाची भाजी वालाच्या बिरड्यांनीं सुंदर होते; दुध्याच्या भाजीला मुगाची डाळच लागते; मिसळीची आमटी पुष्कळांना आवडते. उडीद, मटक्या, चवळ्या, यांच्या डाळी निरनिराळ्या वड्यांना लागतात. दहीवडा खायला हवा नि डाळी मात्र नको म्हणतेस नाहीं कां! पापड, डांगर खायचं नि डाळी मात्र नकोत का?

**सरल**— हो, मावशी, हें लक्षांतच नाहीं माझ्या बरं का! आतां दहीवडे कधीं करणार?

**मावशी**— जे दिवशीं तूं स्वतः डाळीडुळी करून मला पाह्यला बोलावशील ते दिवशीं !

**सरल**—ही अट फारच मोठी. मग मावशी, तुम्ही याच विषयावर आपल्या क्लबांत व्याख्यान कां नाहीं देत ?

**मावशी**—अग, तुमच्या क्लबांत कसलीं व्याख्यानं देतेस ! पोरी, ऐकून तरी घेतील का? आणि माझ्या वयाच्या बायका टिंगल करतील, कीं यांत मोठी माहिती ती काय सांगितली म्हणून ! चल, माझं लुगड सुद्धां नेसून झालं पण तुझ्या गप्पा संपल्या नाहींत.

**सरल**— हो, हो ! खरंच, चला.

# प्रकरण १४ वें

**जिवन करि जिविस्वा अन्न हें पूर्णब्रह्म**
**उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म।**

सरल आंत आली तेव्हां शरद हें म्हणत होता. तें ऐकून ती म्हणाली, "मावशी, हा श्लोक रोज म्हणण्यांत काय विशेष आहे?"

**मावशी**—अग, आपण ज्या गोष्टी करतों त्या आंधळ्यासारख्या करूं नयेत ह्याची जाणीव करून देणं आहे. तुम्ही जेवण म्हणजे पोटाला भर घालणं नि जिभेचे चोजले पुरविणं समजतां.

**सरल**— मग दुसरं काय?

**मावशी**— आमच्या सुज्ञ पूर्वजांनीं आमच्या जीवनाचीं कांहीं तत्त्वं ठरवलीं आहेत; त्यांत सायन्स आणि आरोग्य या दोन्ही दृष्टींनीं सारखाच विचार केलेला आहे. प्रत्येक धान्यांतला गुणधर्म, प्रत्येक भाजीपाल्यांतला गुणधर्म जसा बघितला, त्याचप्रमाणं कोणतं अन्न कोणत्या वयाला किती पचेल, याचाही त्यांनीं फार सूक्ष्मपणें विचार केलेला होता; आणि सोवळ्या-ओवळ्याच्या नांवानं तो त्यांनीं आमच्या धर्मशास्त्रांत, म्हणजे जेवणशास्त्रांत, गोंवला आहे. उदाहरणार्थ, अमक्या वयानंतर संध्याकाळीं निर्लेप खायचं, कारण भाजलेल्या धान्यांतलं जडत्व कमी झालेलं असतं. हल्लीं मात्र सर्रास, तरुण पिढीला सुद्धां, गिरण्यांमुळं भाजलेलं अन्न रोज मिळतं. ज्याप्रमाणं निर्लेपाची सोय शरीरप्रकृतीकरतां केलेली आहे त्याचप्रमाणं जिभेची सोय आमच्या सणावारांनीं केलेली आहे; कारण आमच्यांत मुख्यतः बारा महिन्यांत बारा सण आहेत. त्या प्रत्येक सणास निरनिराळा नैवेद्य लागतो; म्हणजे त्या त्या सणाच्या निमित्तानें वर्षांतून एकदां

तरी तो तो पदार्थ बायका हटकून करतात. गणपतीला मोदक, देवदिवाळीला वडे-घारगे; दिव्याच्या अवसेला दिवे, भोगीला खिचडी संक्रान्तीला गुळाची पोळी, करीला घिरडीं, शिमग्याला नव्या शेवया, वडे, पापड, गौरीला खीर, या वस्तु त्या त्या सणांशिवाय उभ्या वर्षांत बायका करीत नाहींत. कोणीही पाव्हणारावळा आला तरी आपण चटदिशीं, सांजा, लाडू, पुरी, श्रीखंड, बासुंदी, साखरभात वगैरे पदार्थ करतों; म्हणून हे पदार्थ कुठल्याही देवाच्या नैवेद्याला सांगितलेले नाहींत. सारांश काय, जिनसांचें वैचित्र्य राहावें, किंचकट असले तरी करायची बुद्धि व्हावी, अशा हेतूनेंच ही योजना केली गेली आहे. याचं प्रत्यंतर आपल्यालाही येतंच. गणपतीशिवाय मोदक कधीं कोण करतं? सारांश, इतर शास्त्रांइतकाच स्वयंपाकशास्त्राचाही विचार आमच्या पूर्वजांनीं केला होता. या शास्त्रांत एका काळीं आपण फार पुढं गेलेलों होतों. आपल्या बहुतेक गृहिणींना कोणतं अन्न केव्हां व कसं खायचं, नि त्याचे गुणधर्म काय, हें माहीत होतं. ज्याचं आज आपण व्हिटॅमिन, व्हिटॅमिन म्हणून प्रस्थ माजवतों नि ज्याचा उपयोग करण्याकरतां मारे आरडाओरड करीत आहों ती माहिती आमच्या गृहिणींना शास्त्रीय शब्दांत सांगतां आली नसली तरी पायाशुद्ध होती. रताळीं, काकड्या, मुळे, गाजरें, या वस्तु कच्च्या मिठातिखटाशिवाय उपयोगांत आणायची चाल फार प्राचीन काळापासून आपलेकडे होती. तशाच बऱ्याचशा शेंगाही आपण कच्च्याच खातों. उदा०--भुईमुग, बाटाणा, ओला हरभरा; तसेंच मुळा, काकडी, लिंबू इत्यादि पदार्थ औषधी म्हणून कसे उपयोगांत आणायचे ही पूर्वापार माहिती अजूनही आम्हांला असून तिचा उपयोग आम्ही व्यवहारांत करतों. म्हणून मुली-बाळींना देखील त्याची माहिती असते. सुंठीची कढी, आल्याचं लोणचं, लिंबाचा

क्षार, काकडीची मुखशुद्धि, तसेंच यांच्या पानांचीं औषधं अद्यापही पुष्कळांना ठाऊक आहेत. आम्ही आमच्या जेवणांत पुष्कळशीं फळें-मुळें कच्चींच कोशिंबिरीकरतां म्हणून वापरतों त्याचा अर्थही हीं व्हिटॅमिन्स पोटांत जावींत हाच असतो. उपासाला जुनीं माणसें शिजलेले पदार्थ अगर तिखटमीठ खात नाहींत. तीं माणसें काकडी, केळीं, खारीक, खजूर, शेंगा, लिंबाचें सरबत असेंच कांहीं घेतात. म्हणजे शरीरपोषक द्रव्यें निरनिराळ्या वेळीं खाली जावींत नि जिभेलाही संयमनाची संवय लागावी म्हणूनच ही योजना आमच्या पूर्वज़ांनीं धर्म व रूढि यांत आणून ठेवली आहे. पण कांहीं वेळा तिला आम्ही आमच्या शहाणपणानें विकृत स्वरूप देऊन पूर्वजांबद्दल अनुदार उद्गार काढीत असतों. या आमच्या अतुल (?) निष्ठेबद्दल पूर्वजांचे स्वर्गस्थ आत्मे काय म्हणत असतील ते असो! सारांश-- आमची जेवणाची प्रथा इतकी सुंदर आहे कीं, ती लक्ष देऊन टिकवली तर दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची आम्हांला जरूर भासणार नाहीं. जसा अन्नाच्या बाबतींत व्हिटॅमिन्सचा विचार केलेला आहे तसाच आजारी, रोगी बालकें यांचाही विचार अतिशय सुंदर तऱ्हेनं केलेला आहे. परदेशी वस्तु जरूर पडेल तेव्हांही घेऊं नये, असं माझं मुळींच म्हणणं नाहीं; पण ज्या गोष्टींची सगळी सोय आपल्या अन्नांत केलेली आहे त्यांच्याच तोडीच्या दुसऱ्या वस्तु, मोठ्या चांगल्या लागतात म्हणून नव्हे, तर आधुनिक लोक म्हणतात म्हणून, परदेशच्या घ्यायच्या याला काय म्हणावं? निरनिराळीं अन्नं, पेयं, आम्ही चांगलीं म्हणून इतरांचीं घेतों; मुलावर प्रयोग करण्याकरतां साधं देशी धान्य आम्हांला सांपडत नाहीं, तर आमच्या डॉक्टर लोकांना परदेशीच धान्य लागतात, हा आमचा--औषधांच्या नांवावर द्रव्याचा ऱ्हास होत आहे; व तो आम्ही स्त्रियांनींच स्वयंपाक-

गृहें आमच्या ताब्यांत घेऊन थांबविला पाहिजे. आम्हांला सरकारी प्रयोगशाळांत जरी **केमिस्ट** म्हणून मिरवतां आलं नाहीं, तरी आमच्या स्वयंपाकशाळांत उत्तम केमिस्ट बनून आमचे प्रयोग किती यशस्वी आहेत हें या लोकांना सिद्ध करून दाखविलं पाहिजे. आज आमच्या पिढीला जें थोडं अपयश येत आहे तें आम्हांला विरोध करण्यांत सुशिक्षित मुली-मुलांबरोबर नव्या विचारांचे एकतर्फी वाचन व नव्या आचारांची एकतर्फी दृष्टि घेऊन मुलांत मिसळल्यामुळं, आम्हांला आमचे प्रयोग यशस्वी करून दाखवितां येत नाहींत. पण जर नव्या मुली आम्हांला येऊन मिळतील व विचारपूर्वक आम्ही काय म्हणतों तें ऐकून समजून येतील, तर त्यांचा व्यक्तिगत व देशाचाही फायदाच होईल.

आजकाल देशभक्ति, उद्धार, उन्नति, सायन्स, भौतिक शास्त्र, हे शब्द इतके सवंग सुकाळ झाले आहेत कीं— पावसाळी, तीन दिवस टिकणारीं तेरड्याचीं फुलं डोळ्यांना तरी आनंद देतात; पण हे शब्द कानांनीं ऐकायलाच नको वाटतात; कारण आम्ही ते अर्थहीन म्हणूनच उच्चारतों. तोंडानं देशभक्तीच्या लंब्या लंब्या गप्पा मारतों पण हातानं परदेशांत पैसा सारखा लोटीत असतो. आमच्याजवळ आहे, त्याचा आम्ही उपयोगच करून पाहत नाहीं, याला काय म्हणावं ? आजकाल मेलिन्स फुड, दुधाची साखर, हॉर्लिक्स मिल्क, ग्लॅक्सो, ओव्हलटाइन, बार्ली वॉटर, क्वेकर ओट्स, या वस्तु आम्ही जितक्या आदरानं आणि आंधळेपणानं वापरतों, तितक्याच आदरानं पण डोळे उघडून, मुली जर आपल्यापुढच्या वस्तु वापरतील तर आर्थिक दृष्टया आपला किती तरी फायदा होईल. कारण त्या योगें परदेशी जाणाऱ्या आपल्या पैशाचा ओघही थांबेल. म्हणूनच सुशिक्षित मुलींनीं स्वतःच्या रसशाळेंत आपल्या या खऱ्या देशी वस्तूंचे उपयोग

करून, त्यांचे गुणधर्म तपासून पाहावे. यापुढं हें अंधानुकरण सोडून देऊन आपल्या ज्ञानाचा नि शिक्षणाचा फायदा आपल्या मातृभूमीला द्यावा; आपण जें अन्न खातों व ज्या वस्तु वापरतों तें अन्न नि त्या वस्तु वापरतांना आपण आपल्या मनाशीं आधीं पडताळा पाहायला शिकलं पाहिजे कीं, या गोष्टींनीं आपला खरोखरच फायदा किती होईल ?

**सरल**—म्हणजे या श्लोकाचा अर्थ असाच ना, कीं आपण जें जेवतों तें, केवळ जेवायला पाहिजे म्हणून जेवीत नसून, शतायुषी, दीर्घायुषी, आयुरारोग्यसंपन्न, असे होऊन जगायला पाहिजे म्हणून जेवतों.

**मावशी**—शाबास ! बरोबर ओळखलंस ! जीं आपणांवर अनेक ऋणं आहेत तीं आपण शतायुषी होऊन फेडायचीं आहेत, व शतायुषी होण्यासाठीं आपल्याला निरोगी राहून जगायचं आहे नि तें तसं जगायचं म्हणून शास्त्रोक्त रीत्या धर्मकर्म समजून घेऊन, योग्य आहार-विहारांनीं, योग्य शरीरसंवर्धन करायचं हा गूढार्थ या श्लोकांत सांठवलेला आहे.

**सरल**—मावशी, आतां मला बरोबर कळलं. अशा तऱ्हेनं अर्थ कळला म्हणजे किती आनंद होतो.

**शरद्**—ताई, तुझ्या अर्थ समजून घेण्यांत माझं जेवण राह्यलं हं !

**सरल**—महाराज, राह्यलं नाहीं बरं का ! ती बघ उन्हून पोळी आली. मी आपली जातेंच कशी म्हणजे माझी कटकट नको तुला !

इतक्यांत भाऊसाहेब येऊन म्हणाले कीं, "सरल, तूं भलत्या वेळीं येऊन, कांहीं तरी विचारून, आमचा सगळ्यांचा खोळंबा करतेस, त्यापेक्षां दुपारची हिच्याजवळ बसून एक पुराणच लिहून टाक ना एकदां ? म्हणजे ही रोजची कटकट नको !"

सरल—हो, हो ! लिहिणारच आहे नाहीं तरी एक मावशींच्या माहितीचा ग्रंथ ! तुम्ही टिंगल करा भाऊसाहेब हवी तर, पण भाऊ-साहेब, खरं म्हणाल तर अशी माहिती आम्हां मुलींना हल्लीं मुळींच नसते, त्याला फार उपयोग होईल ! मावशी, मी जातें; माझं काम मी तुम्हांला दुपारीं सांगेन. हो ! नाहीं तर पुन्हा टिंगल व्हायची ! खरंच, जातेंच मी आतां.

# प्रकरण १५ वें

वाट्या, ताट, तपेल्या, पातेली, चंबु, आणखी चिरण्या।
घेऊन येई दारीं विकण्या कासार बारक्या बरण्या ॥

हल्लीं महाराष्ट्रांत पोटाचा प्रश्न फार महत्त्वाचा झाला आहे. त्यामुळें प्रत्येक माणसाला, विशेषतः पांढरपेशावर्गाला, कांहीं तरी नवा धंदा शोधावा लागत आहे. त्याचप्रमाणें एका माणसानें 'नवा संसार' नांव देऊन सगळ्या प्रकारचीं भांडीं एका लहानशा मोटार लॉरींत भरून घरोघर हिंडून दाखविण्याची एक नवीन टूम काढली होती. सगळ्या जातींचीं, नवीन नवीन घाटांचीं, निरनिराळीं, जेवढीं नवीं तेवढीं सर्व भांडीं त्यानें बरोबर आणलीं होती व तो गृहस्थ भाऊसाहेबांच्या ओळखीचा असल्यामुळें, त्यानीं— मावशींना त्यांतलीं कांहीं थोडीं तरी भांडीं घ्या— त्याला मदत म्हणून, असें म्हटलें व म्हणूनच मावशींनीं त्यांतलीं कांहीं भांडीं वेगळीं काढलीं. इतक्यांत सरल आली. कारण मावशींनीं मुद्दाम तिला बोलावलें होतें; कारण—लहानमुलींना नवीन नवीन घाटांच्या भांड्यांची जात्याच मोठी आवड असते. सरलही आल्याबरोबरच म्हणाली, "खरंच किती सुंदर आहेत हीं भांडीं ! ही तुम्ही का घेणार आहांत ! पण मावशी, या पातेल्यांना आतां छानदार कल्हई लावा बरं का ! नेहमींसारखीं नुसतीच नका ठेवूं. आणि यांत छानदार पितळी पळ्या असल्यावर तुम्ही लोखंडी कशाला घेतां ?

**मावशी**—अहा ग वेडे ! हें सुद्धां कां तुला कळत नाहीं ? अग, स्वयंपाकांत जी निरनिराळ्या पदार्थांना निरनिराळ्या धातूंची भांडीं वापरायची पद्धत पडली आहे त्यांत तत्त्व आहे ! लोखंडी पळ्या

फोडण्यांना वापरतात नि कढी-आमटींत ती वर येऊं नये म्हणून टाकून ठेवतात; तसेंच ती कढण्यास चुलीवर टाकलेल्या लोण्यांतही टाकून ठेवतात; लोण्यांत मात्र कोणी पितळीही टाकतात. पण लोखंडी भांड्यांत अन्न शिजवण्यांत आपल्या पोटांत अल्पप्रमाणांत लोह जावा हा एक हेतु आहे. जुन्या बायका बाळंतिणीच्या प्यायच्या पाण्यांत एखादा खिळा तापवून टाकीत असत; श्रीमंतांच्या घरांत बाळंतिणीचं पाणी मोजून तापवीत नि त्यांत सोन्याची अंगठी नाहीं तर सल्ला घालीत. याचा अर्थ काय ? सोनं, लोखंड, हे धातु टॉनिक म्हणून अशा तऱ्हेनं घालायची पूर्वीं पद्धत होती पहा. पण जुनं खूळ ठरल्यामुळं हें सारं नाहींसं झालं. आतां वाटेल तेवढं बाळंतिणीचं पाणी उकळून ठेवावं नि वाटेल तेवढं नासावं. पूर्वीं त्याला मोजमाप असल्यामुळं तें बेतानं करायचं. बेतानं सारायचं. दोन्ही वेळां ताजं करायचं. हीं कामं बाळंतीण घरांत असली म्हणजे त्या घरांतल्या बाईला असत. पण आतां गरज पडली कीं, आयतीं टॉनिकं द्यायची प्रथा पडली आहे, असो. तेव्हां अशा रीतीनंच या लोखंडी भांड्यांचा उपयोग संसारांत करायचा असतो. तसंच कल्हई. आम्ही भाज्या करायच्या भांड्यांना कल्हया लावीत नाहीं यांत देखील शास्त्र आहे. कल्हईच्या भांड्यांत तेल घालून तापवूं नये; तें विषारी होतं; म्हणून त्या भाज्या निकल्हईच्या भांड्यांत करायच्या नि केल्यावर काढून घ्यायच्या. ताकांतल्या भाज्या देखील निकल्हईच्या भांड्यांतनं करी-तोंवर कळकत नाहींत. कारण रोज वहिवाटलेल्या भांड्यांतून पदार्थ कळकत नाहींत; मात्र तीं भांडीं चांगलीं नि स्वच्छ घासलीं गेलीं पाहिजेत. पाणी पिण्याचीं भांडीं तांब्याचीं वापरण्याला देखील हींच कारणं आहेत. आतां झक्क दिसतात म्हणून आपण पितळीं भांडीं वापरतों. तरी पुन्हा वैद्य लोक सांगतात म्हणून कांहीं ठिकाणीं

तांब्याचीं भांडीं चमकूं लागलीं आहेत. यवढं खरं कीं, तीं अंतरबाह्य स्वच्छ ठेवायची काळजी आपण घेतली पाहिजे.

**सरल**—खरंच, परवांच आमच्या वडलांनीं आपल्याला पाणी प्यायला म्हणून तांब्याची लोटी आणली आहे; व त्यांत रात्रीं पाणी भरून ठेवून तें ते उजाडत पितात, त्याचंही असंच कांहीं कारण असेल. बरं झालं. या निमित्तानं तरी मला भांड्यांबद्दल माहिती मिळाली. पण का हो मावशी, या ॲल्युमिनियमच्या भांड्यांबद्दल काय ?

**मावशी**—अग एका वेळीं या भांड्यांचा इतका सुकाळ झाला होता, कीं घरोघर सर्व कामांला हींच भांडीं वापरलीं जात; त्यास कांहीं धरबंधच उरला नव्हता. आणि त्या मानानं तीं मुळींच स्वच्छ घांसलीं जात नसत. कित्येक ठिकाणीं तर असं दिसे, कीं एक पातेलं आपलं उकळतच असायचं. ही प्रथा किती वाईट होती. ती धातु रोगी असेल वा नसेल; पण कळकत नाहीं म्हणून सगळीकडेच त्याचा सर्रास उपयोग केला जाई नि तीं भांडीं जुनीं झालीं म्हणजे दिसायलाही घाणेरडीं दिसत. पण समजून त्यांचा उपयोग केला तर थोडी वापरायला हरकत नसावी असं मला वाटतं. उदा० धार काढायला. दूध काढणाराला पेलायला तें सोयीचं; पुन्हा कल्हईचा प्रश्न नसल्यानं थोडा जास्त वेळ दूध राहिलं त्यांत तरी कळकायचं नाहीं; नि हिरवे डागही पडायचे नाहींत. तसंच ताक केल्यावर, तें ओतून ठेवायला; श्रीखंड गाळण्यापुरतं; प्रवासांत जरूरीपुरतं न्यायला, अशीं शहाणपणानं तीं वापरावींत. होईल तोंवर चुली शेगड्यांशीं त्यांचा संबंध कमी आणावा. पूर्वीं ज्याप्रमाणं आपण संभाळीत होतों तशीं तितक्याच पुरतीं संभाळलीं तर मोठ्या कुटुंबांत यांचा थोडासा उपयोग होईल. कांचेच्या बरण्या वगैरे बेतानं वापरल्या

तर थोड्याशा परवडतात. त्या मानानं चिनीच्या अधिक परवडतात. पण नोकरांच्या धबडग्यांत तांब्यापितळेचीं भांडींच फायदेशीर वाटतात.

सरल--खरंच, हें तुमचं म्हणणं मला पटतं. कारण आई दिखील म्हणे, कीं कांचेच्या सट-बरण्यांतून दुभतं करायचं तर तें आपण केलं पाहिजे, कारण तांब्यापितळेची भांड्यांसारखीं तीं घाण दिसत नाहींत, त्यामुळं नोकर तीं एकदांच धुऊन ठेवतात. मग विरजणाला वास कां येतो असं आपण म्हणतों. पण जरी तीं घाण दिसत नसलीं तरी तीन-चारदां पाण्यानं स्वच्छ धुवायला हवीं. तरच त्यातलं दुभतं उपयोगी. ज्याला हें स्वतां शक्य नसेल त्यांनीं तांब्या-पितळेचीं भांडीं वापरावीं हेंच बरं !

मावशी—होय अगदीं खरं आहे. पुष्कळशा गोष्टींचं असंच आहे. त्या दिसायला एकदम जितक्या सुखाच्या वाटतात तितक्या नसतात. गंमत म्हटली कीं, कष्ट आहेत. कष्टाशिवाय गंमत पचनीं पडत नाहीं. बरं तर, मग आतां तूं कोणतीं भांडीं पसंत करतेस !

सरल—वा ! इतक्या चर्चेनंतर कोणतीं भांडीं पसंत करायचीं हा प्रश्नच का ! तुम्ही केलींत तशींच मी करणार ?

भाऊसाहेब येऊन म्हणाले, "हें तत्त्व मला पण मान्य आहे. मावशीच्या पावलावर पाऊल टाकणं कांहीं वाईट नाहीं. मात्र त्यामुळं या घराच्याबाहेर जन्मांत प्रसिद्धि मिळायची नाहीं."

सरल--हें हो काय भाऊसाहेब ! तुम्ही नेहमीं आमची टिंगलच करतां! पण मी मावशीच्या पावलावर पाऊल टाकूनच प्रसिद्ध व्यक्ति होईन.

# प्रकरण १६ वें

आज मावशीकडे कांहीं पुरुषमंडळी जेवायला होती. अर्थात् सरल वाढायला नि जेवायला होतीच. मागून दोघीजणी जेवायला बसल्यावर सहजच झालेल्या जेवणाबद्दल गोष्टी निघाल्या, तेव्हां सरल म्हणाली, "मावशी या साऱ्या थाटाला, बेताला नि स्वयंपाकाला मंडळी खूष झालेली दिसली बरं का ! कारण आज उष्टयांत दिखील म्हणण्याजोगं खरकटं निघालं नाहीं. नाहीं तर परवां त्या आगाशांकडे काय अन्न वायां गेलं !"

**मावशी**—याचं कारण नुसता उत्तम स्वयंपाक नव्हे ! पण वाढणं सुद्धां व्यवस्थित लागतं. आपल्याकडील वाढायची कला आतां नामशेष होत चालली आहे. पूर्वीं आधीं पुष्कळसं बायकांनींच वाढायची चाल होती. लहान मुलींना वाढायची कोण हौस असे. चांगला कपडालत्ता, एखाद-दुसरा दागिना घालून मुली ईर्षेनं वाढीत. आणि अशा झाल्या-गेल्या वेळीं व लग्नकार्यांत मुलींना, कसं वाढायचं याचं शिक्षण मिळे. कारण लहान मुलगी वाढायला पुढें नि मोठी बाई मागं असे. तिनं कुठचा जिन्नस कुठं वाढायचा हें शिकवायचं. आतां दिवसेंदिवस वाढप्यांनीं वाढायची चाल वाढत चालली आहे. त्यामुळं बायकांतील हें वळण कमी झालं नि ज्या थोडया वाढायला घेतात त्यांना तें मुळींच येत नाहीं.

**सरल**—मावशी, वाढण्यांत कसली हो कला ?

**मावशी**—अग, आपण इतके श्रम करून जे पदार्थ करतों ते सुंदर वाढले तर सुंदर नाहीं का दिसणार !

**सरल**—पण त्याचं शास्त्र का येवढं ठरलेलं ? मी तर म्हणतें

सारेच पदार्थ ‘ नैवेद्याला, नैवेद्याला ’ म्हणून जे एकदमच वाढून ठेवायचे ते मधून नेले तर काय बिघडलं ?

**मावशी**—अग, ज्या वेळीं पुष्कळ पदार्थ करतात त्या वेळीं चांगलीं मोठीं प्रशस्त पानं मांडतात. आपल्याकडे येणाऱ्या सर्वांनाच संतुष्ट करायच्या हेतूनं बरेच पदार्थ करतात. म्हणजे कोणाच्या आवडीचं कांहीं तरी निघतंच. शिवाय सारे जिन्नस नैवेद्यावर वाढले म्हणजे ३।४ काय जिन्नस केले आहेत तें कळतं. उदाहरणार्थ-मसाले-भाताची किंवा साखरभाताची मूद नैवेद्यावर वाढलेली असली म्हणजे आपला पांढरा भात किती घ्यायचा हें जेवणाराला कळतं. जसं इंग्लिश डिनरमध्यें ‘मेनू कार्ड’ असतं तसंच तें. पण जर चांगल्या तऱ्हेनं वाढतां आलं तर घाण दिसत नाहीं. मीठ, लिंबू, चटणी, लोणचं यांची एक ओळ लावून पुढं दुसरी ओल्या कोशिंबिरींची ओळ लावायची. उजवीकडे नीटशा भाज्या वाढायच्या, पक्वान्नं डाव्या हाताला वाढायचीं. भाताच्या मुदा लहान लहान घालाव्या. पहिलं तूप थेंब थेंब घालायचं. असं नीट वाढलं तर वाढलेलं पान देखील सुंदर दिसतं. नाहीं तर चटण्या-कोशिंबिरींचे ओघळ एकमेकांत जात आहेत, वांग्याच्या भाजीचा रस आळवाच्या भाजींत. काळी-कुट्ट गव्हल्याची खीर, रंग बदललेलं वरण असा थाट असला व जेवणारं लहान-मोठं न पाहतां भसाभस भात लोटला तर अन्न नास होतं. भाज्यासुद्धां तशाच भसाभस वाढतात; हवी त्याला नाहीं व नको त्याला दुप्पट; मुलांबाळांना तर विचारूंच नका! मग भसाभस अन्न नास झालं तर त्यांत चूक कुठं! वाढणाऱ्यांनीं हें लक्षांत ठेवलं पाहिजे कीं, वस्तु तर सगळ्यांना भरपूर मिळाली पाहिजे पण ती खाणाराचा मगदूर पाहून वाढली गेली पाहिजे. जेवणांत भाज्या बऱ्याच असतात तेव्हां प्रत्येक भाजी बेतानं वाढली

पाहिजे. तशाच चटण्याकोशिंबिरी. त्यांतल्या त्यांत पुरुषांची पंगत कांहीं तरी बरी; बायकांच्या पंक्तींत तर थाट विचारूं नका. भात गारगोट्या व त्यावर निवालेलं वरण नि तितकीच गार आमटी ! दिवस असावे थंडीचे नि त्यांत एखादी बाई म्हणालीच तर म्हणायचं, "त्या काय आपल्या घरीं ऊन जेवीत असतील ! बायकांना संवयच असते गार अन्नाची–!" पण असं कोणी म्हणालं म्हणजे मला हसायला येतं.

**सरल**—खरंच आहे ! बायका आपल्या घरीं काय जेवतात तें घालायकरतां का आपण त्यांना आपल्या घरीं बोलावतों ? पुरुष देखील आपल्या घरीं रोज इतके ताजे पदार्थ खातात काय ? पण आपण जीं माणसं प्रेमानं, आदरानं, बोलावतों त्यांना सगळ्यांत चांगलं, सुरेख, सुंदर असं अन्न नको का घालायला !

**मावशी**— तत्त्व कबूल, पण या बाबतींत कांहीं कांहीं व्यक्ति इतक्या गमतीच्या असतात कीं, बोलून सोय नाहीं ! मी एका लग्नांत विहिणीबरोबर जेवायला गेलें होतें: आम्ही अवघ्या ५।७ जणीच होतों; पुरुषांच्या पंक्तीला वाढून ठेवलेल्या पत्रावळी आमच्यापुढं ठेवण्यांत आल्या नि मग भात झाल्यावर मसालेभात आणण्याकरतां एका बाईनं आचाऱ्याला सुचविलं. तेव्हां एक आजीबाई ओरडल्या, "अग, आधीं पाहिली वाढलेली जिलबी, लाडू खाऊं देत; मग भात न्या." तेव्हां राग येण्याऐवजीं मला हसूंच आलं नि मग मागनं मला कळलं, कीं मागून त्या बायका माझ्यासंबंधानं बऱ्याच कुरकुरल्या म्हणून. अशी ही जेवायला घालायची मनोवृत्ति नि काटकसरीच्या वेड्या कल्पना आपल्यांत आहेत. तसंच हवं तितकं वाढून नास करायचं ही एक खोट्या श्रीमंतीची कल्पना पण आहे. चटण्या-कोशिंबिरी कालविलेलीं तीं भांडीं, श्रमानं केलेल्या खिरींच्या प्रकारांची खिरीच्या रूपानं पुढं लागलेली ती वासलात, वरणाच्या भांड्याला हिरवेचार

असे बाहेरनं पडलेले ओघळ, चुलीपासून चार हातांवर ठेवलेलं तें भाताचं तपेलं, एका कोपऱ्यांत ठेवलेलं तें आमटीचं पातेलं, हा सगळा बेत पाहिला म्हणजे जेवावंसं सुद्धां वाटत नाहीं. भाताचीं भांडीं लहान लहान केलीं, भात उकरल्यावर भांडं पुन्हा उबेवर ठेवलं, असं कधीं व्हायचंच नाहीं. खंडीभर खिरी करण्यापेक्षां सुरेखसं दूध आटवून एकच खीर केली तर-पण हें पटायचंच नाहीं. अशा अनेक गोष्टींच्या सुधारणा आपल्यांत व्हायला हव्या आहेत, नि तें करायचं काम तुम्हां मुलींकडे आहे.

**सरल**—मावशी प्रत्येक गोष्टीचा शेवट तुम्ही आम्हां मुलींवरच ढकलतां हो !

**मावशी**—खोटं का, सांग ? पूर्वी नटून-थटून वाढायला जायची चाल होती. मध्यंतरीं मळतील म्हणून काळींबेरीं पांतळं आलीं. आतां पुन्हा सोवळं-ओवळं कमी झाल्यानं मुली नवे ब्लाउझ, नवीं लुगडीं नेसून वाढतांना दिसतात. पण यांत आतां तुझ्यासारख्या विचारी मुलीनं सुधारणा केली पाहिजे. वाढणं सोवळ्यानंच ठेवलं पाहिजे, म्हणजे साऱ्या जगांत फिरलेलीं कोरीं लुगडीं अन्नापर्यंत जायचीं नाहींत. वाटेल त्या टांग्या मोटारींतनं आलेली बाई एकदम अन्नाला स्पर्श करणार नाहीं. एकादी परिचित बाई आलीच तर ती सोवळं म्हणून रेशमी वस्त्र तरी नेसून येईल. त्याचप्रमाणं बाहेरच्या समाजांत वावरतांना आपण जे ओचेपदर ठेवतों त्यापेक्षां वाढतांना जरा निराळा पेशा पत्करला पाहिजे.

**सरल**—कबूल, मावशी, हें कबूल मला जेव्हां जेव्हां असं कांहीं करायचा प्रसंग येईल, तेव्हां तेव्हां तुमचा हा पेशा मी जरूर पत्करीन.

---

# प्रकरण १७ वें

एक दिवस दुपारच्या मावशी सरलकडे गेल्या. तों तेथें कांहीं कागदपत्र पडले होते. सरल लिहीत होती.

**मावशी**—कां कांहीं पत्र वगैरे आहे वाटतं ! पण दिसतंय् मोठं ! कां कांहीं लिखाण लिहितें आहेस !

**सरल**—पत्र येवढं मोठं का असतं मावशी ? लिखाणच आहे हें. "कादंबरी कीं लघुकथा ?" असें म्हणून मावशींनीं ते कागद हातीं घेतले.

**मावशी**—हें ग काय ? वेडी कुठली !

**सरल**—नाहीं. मावशी मी वेडी नाहीं. तुमच्यामाझ्यांत घडलेले हे संवाद मला फार उपयोगी पडतील नि तें सारं तसं आईला दाखवायला मिळावं म्हणून मी आठवून आठवून लिहून काढलं आहे. त्यांत आतां फक्त तुम्ही मला अन्नाबद्दल तेवढं सांगा.

**मावशी**—सरल, तूं अगदीं वेडी ! तुझीं माझीं झालेलीं संभाषणं लिहून काढण्याजोगीं का झालीं आहेत ! अन्नाची माहिती मी अधिक ती काय सांगणार ! नि पदार्थांबद्दल म्हणशील तर हल्लीं किती तरी पाकशास्त्रं तयार झालीं आहेत. शिवाय मासिकांतूनही हल्लीं माहिती येत असते.

**सरल**—पदार्थ करायला नका सांगूं; पण धान्यांची माहिती तर सांगाल मला ! असं काय हो मावशी ! तेवढी थोडी सांगा ना म्हणजे ग्रंथ पूर्ण झाल्यासारखं होईल.

**मावशी**—बरं तूं म्हणतेस तर सांगते. मला कांहीं त्याची विशेषशी माहिती नाहीं. पण आपण प्रथम तांदूळ घेऊं या. खरंच,

म्हटलं आहे कीं, "सर्वारंभास्तण्डुलाःप्रस्थमूलाः" खरोखर पाहिलं तर ऊन भात, वरण, नि साजूक तूप नि लिंबू हें आपल्या जेवणांतलं केवळ अमृत आहे. पण हल्लीं याचं माहात्म्य कमी होत चाललं आहे नि भाकरी-पोळीवर भर दिला जातो आणि त्याचे समर्थनार्थ अनेक कारणं दाखविलीं जातात. तांदुळांत सत्त्व कमी, त्यानं मनुष्य फोफसं बनतं, काटकपणा नाहींसा होतो, वगैरे गोष्टी सांगितल्या जातात; पण वास्तविक पाहिलं तर कोंकणपट्टी आणि तैलंगण या प्रांतांत तांदूळ हेंच खाद्य आहे; पण तिकडचे मजूर, गडी, किती कष्टाळू असतात हें प्रसिद्धच आहे; खालचा वर्ग सोडून वरचा वर्ग घेतला तरी सुद्धां तिकडच्या लोकांनीं कशा तरवारी गाजवल्या हेंही जगप्रसिद्ध आहे. लठ्ठपणाचा प्रश्न घेतला तरी देशावरल्यापेक्षां कोंकणच्या बायका कांहीं जास्त लठ्ठ नसतात. तेव्हां वास्तविक, खरं म्हणजे असं आहे, कीं जन्मापासून ज्या आहारविहाराची संवय माणसाला करावी तोच आहार-विहार त्याला मोठेपणीं मानवतो. हल्लीं आम्ही मुलांच्या खाण्या-पिण्याला नवींनवीं थेरं लावतों. देशभक्तीच्या गप्पा मारणारे आईबाप मुलांना बाजारी दुधं पाजणं, किंवा परदेशी धान्यांचे कांहीं तरी करून घालणं यांत सर्वस्वच मानतात. ज्या काळजीनं नि पद्धतीनं तुम्ही विलायती दुधं किंवा धान्यांचे पदार्थ करून घालतां, त्याचं पद्धतीनं व तितक्याच काळजीनं तुम्ही आपले पदार्थ मुलांना घालून त्यांचा कधीं अनुभव घेण्याचा प्रयत्न केला आहे काय? कोंकणांत तांदूळ, देशावर भाकरी, हीं मुलांना अतिशय मानवतात. पण तीं देण्याचा प्रयत्न आम्ही करतों कुठं? अनुकरणानं दिवसानुदिवस मुलंही ऐकत नाहींत. एक काळ असा होता कीं, आईवडील सांगतील त्याबाहेर मुलं जात नव्हतीं; पण नव्या शिक्षणानं मुलावर स्वातंत्र्या-च्या नांवाखालीं इतका चमत्कारिक परिणाम केला गेला आहे कीं,

स्वतःला कळो वा न कळो, प्रत्येक गोष्टींत मुलानं स्वतःच शहाण-पणा खर्ची घालीत असायचंच. त्याविरुद्ध कांहीं तक्रार केली तर शहाणीं म्हणविणारीं माणसं अजूनही वाद घालतात. असो. मुद्दयाची गोष्ट अशी कीं, तांदूळ हे आपल्या जीवनास लागणारं एक सुंदर अन्न आहे. या तांदुळाचे अनेक सुंदर पदार्थ करतां येतात.

**सरल**——असे कोणते पदार्थ ? नुसती यादी तर सांगा; नि त्यांतच आजाऱ्याला काय घालतां येईल तेंही सांगा.

**मावशी**——अग, साधारण कोणत्याही स्थितींत आपण ताकभात, तूपभात याला महत्त्व देतोंच. लहान मुलांना सकाळीं उठून सुंदरसा पातळ भात करून घातला तर तें खरोखरीच या लोकीचं अमृत आहे. पातळ भात शिजतांनाच तूप-मीठ घालून मग तो खाणं मुलांना खरो-खरीच मानवतं. अशा या सुंदर भाताची आमच्या धार्मिक ग्रंथांतून स्तुति केलेली आहे; पण तुम्हां मुलींना तें पटायचं नाहीं. एकदां मुलांना सकाळीं घासघास भात घातला म्हणजे उन्हाळ्या दिवसांत तीं दिवसभर खेळलीं बागडलीं तरी त्यांना तें बाधत नाहीं. दुसरं कोणतंही असं सुंदर खाद्य नाहीं. त्यामुळं मुलांना तें प्रकृतिदृष्टचा मानवेल. तसंच आजाऱ्याला देखील मऊ भात-किंवा भाताची पेज देण्याची चाल आहे. बाळंतिणीला सकाळीं उठतांच तूपभात, मिरपूड, लिंबाचं लोणचं असंच देतात; म्हणजे तिला शांत वाटतं नि दिवस-भर पाणीपाणी होत नाहीं. शिवाय जेवणाखाणांतही आपल्या महा-राष्ट्रीयांत तांदूळाला प्रमुखस्थान आहे. मेजवान्यांत मसालेभात, केशरी-भात; इतर सणीं पक्वान्नांत त्यांचा उपयोग करतात. मोदक तांदुळाचे करतात; कोंकणांत खांडपोळ्या, धिरडीं, पानग्या हे पदार्थ तांदुळाचे करतात; भाजण्यांत मुख्यतः तांदूळ लागतो; पापड्या, सांडगे हे पदार्थ तांदळाचेच करतात. दक्षिणेंत होणारे पदार्थ-उपिट, हप्पे वगैरे

निरनिराळे पदार्थ तांदुळाचेच करतात; आंबरसाची, गऱ्याची किंवा साधीं सांदणं तांदुळाचींच करतात; आपल्या संक्रांतीच्या खिचडीला देखील तांदुळच लागतो; कोंकणचे लोक तांदुळाच्याच दशम्या खातात. तांदूळ हा पचनाला हलका व ज़ेवायला पोटभर असा पदार्थ आहे. कांहीं विशिष्ट रोगांत डॉक्टरवैद्यांनीं मनाईच केलेली असली तर ती सोडल्यास, सर्व स्थितींतील आजाऱ्याला भात देतात. तांदुळाचे जसे अनेक पदार्थ होतात, तसा साऱ्या जगाला चटका लावणारा तांदुळाचा मुख्य पदार्थ म्हणजे पोहे. कारण चिवडा आवडत नाहीं असा माणूस नाहीं; हा चिवडा पोह्यांपासून होतो व हे पोहे तांदुळापासून होतात. कोंकणांत पोह्यांवर पुष्कळसं भागतं, हें जरी खरं असलं तरी कोंकणाइतकेच देशावरही पोहे लागतात. कारण आतां पोह्यांचे पापड सर्वांना आवडूं लागले आहेत; चिवडा हॉटेलांत-ही ठेवला जातो व त्याचीं फिरतीं दुकानं तर गल्लोगल्लीं आहेत. जशीं प्रवासांत इंग्लिश लोकांचीं बिस्किटं म्हणजे तयार अन्न म्हटलं जातं; कुठंही जा, कितीही दिवस लागोत, डबा फोडला कीं तयार ! अशी त्यांची स्तुति आमची मंडळी करतात; पण विचार केल्यास लक्षांत येईल, कीं तें पोटभर अन्न नाहीं; पण उलटपक्षीं आमचे पोहे फडक्यांत राहतात नि प्रवासांत कोरड्या खोबऱ्याशीं खायला कामीं येतात, धुतले तर गुळाबरोबर खातां येतात, दूध-दहीं मिळाल्यास जेवणाखालोखालच तें एक आमचं प्रवासी जेवण आहे; पण या दृष्टीनं याच्याकडे बघायचा दृष्टिकोन हल्लीं बदलला आहे. बिस्किटांच्या डब्यांत डोळ्यांना दिपवणारं असं कांहीं वाटतं पण हें खाणं तितकच भिकारी वाटतं. वास्तविक पाहतां चालू काळांत इतक्या लांबचे प्रवासाचे प्रसंग थोडेच येतात; ज़े लहान प्रवास आपण करतों त्यांत देखील शक्य तितकं बाजारी न खाण्याची प्रवृत्ति ठेवली तर

ती जास्त हितावह होईल. उलटपक्षीं, असं झालं आहे कीं, नुसतं सकाळीं निघून संध्याकाळीं यायचं असलं तरी रात्रीचं खाणं एखाद्या हॉटेलांत आटपायचं ! वास्तविक पाहिलं तर संध्याकाळीं घरून निघतांना खाल्ल्यावर सकाळीं पोचेंपर्यंत कांहीं न खाण्याची संयमन शक्ति आणावी हें बरं ! तें नच जमल्यास, निदान तिथलं घाणेरडं खाणं घेऊन खाऊं नये. मोठ्या स्टेशनांवर पहा, खायच्या पदार्थांच्या गाड्या, चहाचीं दुकानं, मारे सजवून ठेवलेलीं असतात; जवळच प्लॅटफॉर्म झाडणारे झाडूवाले केर काढीत असतात; बादलींत बुचकळलेले पेले घेऊन "चहा—!" म्हणून ओरडतात, परत आलेला पेला पुन्हा त्याच बादलींत बुडवतात, उरल्या वेळांत विडी फुंकीत असतात. त्यांचे कपडे पाहिले तर किती तरी दिवसांत त्यांची पाण्याशीं गाठ पडली नाहीं असं दिसतं; हा सर्व थाट पाहून विचार येतो कीं, पोषाकांची स्वच्छता बाळगणाऱ्या मंडळींच्या मनांत ही स्वच्छता (?) कां येत नाहीं ? उलटपक्षीं डब्याच्या फराळापेक्षां दुकानी भाजीपुरीला ही मंडळी अधिक लालचावतात ! अस्तु. आपला विषय निराळाच होता. तांदूळ हें आपलं मुख्य अन्न आहे. त्याचे अनेक पदार्थ होतात, तें आजाऱ्यांचं अमृत आहे, मुलांना टॉनिक, समाजाचं जीवन नि सामान्यतः केव्हांही, कुठंही, थोड्या वेळांत व साधनांत त्याचा उपयोग करतां येतो नि प्रवासांत अडचण भागविण्याकरतां पोहे उपयोगी पडतात. तेव्हां या याबद्दलचे जे कांहीं लोकांचे आक्षेप आहेत त्यांकडे लक्ष देऊं नये. कांहीं वेळा तें निःसत्त्व वाटतं व पचनाला निरुपयोगी होतं पण तो त्याचा दोष नसून उपयोग करणाराचा दोष आहे. कारण भात हा लवकर नासणारा पदार्थ आहे; तसंच तीनचार तासांनंतर त्यांत विशेष सत्त्वांश राहात नाहीं; म्हणून फोडणीचा वगैरे भात क्वचित् खावा व आजाऱ्याला तर दर वेळीं

ताजा भात द्यावा. ताज्या भातांत तूपमीठ घातलं म्हणजे तें पचायला हल्कं व उत्तम शक्तिवर्धक अन्न आहे. पण लहान मुलांना कांहीं ठिकाणीं पेज देण्याऐवजीं तांदुळाची पिठी गरगटासारखी घट्ट शिजवून घालतात, अर्थात् तें पचायला जड पडतं. पण तोच जर पातळ भात करून पेज घातली किंवा आरारोटासारखं पाण्याला थोडी पिठी लावून साखर घालून, पातळ खीर केली तर पचनाच्या दृष्टीनं त्याचा सुंदर उपयोग होईल.

**सरल**——मावशी, तांदुळाचे किती तरी उपयोग तुम्हीं सांगितलेत. तांदूळ इतका उपयोगी असेल असं मला कध्धीं सुद्धां वाटलं नाहीं. किंवा त्याचे इतके पदार्थ होत असतील असंही वाटलं नाहीं ! लहानपणीं वाटे कीं, कोंकणांत नुसते तांदूळ खातात, तर त्यांनीं सणावारी काय खाल्लं असेल ?

**मावशी**—अग वेडे, तांदुळाचे इतके पदार्थ होतात कीं, रोज एक खायचा ठरवला तरी महिनाभर पुरतील !

**सरल**—तें कसें काय ?

**मावशी**—हं, तूंच यादी कर हं ! सर्वांना आवडणारा अनरसा, सांज्याचं काम भागवणारी खांडपोळी, तिखटामिठाच्या सांज्याचं काम भागवणारं उप्पिट, गणरायाचे मोदक, कडबोळीं, थालीपीठ, पानगी, घावन, धिरडीं, आयतं, घारगे, भाकरी, सांदणं, हीं सगळीं पक्वान्नं म्हणून झालीं; त्याशिवाय वेगळाले भात सोडूनच दिले. इतके पदार्थ खायला असल्यावर गव्हाची आठवण कशाला होईल ? अग, आतां आगगाडीनं सगळे पदार्थ सगळ्या ठिकाणीं सारख्या भावांत मिळतात. पूर्वीं जो पदार्थ देशांत पिके तोच त्या देशीं खायचा अशी रूढि होती. कारण वाहतुकीच्या सोयी फारशा नसल्यानं

परदेशी जिन्नस महाग मिळे. म्हणून तेच पदार्थ पण आपल्या प्रांतांतल्या पिकांत करायची चाल होती. अवसेचे दिवे आपल्याकडे तांदुळाचे, देशावर बाजरीचे !

**सरल**—हो ! खरंच; आतां माझ्या लक्षांत आलं. आतां मावशी पुन्हा आलांत किंवा मी घरीं आलें म्हणजे अशीच मला आणखी पदार्थांची माहिती सांगा हं !

**मावशी**—बरं हं भाचीबाई ! उशीर झाला. जातें.

# प्रकरण १८ वें

उन्हुन, उन्हुन, पोळी जेवितां फार गोडी ।
भलिग, भलिग, माये, वाढसी दोन चारी ॥

सरलला कुठला दम निघायला ? दुसरे दिवशीं दुपारीं मावशी आडव्या होतात न होतात तोंच सरलची स्वारी वही, पेन्सिल घेऊन हजर !

**मावशी**--कमाल असो तुझ्या घाईची !

**सरल**—मावशी, निजायचं असलं तर निजा. माझ्यावर रागावूं नका; मी आपली सहज आलें.

**मावशी** —( हंसून म्हणाल्या )—हो ! तें काय विचारावं ? पण आतां आल्याच आहांत तर लिहून टाका म्हणजे मनाला स्वस्थता वाटेल. काल आपलं तांदुळाबद्दल बोलणं झालं होतं नाहीं का ? आज तितक्याच महत्त्वाचें धान्य जें गहूं त्याचा आपण विचार करूं. कोंकणपट्टीला जसा तांदूळ तसाच देशावर गहूं. विशेषतः उत्तर हिंदुस्तान नि मध्यप्रांत यांतून गव्हाचं महत्त्व जास्त. पण देशावर सुद्धां बहुतेक लोक एक वेळ पोळी खातातच; कांहीं ठिकाणींच फक्त रात्रीं ज्वारीबाजरी खायची चाल आहे. शिवाय अनेक पक्कान्नांत गहूं प्रामुख्यानं असतो. ज्याचा हल्लीं गाजावाजा होतो तीं ब्रेड नि बिस्किटं गव्हापासूनच करतात; रोजच्या पोळ्या-पुऱ्या या गव्हाच्याच. बाळंतिणीला पथ्यकर व शक्तिवर्धक म्हणून गव्हाचा सांजाच देतात. गुजराथी लोकांत थुलं म्हणून बाळंतिणीला देण्याचा सांज्यासारखा जो एक प्रकार आहे तो पण गव्हाचाच करतात; अशा तऱ्हेनं रोजच्या खाण्याच्या जिनसांशिवाय अनेक पक्कान्नं गव्हाचीं करतात.

ल्हान मुलांना सुद्धां दांत यायला लागले म्हणजे भातानंतर चांगली भाजलेली पोळी, शंकरपाळा, हागोळी हे गव्हाचे पदार्थ करून देतात. पुष्कळ जुन्या बायकासुद्धां उपास सोडायच्या वेळेस भातांतच चार गव्हाची मुटकी घालतात. कारण पोळी-भाकरीची संवय असलेल्या माणसांना नुसता भात खाऊन समाधान होत नाहीं; पोळी ऐवजीं मुटकळ्यांची युक्ति करतात. त्याशिवाय आपली नेहमींची पुष्कळशीं पक्वान्नं गव्हाचींच होतात.

**सरल**——तरी पण मावशी, त्यांचीं नांवं सांगा ना——

**मावशी**——तीं सगळीं तुला माहीतच आहेत नि अडलं तर तुझ्या त्या पाकशास्त्रांत लिहिलीं आहेतच.

**सरल**——तसं नाहीं. पण अशीं पक्वान्नं किती होतात तें तर बघूं या. सांगा मला नांवं.

**मावशी** सरल, तूं अगदीं नादी नि खुळी आहेस !

**सरल**——असूं द्या आम्ही खुळ्या ! तुम्हीं आम्हांला नांवं सांगणार कीं नाहीं ?

**मावशी**——सांगतें बापडी ! माझं काय गेलं ! सांजा, पुऱ्या, शंकरपाळीं, जिलबी, लाडवांत दळ, व चुट्टाचुर्मा हें बघ, बाळंतिणीचा सांजा; तोच आपला सत्यनारायण, तुझे आवडीचें रव्याचें लाडू, साखरपाऱ्याच्या वड्या, नानकटाई, दिवाळी साजऱ्या करणाऱ्या करंज्या, चिरोटे, शेवया, गव्हले, नानातऱ्हेच्या खिरी, देशस्थांच्या आवडत्या सांजोऱ्या, सर्व प्रकारच्या पोळ्या, मांडे, तारफेण्या, मुंबईत गाजावाजा होणारा माहिमी हलवा, परोटे, बट्टचा. शिवाय गव्हाची उसळ करतात, खीर करतात, तिखटामिठाचा सांजा व त्यासारखे अनेक पदार्थ करतात. असे रोजच्या खाण्यांतले नि विशेष प्रसंगीं खाण्यांतले गव्हाचे अनेक पदार्थ आहेत. चांगली भाजलेली सुंदरशी पोळी खायला

तर चांगली लागतेच, शिवाय ती पौष्टिकहि आहे. दक्षिणेंत अशी समजूत आहे कीं, पुष्कळ तूप असल्याशिवाय गव्हाची पोळी पचत नाहीं. म्हणून तिकडे पोळी फारशी खात नाहींत. पण हा ग्रह चुकीचा आहे असं म्हणावं लागतं. कारण नागपूर प्रांताकडे सर्रास दोन्ही वेळा पोळ्या खायची चाल आहे, तिकडे गोरगरिबांकडे इतकं तूप कुठं ठेवलं आहे ! पण रोज ज्या धान्यांतून आपण वाढतों तेंच आपल्याला बरं वाटतं. तेव्हां निरोगी प्रकृतीच्या माणसाला वरण-भात प्रथम, नंतर पोळी, मधले वेळीं खायला गव्हाचाच कांहीं तरी पदार्थ असणं आवश्यक आहे, नि तो शक्तीलाही चांगला. त्याच-प्रमाणं ज्वारी नि बाजरी. खानदेशाकडच्या भागांत बाजरी खायचा प्रघात जास्त आहे. फक्त उन्हाळ्यांत बाजरी उष्ण पडेल म्हणून कांहीं घरीं ज्वारी. पण मिरज सातारा पुणें या प्रांतांत सर्रास शाळू खातात, नि तो थंड पडेल ही कल्पनाही त्यांना कधीं येत नाहीं. पचनाच्या दृष्टीनं गव्हापेक्षां भाकरी हलकी असते, म्हणून उतरत्या वयांत पुष्कळजण भाकरीच पसंत करतात. लहान मुलांना बाजरीचं अन्न केकर ओटूसइतकंच मानवतं असा तज्ज्ञ डॉक्टर्सचा अभिप्राय आहे. गरिबांकडे बांळंतिणींना बाजरीचाच घाटा देतात. खानदानी घराण्यांत लहान मुलांना ताजं दूध नि बाजरीची भाकरी सकाळीं द्यायचा प्रघात होता. आतां हा क्वचित् दिसतो कारण बदलत्या काळाप्रमाणं तें खायला मुलं कबूल होत नाहींत. तरी पण अजूनही आम्हांला ऊन ऊन ज्वारीची भाकरी नि तूप हें अमृत वाटतं.

**सरल**—खरंच मावशी, पिठलं नि भाकरी सुंदर लागते अं ! पण कधीं-मधीं खायला !

**मावशी**—हो, हो, तर !

**सरल**—मावशी, या धान्यांचा उपयोग पुष्कळ झाला खरा पण उडीद, मूग या धान्यांची काय हो येवढी गरज लागते ?

**मावशी**—खरं ग! तुला पापड मुळींच आवडत नाहींत, तेव्हां उडीद नाहीं पेरला तरी चालेल !

**सरल**—अगबाई, खरंच. मावशी, तें मी अगदींच विसरलें. उडीद हवाच; पण तो पापडापुरताच ना ?

**मावशी**—कां बरं ! भांजणी, मेतकुट, वडे, यांना उडीद लागतोच. उडदाच्या डाळीची चटणी चांगली होते. आमटी पुष्कळांना आवडते. उडीद हा पौष्टिक, शरीरवर्धक व मांसान्नाची बरोबरी करणारा आहे. म्हणून गुजराथेकडे 'अडादिया' म्हणून त्याचें लाडू करून खायची चाल आहे. मुगाची डाळ, मूग हें कडधान्य-सुद्धां, सबंध ( मूग ) उसळ करायला नि डाळीचे निरनिराळे उपयोग करायला कामीं येत. आजाऱ्याला मुगाच्या डाळीचं वरण देतात. एरव्हीं सुद्धां हौसेनं पुष्कळ ठिकाणीं करतात. भाज्यांतून त्याचा उपयोग पुष्कळ होतो. आमटी, उसळ, पापड, लाडू याचे करतात. खिचडीचें याच्याशिवाय अडतेंच. हल्लीं गाजावाजा असलेले दहिवडे याच्याशिवाय अडतात. तसेंच तूर. तुरीच्या ओल्या शेंगा उकडून खायला बऱ्या लागतात, पण त्या क्वचित् मिळतात. तुरीचं वरण नि आमटी हें तर आपल्या जेवणाचं मुख्य सार आहे. शाकाहारी माणसांना वरणाची आत्यंतिक आवश्यकता आहे. वरण आणि आमटी यांशिवाय चालणारं एकही घर सांपडणार नाहीं. दिवसांतून एकदां तरी तुरीच्या डाळीची आमटी लागते. पोळीला वरण लागतं. हें एक जेवणांतलं मुख्य महत्त्वाचं शक्तिवर्धक धान्य आहे, तसेंच मठ, चवळी, वाल, कुळीथ, हीं सारीं कडधान्यं आपल्या जेवणांत उसळीच्या रूपानं येतात. हीं धान्यं सालासकट खाण्यांत वैशिष्ट्य

आहे. त्यामुळं कांहीं वेळां सालासकट तर कांहीं वेळा सालाशिवाय अशा निरनिराळ्या तऱ्हेनं उपयोगांत आणण्याची प्रथा आहे. त्याचप्रमाणं धने, जिरें, शहाजिरें दालचिनी, हे मसाल्याचे पदार्थ सुद्धां नुसते स्वादिष्ट नसून शक्तिवर्धक, उत्तेजक आणि शरिरांतील अग्नि प्रदीप्त करणारे, अशा निरनिराळ्या गुणधर्मांनीं युक्त आहेत. मात्र यांचा उपयोग डोकं चालवून केला पाहिजे. नाहीं तर तोच मसाला रखरखीत, जळजळीत नि कोठ्याला हानिकारक म्हणून खायचा बंद होतो. कारण जिभेला जरी चुरचुरीत, फुरफुरीत, चमचमीत असं आवडत असलं तरी प्रकृतिदृष्ट्या तें अहितकारी आहे. म्हणून सुगृहिणीनं जेवणाराची हौस तर पुरवायची, पण अन्नाचा सौम्यपणा नाहींसा न करण्याकडे जरूर लक्ष ठेवायचं.

**सरल**—मावशी, तुम्ही एकादं कोडं घालतां ! कांहीं वेळानं असं दिखील म्हणाल कीं, याचीं औषधं गृहिणीनं बनवावीं. जें दिसेल तें गृहिणीच्या डोसक्यावर मारायचं ! हें पाहिलं म्हणजे तुमच्यापेक्षां पुरुष ग्रन्थकारांनीं लिहिलेले ग्रन्थ बरे म्हणायची वेळ येईल.

**मावशी**—होय! तुझं म्हणणं थोडंसं खरं आहे. खरोखरीच यांत औषधं आहेत. कारण तुरीची डाळ, कुळीथ, धने, जिरें, हे पदार्थ बायकी औषधांत उपयोगी पडतात. मी माझ्याभोंवतालच्या बायकांत असल्याच पदार्थांपासून तयार केलेलीं औषधं देतें. रोजच्या भाजीपाल्यांत देखील पुष्कळ औषधं आहेत. निरनिराळीं लोणचीं यांचा सुद्धां अर्थ जिभेला चव, निरनिराळे पदार्थ पोटांत जाणं नि एक उत्तम तोंडीं लावणं. आलं, लिंबू, मिरची, आंबा, भोकर, आवळे, आंबेहळद, महाळुंग, हे जे निरनिराळे पदार्थ आहेत ते कोणी नुसते खात नाहींत. तेव्हां लोणच्याच्या रूपानं त्यांचा उपयोग होतो. कांहीं ऋतूंत तर त्यांची आवश्यकता असते. जसं उन्हाळ्यांत

आंबा, पावसाळ्यांत आलं-लिंबू, थंडींत मिरची. त्या त्या ऋतूंत तीं बरीं लागतात, शरीराला त्यांची जरूरी असते, नि शिवाय तें तोंडीं लावणं होतं. निरनिराळे मोरंबे. आंवळा पित्तशामक आहे, पाचक आहे नि रुचि आणणारा आहे. कवठ हेंही पित्तशामक आहे. मोरंबा, सुधारस बारामाही खायला मिळणारे पदार्थ आहेत. पोळीभाकरीला उपयोगी पडतात.

**सरल**—अगबाई, मावशी, लिहायला बसलं म्हणजे कळतं ! किती तरी पदार्थ हे !

**मावशी**—अग, एवढ्यानं काय झालं ? आपण कुठं साऱ्या पदार्थांचीं नांव लिहिलीं ? हें सूपशास्त्र किनई फार अफाट आहे, प्रत्येक पदार्थाबद्दल लिहिलं तर किती वाढेल कोण जाणे ! यावर अलीकडे अनेकांनीं अनेक पुस्तकं लिहिलीं आहेत. तेव्हां तुझ्या ल्हानशा टिपणींत हा ब्रह्मांडाचा पसारा कसा मावणार नि मला कसा सांगतां येणार ? पण तात्पुरत्या व्यवहाराच्या साऱ्या गोष्टी यांत आल्या.

**सरल**—बघूं अं काय काय आलं तें ! सडा, रांगोळी, स्वच्छता, स्वयंपाकघराची टापटीप, मोऱ्या-गटारं धुणं, माजघराची व्यवस्था—

**मावशी**—आणि जाळीचीं कपाटं पुसणं, दूधदुभतं झाकणं ?

**सरल**—म्हणजे काय मावशी ? आम्ही काय कपाटं पुसतच बसूं नि दूधदुभतं झाकीतच नसूं ? तुम्ही रागावल्यापासून मी नियमानं रात्रीची झाकपाक बघतं बरं का.

**मावशी**—तर मग मी तुला शाबासकी देतें अं ! बाकी पुष्कळ ठिकाणीं झांकपाकीकडे दुर्लक्ष केलं जातं बरं का ! विरजणं लावणं,

त्यांचीं भांडीं हीं कामं आपल्याकडे असतात. माझ्या इथंच पहाना! मी एकटी असलें कीं, ताक-दही सुंदर असतं. नि तेंच घरांत दुसरं कोणी बायकोमनुष्य आलं, कीं एकमेकींवर विसंबण्यांत त्याची घडी नासते. एक दिवशीं उत्तम तर एक दिवशीं मुळींच वाईट! तेव्हां गृहिणीनं दूध, लोणी, दूधदुभतं हें स्वतः जरूर बघावं. कारण दही, दूध, ताक हें आपलं जीवन आहे. खाण्यांत हे पदार्थ मुख्यत्वें असतात. ते उत्तमच असावे. बरं पुढं—

**सरल**—जेवणाची जागा सुंदर ठेवायचं महत्त्व, कपडा, वाढणारीण कशी असावी, घरांतले कपडे, सोवळ्याचं महत्त्व, देवाधर्माचं महत्त्व, भाज्यापाले कसे संभाळायचे, धान्याची निगा, वाढावं कसं, भांडींकुंडीं कशीं असावींत, जेवण कां जेवायचं, शेवटीं धान्याचे गुणधर्म, येवढी यादी या टिपणींत झाली. खरं ना मावशी?

**मावशी**—हो, झाली. तुझ्या मनाजोगं झालं ना? चला, आज एक काम पूर्ण केल्याचं समाधान तुला लाभलं.

तोंच भाऊसाहेब येऊन म्हणाले, "सरल, तर मग आज तूंच चहा करून दे."

**सरल**—कबूल! येवढ्या गुरुदक्षिणेवर मी माझं काम भागवीन.

इतक्यांत बापू येऊन म्हणाला, "मीसुद्धां एक मेंबर चहाला आहे. कारण घरीं गेलों तों बायको घरांत नाहीं—"

**भाऊसाहेब**—तेव्हां 'चुकला फकीर मशिदींत' म्हणूनच तुम्ही इथं आलांत ना?

**बापू**—होय. पण हें लिखाण कसलं?

**भाऊसाहेब**—हा आपल्या पत्नीनं लिहिलेला ग्रंथ आहे.

**सरल**—भाऊसाहेब, कांहीं तरी नका हं सांगूं! त्यांत माझं कांहींच नाहीं हं! मावशींनीं सांगितलेलीं तीं टांचणं आहेत.

**बापू**—पाहूं, पाहूं! तीं सुरेख असल्यास आपण छापून टाकूं.

**भाऊसाहेब**—सरल, तूं चहा कर. तोंपर्यंत हें कागद पाहून काय करायचं तें ठरवूं.

**सरल**—मी चहा करतें. पण मला ठाऊक आहे तुम्ही काय करणार तें!

**भाऊसाहेब**—बापूराव, चला आपण चहा प्यायलाच जाऊं कसे! सध्यां आपल्यावर कोणाचाच विश्वास नाहीं!

---

प्रो. फडके यांची

नवी कादंबरी

# ‘उन्माद’

लवकरच

मनोहर ग्रंथमालेंतून

प्रसिद्ध होणार !

# डेक्कन एम्पोरियम

पुण्यांतील कापडाचें सुप्रसिद्ध ठिकाण

आपण कापड-खरेदीपूर्वी

आमचे दुकानास जरूर

भेट द्या.

२३७ बुधवार, पुणें.

श्री. भा. द. खेर, B. A.

यांचा

# नादलहरी

नांवाचा लघुकथासंग्रह

लवकरच प्रसिद्ध होईल.

प्रकाशक :

कॉंटिनेन्टल् बुक सर्व्हिस,

टिळक रोड, पुणें.

स्वच्छ जेवण मिळण्याचें

एकच ठिकाण

# न्यू जयंत बोर्डिंग हाउस

स. प. कॉलेजसमोर,

टिळक रोड, पुणें २.

# किरकोळ दुखणीं दूर करून—

# बालजीवन

मुलांना गुटगुटीत करते



शिवाय श्वास, कास, अतिसार
ज्वरादि रोग बरे होऊन हाडें
लवकर बळकट होतात.

**बालजीवन**

दिल्यानें मुल सशक्त व गुट-
गुटीत बनतात.

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

सर्व प्रकारचीं आयुर्वेदीय औषधें तयार करणारा महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना. या कारखान्याचीं सर्व औषधें मुंबई इलाख्यांतील पहिलें आयुर्वेदीय हॉस्पिटल जें 'शेठ ता. रा. आयुर्वेदिक हॉस्पिटल' त्या मध्यें पारखून गुणकारी ठरल्यानंतरच विक्रीस काढलीं जातात.

# दि लॉंग लाइफ इन्शुअरन्स कंपनी, लिमिटेड, पुणें २.

## स्त्री व पुरुष, गरीब व श्रीमंत यांच्या व राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें आंखलेल्या योजना

स्त्रियांसाठीं:—१ स्वतंत्र विमा शाखा व विमा कोष्टकें.
२ मॅटर्निटी बेनिफिट स्कीम.

विमेदारांकरितां:—१ माफक विमा हप्ते.
२ पॉलिसीच्या तारणांवर अल्प व्याजाच्या दरानें कर्ज.
३ रद्द पॉलिसी सुरू करण्याची साधी व सरळ योजना.
४ वार्षिक हप्त्यांवर २॥ टक्के सूट.

राष्ट्रीय कार्यासाठीं "राष्ट्र-निधींतून मदत"

**शाखा:—**

१ मुंबई-एम्प्रेस महाल, दादर, मुंबई नं. १४.
२ कराची-रामेश्वर मॅन्शन, बंदर रोड, कराची.
३ बडोदा ऑफिस-रावपुरा, बडोदें.

**चीफ एजन्सीज्:—**

१ मेसर्स शेवडे ॲन्ड को., रावपुरा, बडोदें.
२ मेसर्स कूपर ॲन्ड को., सातारा.

**हेड ऑफिस**

लक्ष्मी रोड, १८० बुधवार पेठ, पुणें नं. २

# दि ट्रॉपिकल इन्शुअरन्स कं. लि., न्यू दिल्ली.

स्थापना ] [ १९२७

वाढती प्रगति वाढती लोकप्रियता

जाहीर करण्यास आनंद होत आहे कीं, ता. १ जुलै-पासून, आयुष्याचे विम्याशिवाय, आगीचे, जलाचे (FIRE and MARINE) व सर्वसाधारण प्रकारच्या विम्याचें काम स्वीकारण्यासाठीं शाखा उघडली आहे. जास्त माहितीकरितां खालील पत्त्यावर चौकशी करावी.

अध्यक्ष :— देशगौरव सुभाषचंद्र बोस

मुख्य ऑफिस:—
ट्रॉपिकल बिल्डिंग्ज्,
कॅनॉट सर्कल, न्यू दिल्ली.

ब्रँच ऑफिस:—
९८० लक्ष्मी रोड,
पुणें शहर.